म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय
दा. क्र.

IRBK-0107700

## मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

डॉ. सरोजिनी बाबर

# झालं गेलं सांगतें !

30,120
अनुक्रम
विभाग 2200

मूल्य रु. २–५०

समाज शिक्षण प्रकाशन : १२ वें

प्रकाशिका
डॉ. सरोजिनी बाबर
एम्. ए. पीएच्. डी.
समाज शिक्षण प्रकाशन
१४८६ सदाशिव, पुणें २

प्रथमावृत्ति, जानेवारी १९६०
सव हक्क लेखिकेच्या स्वाधीन

मुद्रक
य. गो. जोशी, बी. ए. (ऑ.)
आनंद मुद्रणालय
१५२३ सदाशिव, पुणें २

माझी गोष्टीवेल्हाळ
भाचे मंडळी

चि. **वर्षाराणी** ऊर्फ **चिन्नू**

व

चि. **सतीशचंद्र** ऊर्फ **मम्मट**

यांना—

*आक्का*

म. ग्रं. सं ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र ६०००० ओं क्र ........
दि. ....५-१०-९०.... ........

IRBK-0107700

IRBK-0107700

## प्रस्ताव—

"झालं गेलं सांगतें–" हा माझा एकूण सातवा कथासंग्रह. खरं म्हणजे आतां या संग्रहाला मी वेगळा प्रस्ताव जोडण्याची गरज नाहीं. तथापि या संग्रहांत मीं माझ्या नेहमींच्या कथा-लेखनापेक्षां वेगळं कांहीं सांगितलंय म्हणून हे दोन शब्द.

माझ्या कथेंत मीं आजवर स्त्रीला प्रामुख्यानं स्थान देऊनच समाजजीवनांतील कांहीं वेचक प्रसंग रंगविले आहेत, सांगितले आहे. या पुस्तकांत माझी भूमिका तीच आहे. परंतु विधान सभेची एक वेगळी पार्श्वभूमि घेऊन मीं इथें कांहीं कथा सांगितलेल्या आहेत. त्या जगांतील वेगळे अनुभव बोलून दाखविले आहेत. मला त्यांची गोडी वाटली आहे. मीं ती या ना त्या प्रकारें स्वतः आमदार असतांना थोडी फार अनुभविली आहे. तिचाच हा आविष्कार होय.

बाकीच्या इतर कथांनीं कधीं शहराची तर कधीं खेड्याची पार्श्वभूमि घेतली आहे.

या प्रकारच्या अनेक कथांतून मीं आजवर सामान्य लोकांच्या जीवनांतील मला आगळ्या वाटलेल्या प्रसंगांना माझ्या कथाभागासाठीं म्हणून निवडले आहे. सामान्यांतील असामान्यत्व रंगवितांना मी स्वतःलाहि विसरून जातें. वाचकांनाहि तोच अनुभव थोडाफार का होईना येईल ह्या अपेक्षेनंच मी हा माझा कथासंग्रह आज वाचकांच्या हवाली करीत आहें.

२६ जानेवारी, १९६० —सरोजिनी बाबर

# अनुक्रम


| | |
|---|---|
| १. झालं गेलं सांगतें ! | १ |
| २. राजेश्वरीचा बटवा | ७ |
| ३. तुळशीपुढची रांगोळी | १३ |
| ४. पुरुषोत्तम | २१ |
| ५. तूं मला आवडतेस— | २८ |
| ६. कुंकवाचं वर्ख | ३८ |
| ७. हुळी | ४७ |
| ८. आज बोलायचं होतं ! | ५६ |
| ९. गोदावरी | ६२ |
| १०. गीता पठण | ७१ |
| ११. कधींमधीं खोटं बोलावं | ८० |
| १२. वेळ निघून जाते ! | ८८ |
| १३. काकूमा | ९५ |
| १४. दसरा दिवाळी | १०२ |
| १५. अध्यक्ष महाराज ! | १११ |
| १६. —मी | ११६ |


★ ★ ★

३०७२ ८
अनुक्रम ८१ ८१
विभाग २.२ ८८
क्रमांक
नों. दि. ७१.३४

# १ : झालं गेलं सांगतें !

....त्यावेळीं पावसाची भली मोठी सर येऊन गेली. रणरणत्या उन्हानं काळवंडून गेलेल्या धरणीमाईच्या ओठाला ओलावा मिळाला. तिनं समाधानाचा सुस्कारा टाकला. त्यासरशीं सगळीकडे सुगंध दरवळला. पानं फुलं हंसलीं. नाचायला लागलीं. त्यांना हायसं वाटलं, उन्हाच्या लाहीनं अंगाचा भडका उडालेलं सारं रान नव्या नवलाईनं जणुं सुखावलं म्हणेनास !...

आणि अशा वेळीं मी एका झाडाखालीं अंग चोरून उभी होतें. आमच्या शेताच्या बांधावर एक मोठं डेरेदार झाड नाहीं का ? हो, तिथंच उभी होतें बघ. पावसानं मला ओलीचिंब केलेली. अंगावरचं लुगडं अंगाला चिकटून सुरकुतलेलं. थंडी वाजतेली. अंग शहारतेलं. ओठ थरथरतेले... त्या कारणानं वाटलं आत्तांच्या आत्तां धांवत घरीं जावं आणि धडकं वाळलं लुगडं नेसून चुलीपुढं बसावं. मूठभर चिपाडं चुलवाणांत कोंबीत जाळ करावा. खरंच, भारी काकडलें होतें, बघ मी !... पण घरीं जाणार कशी ? तसं घर कांहीं लांब नव्हतं. एवढ्या तेवढ्यांत गांठलं असतं. पण पाऊल उचलेनाच त्याला काय करूं ? तूं कांहीं म्हण जिवबा. लांबून येतांना तुला पाहिलं मात्र आणि मी तिथंच रेंगाळलें....तुझ्यावर खिळलेली नजर कांहीं केल्या मागं वळेनाच बघ. सारखं सारखं तुझ्याकडेच बघत रहावसं वाटलं....देवाशपथ !

जिवबा, मीं तुला पाहिलं. म्हणजे तूं मला दिसलास. पण मी तुला दिसलें नाहीं. तुझ्या डोळ्यांत मावलें नाहीं कारे जिवबा मी ? तूं आलास आणि माझ्याकडे न बघतां सरळ आपल्या शेतांत घुसलास !...मीं आपली बघत राहिलें. दुसरं काय करणार ? तरी पण घटकाभर वाटत होतं कीं, तूं निदान एकदां तरी वळून पाहाशील मला. पण तसं झालं नाहीं. तूं

आपल्याच नादांत होतास...आलास तसा सरळ पुढं निघून गेलास.. मी बरीच हिरमुसलें बघ. पण तुला काय त्याचं, नाहीं का ?

हातांत धरलेला नांगर घरून तूं वेगानं शेतांत शिरलास. तुझ्या अवखळ बैलांनीं जोराची मुसंडी मारली. नांगराचा फाळ हां हां म्हणतां काळींत घुसला !...वरची ओली झालेली जमीन बाजूला झाली. खालचा धुरळा वर उधळला गेला...जिवबा, हें पाहिलं तसं माझं काळीज चरकलं. नाहीं नाहीं तें मनांत यायला लागलं....तुझी माझी प्रीत अशीच कुणी उधळून नाहीं ना टाकायचं ? खरंच या धास्तीनं छाती दडपून गेली बघ.

जिवबा, मोठ्या मुष्किलीनं अमृताचा पेला मिळवावा आणि आतां तो ओठाला लावून एका दमांत पिऊन टाकावा, इतक्यांत कुणींतरी तो हिसकावून घ्यावा तसं वाटलं बघ. त्या अमृताचा स्पर्श देखील व्हायच्या आधींच त्याची आणि आपली ताटातूट व्हावी का ? छे छे ! नको बाई असं व्हायला....माझ्या काळजांत ही भावना मावेनाच. आधींच तुझ्या दर्शनानं तें एवढं गच्च भरून गेलेलं होतं कीं, इतर कशाला थारा देखील मिळूं नये ! खोटं नाहीं कांहीं सांगत मी ? पाहिजे तर एक वेळ येऊन कानोसा तरी घे, मग कळेल बघ.

पण हें काय भलतंच ? तुला बोलावलं कशाला मीं जिवबा ? ऐकलीस तूं माझी हांक ? खरंच ? माझी शपथ ऐकलीस ? नाहीं...खोटं !...अगदीं खोटं. तुझी आणि माझी अजून ओळख तरी झालीय का ? नाहीं म्हणायला तुला मीं अनेकदां पाहिलं आहे, तुझा विचार केला आहे इतकंच काय तें ! पण जिवबा, तुला हें कळावं कसं ? असूं दे. नाहीं कळत तेंच बरं आहे. होय. फार चांगलं आहे. माझं मला मनमुराद तुझ्या विचारांत दंग होऊं दे. हवं तिकडं मोकळ्या मनानं भटकूं दे. हवी तशी कल्पना करूं दे. बंधनापलीकडेच राहूं दे मला तूर्त !...

जिवबा, तुला खरं सांगूं का पण ? हें बघ, आमच्या थोरल्या म्हशीला घेऊन मी शेताकडे निघालें आणि जरा कुठं वाटेंत खुट्ट झालं तरी मी दचकतें. माथ्यावरची भाकरीची बुटी डाव्या हातानं सावरून धरतें. आणि उजव्या हातानं मागं सरलेला पदर पुढं ओढीत तूंच आलास वाटतं,

म्हणून कावरीबावरी होत मान वळवून बघत राहतें...वाटतं. तूं आलास! माझे डोळे मग उगाचच भिरभिरायला लागतात. नजर जाईल तिथंवर मी तुझा शोध घ्यायला लागतें ..झाडाझुडांतून कुंपणाकुंपणांतून पिकापिकांमधून, दड्डावरच्या गवतांतून आणि वाट :फुटेल तिकडे मान वळवून मग मी बघत रहातें...

तूं दिसावास म्हणून माझा जीव कसा अगदीं वेडा होतो बघ. म्हणून जीव मुठींत धरून बावरलेल्या मनानं तुझा वेध घेत रहातें. अशा वेळीं काळीज भारी हालतं. उजव्या हातानं उरावर गच्च दाब लावला तरी धडधड थांबत नाहीं...तुझा आवाज कानांत घुमायला लागतो. डोळ्यांत तुझ्याखेरीज कांहीं येत नाहीं. काळजांत तुझ्याविषयींचे विचार कुजबुजत रहातात. ओठांवर तुझं नांव घोळायला लागतं. आणि मलाहि न विचारतां माझीं पावलं तुझ्या वाटेनंच पडतील कीं काय अशी भीति वाटायला लागते...जिवबा, मुलखाचा खट्याळ आहेस तूं. भारी द्वाड आहेस बघ. अगदींच लबाडी कां रे करतोस अशी? तुझ्याबद्दल माझं मन एवढं खुळंभैरं होत असतांना तूं अगदींच गप्प कसा? अरे, एवढ्या आतुरतेनं मी तुला बघायला मान वळवीत धडपडत असतें, म्हणून तूं कधीं सहजासहजीं दिसला आहेस का? किती वेळां अशी माझी निराशा करणार आहेस? मी हिरमुसली होतें, बघायचं तरी होतंस कधीं?...पण तुला काय त्याचं?

जिवबा, तुझी वाट बघून बघून मी थकून जातें...पण खरं सांगायचं म्हणजे तुझा कधीं वैताग येत नाहीं हं! आज नाहीं उद्यां तरी नक्की भेटशील असं वाटतं बघ...आणि तसं वाटून मन शांत झालं कीं, मग मी पुढं निघून जातें...अशा वेळीं म्हैस कोसभर पुढं गेलेली असते आणि तिला शोधतां शोधतां मग माझा जीव मेटाकुटीला येतो. तशांतच ती जर कुणाच्या पिकांत घुसली, तर मग माझी धांदल विचारूंच नको...मला कांहीं सुचतच नाहीं तुझ्याखेरीज, त्याला मी तरी काय करूं?

आणि तुला खरं सांगूं का जिवबा? मला मनापासून असं वाटतं कीं, तूं एकदां मला भेटावंस. माझी विचारपूस करावीस. खरंच जिवबा, तूं एकदां तरी मला भेटावंस बघ. आणिक माझी आवडीनं विचारपूस करावीस. माझ्याशीं पोटभर बोलावंस. पण तें कसं शक्य आहे जिवबा?

जोंवर माझा विचार तुझ्या मनांत डोकावत नाहीं तोंवर ह्या एकांगी ओढाताणीला विचारतो कोण नाहीं का ? तरी पण मी दुःखी मात्र होत नाहीं हं ? तुझा विचार करीत बसावं आणि स्वतःला विसरून जावं म्हणून मी पराकाष्ठा करतें. मात्र एवढं बरीक पक्कं वाटतं कीं, तूं माझ्या नजरेला पडावंस. एवढं तरी ऐकशील का माझं ? तेवढ्यानं देखील माझ्या मनाला केवढी उभारी येईल ठाऊक आहे ? जिवबा, मी तुझी आहें या कल्पनेंतला आनंद पोटभर लुटायला लागलें म्हणजे मला पहाशील, तर तुझी तहानभूक हरपून जाईल. खोटं नाहीं सांगत ? तूं पहाच एकवेळ.

परवांची एक गंमत सांगूं का तुला मी ? ऐक हं नीट. बघ, माझी एक मैत्रिण आली होती. त्यावेळीं गोष्टीवरून गोष्टी निघाल्या. समुद्रकांठच्या खलाशांच्या गंमती सांगत ती बसली. तर माझ्या मनांत काय आलं ठाऊक आहे ? खरं सांगूं का ? हंसायचं नाहीं हं पण ? ऐक तर मग. माझ्या मनांत आलं तें असं होतं बघ.

तूं नाखवा झाला आहेस. मी होडींत बसलें आहें ..आणि मी तुला नाखवा म्हणून साद घालीत वल्हव म्हणतें आहें...तूं हंसतो आहेस... मी हंसतें आहें...

अशा वेळीं डोक्यावर हंसरा चंद्र आला आहे. तुला मला बघून तो हंसतो आहे. आपल्या आनंदाला उधाण आलं आहे...तूं मला नवी साडी दिली आहेस. मोठी देखणी. भर्जरी. ती बघून त्या चंद्राला हेवा वाटतो आहे. त्यानं तुला त्या साडीची किंमत विचारली, तशी तूं म्हणालास कसा, 'त्याचं गणित नाहीं होणार.'

खरंच, जिवबा प्रेमाची किंमत कधीं करतां येते का कुठं ?

आणि असं मी समुद्रांतील त्या चंद्राचं बिंब ओंजळींत धरीत त्याला कांहीं बोलणार तों तूं मला जवळ ओढलीस....म्हणालास, "तूं इथंच माझ्याजवळ बैस. आपण खूप वेळ इथं बसूं."

जिवबा, कुणीहि भेटूं दे, कोणताहि विषय निघूं दे. माझ्या मनांत तूं असतोस. मी फक्त तुझा विचार करीत असतें. त्या कारणानं नाहीं म्हटलं तरी एखादवेळीं कां होईना, माझ्या मनांतलं मी चटकन् बोलून जातें. आणि मग अशी लाज वाटते कीं, विचारूं नकोस. तुझ्याबद्दल मी बोललें

या कल्पनेनं देखील ब्रह्मानंद होतो जिवबा...

अगबाई, कुणाची पावलं वाजलीं हीं?...मी लिहीत बसलें होतें ती एकदम दचकलें. हातांतील कागद मुडपून पोटाशीं धरले आणि श्वास रोखून मागं वळून पाहिलं. बघतेंय तर माझा जिवबा माझ्याकडे येत होता!...त्याला पाहिलं मात्र आणि माझं हातांतलं पेन भिर्रदिशीं लांब भिरकावून दिलं आणि हातांतील कागद भराभर फाडून टाकूं लागलें. त्याला वाचायला धाडावं म्हणून लिहिलेली ही घडली गोष्ट मीं चोळामोळा करून फेंकून दिली आणि लाजून खालीं मान घातली. जिवबा माझ्याकडे येत आहे या कल्पनेनं मी हारखून गेलें, भांबावलें...वेडी झालें...आनंदानं जणुं बेहोष झालें...मला काय करावं सुचेनाच. म्हणून गडबडीनं मीं जेवणाची रिकामी बुट्टी खाकोटीला मारली आणि सपाट्यानं पायाखालची ढेकळं तुडवीत निघालें.

तेवढ्यांत जिवबा धांवत आला. छातींत कसं चमत्कारिक झालं. माझं सुख शिगोशीग भरून गेलं. भीत भीत मीं मान वळवली. जिवबा एका हातावर आला होता. मीं त्याला पाहिलं. त्यानं मला पाहिली. क्षणभरच दोघांची नजर एकमेकांत मिसळली. तशी मात्र मी थांबलें. मला बोलावंसं वाटलं. पण माझीं कानशिलं गरम झालीं...हातपाय गार पडल्याचा भास झाला...आनंदानं उर भरून आला...पण तोंडांतून शब्दच निघेना. तितक्यांत जिवबाचा आवाज आला, "थांब मंजुळे." म्हणून मी मागं वळून पाहिलं. बघतेंय तर जिवबा मीं फाडून टाकलेले कागद गोळा करीत मला विचारीत होता, "फाडलंस कां हें पत्र?" तेव्हां बरीक मला एकदम वाचा फुटली. मी त्याच्यावर ओरडलें, "माझी शपथ आहे! वाचूं नकोस..."

जिवबानं मान वर केली. तो हंसला. माझं अंग एकदम शहारलं. मीं खालीं मान घातली. पदराचं टोक बोटाभोंवतीं गुंडाळूं लागलें. मला वर मान करून त्याच्याकडे बघायला धीरच होईना.

अखेर शेवटीं जिवबाच पुन्हां बोलला, "ह्यांत एवढं न वाचण्याजोगं काय आहे ग?"

"तुला नाहीं कळणार तें" माझ्या तोंडून एकदम ही भाषा गेली,

तशी मीं माझी जीभ दांताखालीं दडपली. वाटलं उगाच बोललें. म्हणून उजव्या हाताच्या तर्जनीला दांताखालीं बसवीत मी त्याच्याकडे हळूंच पाहिलं. तेव्हां तो खदखदून हंसत म्हणाला, "लाजतेस कां एवढी मंजुळे?" तसं माझं तोंड जास्तच गोरंमोरं झालं....

तेवढ्यांत आमचा शेतांतला गडी लांबून येतांना दिसला, म्हणून गडबडीनं मी निघालें; तशी जिवबा माझ्या जवळ येऊन म्हणाला, " अग, माझ्याशीं थोडं बोल तरी?".

त्यावर मी नुसती हंसलें. पण बोललें नाहीं. काय बोलूं? कसं बोलूं? माझ्या मनांत जिवबाबद्दलच्या साऱ्या भावना यावेळीं एवढ्या उफाळून आल्या होत्या कीं, त्यांना शब्दांनीं सजवणं अशक्य होतं. म्हणून मीं समाधानानं फक्त एकवेळ त्याच्याकडे पाहिलं आणि लाजून एकदम पळत सुटलें...

आतां मला कांहीं बोलायचं नव्हतं. माझी भावना फुलली होती. रसरसली होती. शिणगारली होती. सांगायचं तें सगळं न बोलतां त्याला समजलं होतं. मला उमजलं होतं. कुणीं कुणाला खुलासा करण्याची गरज नव्हती. ज्याचं त्याला सारं कळलं होतं. आणि त्याच नादांत मीं आमची मळी केव्हां गांठली, तें मला कळलं देखील नाहीं...

## २ : राजेश्वरीचा बटवा

त्या दिवशीं सभागृहामध्यें जायला मला चांगला अर्धा पाऊण तास तरी उशीर झाला होता. त्यामुळं कौन्सिल हॉलच्या पोर्चमध्यें गाडी थांबल्या-बरोबर मी सही न करतांच सरळ सभागृहाकडे वळलें. बाहेरच्या मंडळी-पैकीं कुणीतरी मला लगबगीनं जात असल्याचं बघून हांक मारली. पण आधींच फार वेळ झाला होता म्हणून मी दरवाजा उघडून चटकन् आंत गेलें. सभापतींना अभिवादन करायचं देखील त्या गडबडींत राहून गेलं! त्यामुळं आंत गेल्यावर माझ्या रोजच्या जागेपासून मी निम्म्याअधिक अंतरावर गेलें नि मग मला आठवण झाली. वाटलं, मान मागं वळवावी आणि सभापतींना अभिवादन करावं. पण त्याच क्षणाला राजेश्वरीनं मला खुणावलं, " आधीं इकडे ये बघूं! " आणि मग मीहि सरळ माझ्या जागेवर जाऊन बसलें.

" कसली चर्चा चालू आहे ग ? " सभागृहामध्यें त्यावेळीं कोणत्या विषयावर चर्चा चालू आहे हें नीट लक्षांत यावं म्हणून मी राजेश्वरीला हळूंच प्रश्न केला. त्यावर ती सरळ उत्तर देईल अशी माझी समजूत. म्हणून मीं तिच्याकडे रोखून पाहिलं तों आपल्याबरोबर आणलेला, रेशमी बटवा पर्समधून बाहेर काढीत ती म्हणाली, " हें बघ " आणि तिनं एक कागद माझ्यापुढं केला.

मला वाटलं तिनं कांहीं टिपणं केलीं असावींत! आणि त्याच अपेक्षेनं मीं त्या कागदावर नजर फिरविली, तों कांहीं निराळंच मला दिसून आलं. अक्षर होतं राजेश्वरीचं. तेव्हां तिनं कुणाला पत्र लिहिलं असेल या भावनेनं मी तो कागद न वाचतांच परत करीत म्हणालें, " टिपणं कुठं आहेत ? "

" हेंच तें! बघ तरी वाचून!... "

राजेश्वरीनं त्या कागदावर बोटानं खूण करीत मला तो वाचायची

आज्ञा केली. तिनं तिथं लिहिलं होतं.

"...दिवसभराच्या श्रमानं शिणलेला सूर्य क्षितिजावरचं पाऊल उचलून हळूहळू पुढं जातो आहे. दर्यावरच्या लाटांचं तांडव नृत्य कानावर येऊन आदळतं आहे. गार वारा अंगावरील कपडे नीट ठरूं देत नाहीं. दिवसां रुंदावलेला रस्ता अरुंद होत चालला आहे. लहानमोठ्या आवाजांतलं अवखळ हंसणं खिदळणं शेजारीं ऐकूं येतं आहे. तोंडांत खमंग भेळीचा घास घुटमळतो आहे. लहान लहान पोरं दर्याच्या अंगावर झेप घेत आहेत...आणि अशा वेळीं एक पाय तसाच वर ठेवून व दुसरा समुद्र-कांठच्या बारीक वाळूंत खुपसून आपण समोरच्या अथांग दर्याकडे पहात बसलों आहोंत. नजर ठरूं नये इतके समुद्रानं आपले हातपाय लांब लांब पसरले आहेत. कासऱ्या दोन कासऱ्यांच्या अंतरावर लाटांच्या अंगावर बेहोषपणें खेळणाऱ्या होड्या दिमाखानं आम्हांला खेळायला यायला खुणावत आहेत. चारदोन मोठाल्या बोटी बंदरांत नांगरल्या आहेत... आणि अशा वेळीं मावळत चाललेल्या उजेडाला झुगारून पुढं यावं म्हणून लकलकत तोंड बाहेर काढणाऱ्या बोटीवरच्या दिव्यांकडे आपण टक लावून बसलों आहोंत...आणि अशाच एखाद्या रम्य प्रसंगीं एखाद्या खलाशाची बायको आपल्या प्रियकराला होडीवर चढतांना बघून म्हणते आहे—

नको वळुन बघूं माघारीं
जा रे खुशाल दर्यावरी......

आणि त्याच वेळीं तिच्या पायाशीं बिलगलेलं तिचं पोरं धांवत जाऊन हत्तीएवढी लाट पायाखालीं तुडवीत बापाच्या मागं लागलं आहे....असंच कांहीं दृश्य या माणसांनींहि रंगवलं तर मग माझाहि या ठरावाला पाठिंबा आहे!..."

"इश्य! हें ग काय?" राजेश्वरीचं हें सगळं लिखाण वाचून मला हंसूं आवरेना. तेव्हां तीहि मंदस्मित करीत पुटपुटली, "नाहींतर काय? समुद्रकांठच्या प्रवासाच्या अगर बंदरांच्या सुधारणेच्या नुसत्या रांगड्या गप्पा काय कामाच्या?"

"अस्सं अस्सं!...." तिच्या या बोलण्यावरून सभागृहामध्यें काय चाललं होतं याची मला कल्पना आली आणि म्हणून तो कागद तिच्या

हवालीं करीत, मी नीट लक्ष देऊन चाललेलीं निरनिराळ्या सभासदांचीं भाषणं ऐकूं लागलें. पण त्याच वेळीं एका सन्माननीय सभासदांनीं कानडी-मध्यें बोलायला आरंभ केल्यामुळं आणि आम्हांला तें कळत नसल्यामुळं राजेश्वरी माझ्या हाताला चिमटा घेऊन म्हणाली, " चहा पिऊन येऊं या चल बाहेर. "

पण मी नुकतीच आलें होतें. त्यामुळं मीं तिला सांगून टाकलं, " छे ! आत्तां नको. " आणि त्या कानडीमध्यें बोलणाऱ्या माणसाकडे नजर वळवली. वाटलं, त्याच्या चेहऱ्यावर उमटणाऱ्या भावनाविष्कारावरून कांहीं अंदाज लागला तर पाहावा !...पण तसं कांहीं झालं नाहीं. ते गृहस्थ निर्वि-कार मनानं वाघ मागं लागल्यासारखे भराभर बोलत होते. त्यामुळं माझ्या कपाळावर आठ्यांचं जाळं पसरलं. मीं त्याच अवस्थेंत मान वळवून राजेश्वरीकडे पाहिलं. माझा चेहरा त्यावेळीं कसा दिसतो आहे हें सांगावं या भावनेनं तिनं त्यावेळीं लिहिलेला एक कागद आपल्या बटव्यामधून काढीत म्हटलं, " हं, बघ वाचून. एरंडेल प्यालासारखं तोंड करूं नकोस. वाच मी काय म्हणतेंय तें !... "

म्हणून मग त्यावेळीं सुरू असलेल्या भाषणामधील अवाक्षरहि उमगत नसल्यामुळं मींहि तो कागद समोर धरला—

" ...सभागृहामधील भाषणं अशी कंटाळवाणीं व्हायला लागलीं म्हणजे मन जाग्यावर रहात नाहीं. आपणाला नकळतहि तें कुठंतरी बाहेर भटकत असतं...अशा वेळीं वाटायला लागतं, या चार सुंदर भिंतींच्या आंत मनाला बळजबरीनं खेचून ठेवण्यापेक्षां खिडकीच्या उघड्या दरवाजांतून त्याला खुशाल सोडून देत म्हणावं, ' जा बाबा... ' आणि आपण बाहेर नजर टाकावी...आपण बसलेल्या जागेपासून दहा-वीस पावलांवर दिसणाऱ्या गुलमोहराच्या झाडाच्या हिरव्या पानांच्या दाट रजईवर मधून मधून रेखीवपणें मान वर काढलेल्या तांबड्या फुलांच्या परागांमधून बेमुदत मनाला भटकूं द्यावं !...आणि तसं भटकतांना त्यानं आंतल्या माणसांना वाकुल्या दाखवीत सांगावं,

" इतके कसे बुवा अरसिक तुम्ही लोक ! बाहेर येऊन हवा तरी खा पोटभर. म्हणजे कळत नाहीं ते ऐकून शिणलेला जीव ताजातवाना होऊन

स्वखुषीनं स्वतःला आंत डांबून घ्यायला राजी होईल !....बंड पुकारतांना देखील लाभणारं अवीट सुख अनुभवायला यासारखी दुसरी जागा शोधून सांपडायची नाहीं...

हें बघ टॉवेलनं भिजलेला हात आपण चटकन् पुसून कोरडा करूं शकतों पण शिणलेलं मन कशानं पुसून स्वच्छ करायचं ?... ''

राजेश्वरीच्या कल्पनाविष्काराचं मला त्यावेळीं इतकं कौतुक वाटलं कीं, माझ्यापुढचा कागद घेऊन मींहि लिहून टाकलं, " माझ्या मनांतहि यावेळीं तसंच कांहींसं घोळत होतं पण मला नाहीं बाई तुझ्यासारखं लिहिणं जमत. किती सुंदर लिहितेस तूं साध्या विषयावरहि !..." आणि तो कागद मीं राजेश्वरीच्या समोर धरला. इतक्यांत सभागृहामधील सारे दिवे लागले. तें बघून ती माझ्या कानांत पुटपुटली, " या विजेच्या नळकांडींत एकदम कसं लख्खकन् झालं पाहिलंस !... तेंव्हां तसं आपल्या डोक्यांत कांहीं व्हायला पाहिजे, म्हणजे सगळ्या भाषा आणि सगळे विषय आपल्याला चटकन् समजूं लागतील... ''

त्यावर मी कांहीं उत्तर देणार इतक्यांत सभापति उठले आणि त्यांनीं त्या ठरावावर सुचविलेल्या सुधारणेवरील आमचीं मतं घेतलीं. त्या नादांत घटकाभर सभागृहामध्यें बरींच मनं एकमेकाशीं कुजबुजलीं आणि ती सुधारणा मताधिक्यानं मंजूर झाली.

त्यानंतरचा दुसरा एक ठराव चर्चेला पुढं येणार, इतक्यांत आपल्या बटव्यामधून आणखी एक कागद बाहेर काढीत राजेश्वरी म्हणाली, " हा कागद वाच. तोंवर मी चहा घेऊन येतें...आणि मग...बरं पण तें जाऊंदे...नकोच...पण जाऊंदे कशाला ?...आज चहा, कॉफी, दूध वगैरे कांहीं घेतलेलं दिसत नाहीं कुणींच ! हो. त्याशिवाय इतकं गंभीर वातावरण इथं येतं ना... '' आणि ती निघून गेली.

ती चार दोन पावलं पुढं गेल्याबरोबर मीं तो कागद पुढं घेतला. राजेश्वरीनं त्यावर असं लिहलं होतं–

"...हें बघ, आपल्या डोक्यावर हातापायामधून जीव जावा त्या थाटांत् मंद गतीनं जे पंखे फिरताहेत ना त्यांची पडछाया आपल्या उजव्या बाजूच्या खिडकीबाहेरच्या हिरव्या जर्द पडद्यावर पडली आहे. बघं तर

खरं मान वळवून ! पाहिलंस ?...हो, तर मला असं म्हणायचं आहे की, त्या पडछायेंत जसं पंख्याचं चक्र फिरतं आहे, तसंच आपल्या मनांतहि विचारांचं चक्र धांवतं आहे...आणि कीं नाहीं, त्याचं प्रतिबिंब आपल्या तोंडावर उमटलं आहे. पण थांब, इथं आरसा नाहीं ! लेडीज रूममध्यें चटकन् ये म्हणजे मी काय म्हणतें तें सरळ पहायला मिळेल... ”

आणि तें वाचून मीहि गोंधळून गेलें. खास मला बघून तिनं हें लिहिलं असावं अशी खात्री पटली. कारण दोनचार दिवसांमागं मला एका विषयावर बोलायची जबरदस्त इच्छा असूनहि वेळेच्या अभावीं कीं काय नकळे मला परवानगी मिळाली नव्हती म्हणा अगर मी बोलायला धजलें नव्हतें म्हणा. पण त्यावेळीं माझ्या चेहऱ्यावर राजेश्वरी म्हणते तसा भाव उमटला असण्याची शक्यता होती एवढं मात्र खास...

“ इश्श ! काय फाजील आहे ? ” राजेश्वरीच्या खट्याळपणावर मी क्षणभर चिडलें. पण तेवढ्यांत मधली सुटी झाल्याचं सभापतींनीं सांगितल्यामुळं सर्व लोक उठून जाऊं लागले...

पण मी मात्र तशीच जागेवर बसून राहिलें. मला एक जबरदस्त आकर्षण अचानक वाटूं लागलं होतं. राजेश्वरीनं बाहेर पडतांना आपला बटवा माझ्या मांडीवर ठेवला होता; आणि त्या बटव्याच्या दोऱ्या ओढून आंत काय काय आहे हें पहायचा मोह मला अनावर झाला होता...

राजेश्वरी म्हणजे आम्हां स्त्रियांपैकीं सर्वांत लहान. वयानंहि अगदीं तरुण मुलगी. तिची पंचविशी उलटून फार तर तीन-चार वर्षं झालीं असतील नसतील इतकंच. या पूर्वीचं तिचं आयुष्य अतांच्या या आयुष्यापेक्षां अगदीं निराळ्या वातावरणांत गेलेलं. घरची ती खाऊन पिऊन सुखी. त्यामुळं मनाला येईल तेवढं शिकून लेखनवाचनांत आणि अधून मधून सामाजिक कार्यक्षेत्रांत तिनं वेळ घालवलेला. तिला हें विधिमंडळाचं कामकाज किंवा राजकारणाचा धकाधकीचा मामला अजून नीट जमला नव्हता म्हणा अगर तिनं या कामांत अजून म्हणावं तसं म[illegible]तलं नव्हतं म्हणा. त्यामुळं आम्ही सभागृहांत असलों कीं ती असं कांहीं एकसारखं लिहायची आणि आपल्या बटव्यांत घालून ठेवायची. माझी समजूत कुणाला तरी ती पत्रं लिहीत असेल, टिपणं घेत असेल अगर एखादी गोष्ट लिहीत असेल की !

आणि म्हणून मी तिकडे कधीं लक्ष दिलं नव्हतं. पण आज तिनं आपणहून पुढं केलेला एकेक कागद बघून मी भांबावून गेलें होतें...

राजेश्वरीची आणि माझी विशेष गट्टी असल्यामुळं मी तिच्या अपरोक्ष तिचा बटवा उघडला आणि भीतभीतच आंतली चिठोरी काढली...त्या चिठोऱ्यांपैकीं एकेक डोळ्यापुढं धरतें तों नवं नवंच नवल पुढं सरकूं लागलं.

राजेश्वरीनं सभागृहांतील अनेकांचीं रेखाचित्रं व्यंग चित्रांचा साज चढवून काढलीं होतीं!...त्यांत सभापतींच्या चपराशापासून तों आमच्या मंत्र्यांपर्यंत कुणींहि सुटलं नव्हतं!

आणि हें काय? अगबाई, हिनं कुणाकुणाची गमतीदार शब्दचित्रंहि रेखाटलींत वाटतं!...

शाबास माझ्यावरदेखील बेटीनं लिहिलंय कीं काय? छे छे! आतां इथं थांबून उपयोगी नाहीं. कुठं तरी लांब जाऊन चोरून वाचलेलं बरं नाहीं तर सर्वांच्या देखत भ्रमाचा भोपळा फुटायला वेळ लावणार नाहीं! राजू...

थांबा हं, मी तरी पहातें अगोदर हें वाचून आणि मग तें इतरांना दाखवायचं कीं नाहीं तें ठरवतें...राजू मोठी खट्याळ आहे. तिच्या बटव्यांत हे नाना प्रकार भरलेत तसं तिचं मनहि मुलखाचं द्वाड आहे! केव्हां कुणावर काय लिहील अगर कुणाला बघून चटकन् काय बोलून जाईल त्याचा नेम नाहीं...त्यापेक्षां सावध असलेलंच काय वाईट?...चला आतां उठावं हेंच बरं. नाहींतर चिलटांसाठीं मारल्या जाणाऱ्या ह्या फवाऱ्याची हवा खात मला इथं बसलेली बघून तिचं नवं रामायण चटकन् तयार व्हायचं!... नाहींतर काय?

## २ : तुळशीपुढची रांगोळी

आमच्या घरांत नवीन वहिनी आल्यापासून मला भारी जोर आला होता. आपल्याला येतंय तें तिला येत नसावं या भावनेनंच सारं कांहीं तिला करून दाखवीत तिच्या पुढं पुढं करतांना माझा जीव एवढा व्हायचा. वाटायचं, आपली कर्तबगारी करून दाखवायला एवढीच जागा चांगली आहे. आणि वहिनीनं माझ्या प्रत्येक करणीचं कौतुक केलं कीं माझी तशी खात्री व्हावयाची. एवढंच नव्हे तर टक लावून बघत तिनं मी करीन तें पहात राहिलं कीं, मला वाटायचं, " हिला हें येत नाहीं म्हणूनच ही एवढं निरखून बघते आहे. तेव्हां आपण नक्कीच हिच्यापेक्षां मोठ्या हुषार ! " आणखी मग मनाला एवढा हुरूप यावयाचा कीं माझी कर्तबगारी जास्तच स्फुरण चढवीत पुढं पुढं जायची.

परवां देखील तसंच झालं. दिवस उगवायच्या आंत मी आमच्या अंगणांत सडा घातला; आणि तुळशीपुढं रांगोळी काढीत बसलें. तुळशी-पुढची रांगोळी आपली ठरलेली. त्यामुळं माझा हात भराभर चालूं लागला. चिमटींतील रांगोळीचं पीठ मोकळ्या मनानं हात फिरेल तसं घसरूं लागलं... मी हारखून गेलें...गाईचे पाय काढून झाले आणि आतां मी स्वस्तिक काढणार, एवढ्यांत नवी वहिनी आली. त्यामुळं माझ्या कर्तबगारीची भुरळ तिला पडावी या भावनेनं चिमटींत धरलेलं पीठ भराभर हवं तसं वेडंवाकडं सोडून देत मीं स्वस्तिकाचा निकाल लावला ! पिठानं माखलेला हात झाडीत वहिनीकडे बघून हंसलें देखील. माझी आपली समजूत कीं, नेहमींप्रमाणं पोटाशीं धरून ती माझं कौतुक करणार. पण अं हं ! तसं झालं नाहीं. मला मागं सारीत वहिनी आपला पदर सावरून माझ्या पुढ्यांत बसली. मला नवल वाटलं. ही अशी काय करतेय मला कळेनाच. मी आपली तिच्याकडे आश्चर्यानं पाहातच राहिलें...

पण बघतेंय तों स्वतःचा हात रांगोळीच्या डब्यांत घालून तिनं एकदम माझ्याकडे मान वळविली. तसं करतांना तिच्या कानावरचा पदर मागं सरकला आणि तिच्या कानांतील चमकदार लांबट झुब्यांची मोठी डौलदार हालचाल झाली. मला ती हालचाल एवढी आवडली कीं, 'आ' वासून मी तिच्याकडे बघतच राहिलें. पापणीदेखील हलेना. श्वास सुद्धां रोखला गेला ....वहिनी मला एकाएकींच फार फार आवडली. जणुं माझी तिला दृष्ट व्हावी एवढी ती मला आवडली. म्हणून तिच्या पातळाचा पदर खस्दिशीं ओढून माझ्या माथ्यावर घेत मीं तशी मान वळवायचा प्रयत्न मुद्दाम केला! हेतु एवढाच कीं, वहिनीनं मोठ्या प्रेमानं माझ्याकडे बघत मला आणखीनच आपली मोहिनी घालावी...पण तेवढ्यांत वहिनीनं आपला पदर सावरीत मला जवळ बोलावली आणि थोड्या वरच्या आवाजांत सांगितलं, "स्वस्तिक चुकलं दिवाणसाहेब तुमचं! असं नाहीं काढूं हो! डाव्या हाताचं वाईट असत ना? द्वाडवाणी असं हो कां?"...आणि माझ्या जवळ बसून उजव्या हाताचं स्वस्तिक काढण्यांत ती दंग झाली.....

नेहमीं माझ्या हो ला हो करणारी वहिनी मला असं कांहीं बोलेल हें स्वप्नांत देखील कुणीं म्हटलेलं आवडलं नसतं. पण ती जेव्हां खरोखरीच तसं बोलली तेव्हां सर्रदिशीं माझ्या अंगावर कांटा आला. मीं आपली जीभ दांताखालीं चावली. अंग चोरून घेत उभी राहिलें. भारी चुटपुटल्यावाणी झालं. पण गप्प बसवेना. वहिनी कसलं स्वस्तिक काढतेय तें बघायचं भानच मला राहिलं नाहीं. हातांच्या मुठी वळीत आणि कपाळावर आठ्या चढवीत मीं तिला मोठ्यानं विचारलं, 'स्वस्तिक असलं कीं बास! असेल तसं देवाला चालतं. डाव्या-उजव्याची भानगड कसली ग इथं?'

'दिवाणसाहेब!' वहिनीनं मला प्रेमानं हांक देत पुन्हां माझ्याकडे मान वळवली. तशी हिरव्या साडीच्या कुशींत दडलेले तिचे झुबे पुन्हां चमकले. माझं भान त्यांनीं हरपलं. हावऱ्यासारखी मी तिच्याकडे पहातच राहिलें.......पण वहिनीच पुन्हां बोलली, 'तुळशीपुढची रांगोळी नुसती काढायची नसते!'

'मग?' वहिनीचा प्रश्न मला मोठा चमत्कारिक वाटला. माझे डोळे

मोठे झाले. तिच्यावर मीं माझी नजर रोखली.

'दिवाणसाहेब, या रांगोळीचा अर्थ समजला पाहिजे माणसाला.'

'अर्थ? आणि रांगोळीचा? कांहींतरीच हं वहिनी तुझं!' मला हंसू आवरेना, म्हणून मीं वहिनीला वेड्यांत काढली नि फिदीफिदी हंसत सुटलें...

'अगबाई! हंसायचं कशाला तें? मी म्हणतें तें खरं आहे. या रांगोळीला जरूर अर्थ आहे.' वहिनीनं शांतपणानं आपलं म्हणणं माझ्या-पुढं ठेवलं आणि माझ्या नजरेला आपली नजर भिडवली. त्या कारणानं मीं माझा भक्कम पुरावा तिच्यापुढं ठेवला, 'आमची आई असं कध्धीं बोलली नाहीं!' माझी समजूत, यावर ती आपले शब्द मागं घेईल. पण नाहीं. माझ्यापेक्षांहि दुप्पट जोरानं तिनं मला बजावलं, 'त्यांना माहीत नसेल हें!'

'वा ग वा! आईला माहीत नसेल म्हणजे? असं कधीं होईल?'

'होईल, होईल!'

'खोटं!'

'छे! बरोबर आहे मी म्हणतेंय तें.'

'कशावरून?'

'ऐका तर खऱ्या!'

'अस्सं! तर मग सांग बघूं या!' आईचं शहाणपण मान्य न करणाऱ्या वहिनीची परीक्षा घ्यावी म्हणून मी श्वास रोखून तिच्याकडे बघितलं. तशी तिला हवं तसलं स्वास्तिक काढीत ती मोठ्या अभिमानानं म्हणाली,

"आपण नशीबवान् ठरावेत म्हणून स्वास्तिक काढायचं असतं. आणि उजव्या हाताचं स्वास्तिक नशीब घेऊन येतं. सूर्याचं तें प्रतीक आहे दिवाणसाहेब! सूर्य ज्या मार्गानं फिरेल त्या मार्गाप्रमाणं स्वास्तिकाची दिशा पाहिजे. स्वर्गांतील सूर्याचा ह्या स्वास्तिकासारखाच रस्ता असतो बघा!'

वहिनीचं हें बोलणं मला नीटसं समजलं नाहीं. पण तिनं स्वर्गांतली भाषा काढली म्हणून मीं तिला विचारलं, 'तूं पाहिला आहेस होय ग वहिनी स्वर्ग?'

'कुणी? मी?'....वहिनी थोडी चपापली. पण तिनं स्वतःला लगेच सावरलं, 'स्वर्ग मेल्याशिवाय दिसत नाहीं म्हटलं दिवाणसाहेब!'

आतां मात्र मी ओशाळून गेलें. आपण भलतंच बोलून गेलों याची मला जाणीव झाली. म्हणून जीभ चावीत परकराच्या सोग्यांत तोंड खुपसून मीं वहिनीकडे चोरट्या नजरेनं पाहिलं.

पण तिचं माझ्याकडे लक्षच नव्हतं. ठिपक्या मारीत ती मला पुन्हां सांगत होती, 'बरं का दिवाणसाहेब, ही स्वस्तिकाच्या मधली आडवी नि उभी रेघ आहे ना, ती म्हणजे चंद्राची व इतर चांगल्या ग्रहांची उपस्थिति मानतात. त्यासाठींच तर पूजा करावयाची. स्वस्तिक म्हणजे जणु सूर्याची बैठक. आणि सूर्य म्हणजे तर उभ्या दुनियेला जीवन देणारा राजा...'

बोलतां बोलतां वहिनी थांबली म्हणून मी नुसतं 'हुं!' केलं आणि तिच्या अक्कलहुषारीची तारीफ करीत तिच्याकडे कुतूहलानं पहात राहिलें. पण वहिनीनं तें पाहिलं. त्यामुळं मीं उगाचच माझा खालचा ओठ दांता-खालीं दाबला. तशी वहिनी हंसली आणि म्हणाली, 'मी आपलं वाचलंय तें सांगतेंय. तर आणखी सांगायचं तर असं म्हणतां येईल कीं, जगाला निर्माण करणारा जो शिवदेव आहे ना, त्याच्या कमळासारख्या पायावरील ही एक भाग्यरेषा आहे!...म्हणून तर मीं म्हटलं कीं, उजव्या हाताचं हें स्वस्तिक नशीब घेऊन येतं...आणि खरं सांगायचं तर ही माझी भाषा नव्हे. ब्रह्मदेवानं केलेलं हें भाकित नारदमुनींनीं पहिल्यांदां जगाला सांगितलं आणि तें परंपरेनं आजवर चालत आलंय बघा!'...

वहिनी जीव तोडून बोलावं तसं मला समजावून सांगत होती. पण माझ्या बुद्धीला तें चटकन् उमजेना. सिनेमांतील एखादा चित्त थरारून सोडणारा साहसपूर्ण देखावा बघावा तसं मला झालं. अंग चोरून घेऊन मीं कशीबशी आलकट पालकट घातली आणि भीतभीत मान वर करून वहिनीला म्हटलं, 'हं! बोल तूं.' आतां मात्र वहिनी पोटभर हंसली. कौतुकली. मला कुशींत घेत तिनं सांगितलं, 'माहीत नसलं तर कळून घ्यावं माणसानं. शाळेंत सांगत जाल तर बाई देखील शाबासकी देतील! म्हणतील, फार हुषार आहे हो ही मुलगी!...अं! आमच्या दिवाणसाहेब आहेतच मुळीं हुषार!'

वहिनीनं लाडीकपणानं माझ्या हुषारीची बेरीज केली, तेव्हां माझी कळी एकदम खुलली. हंसऱ्या मनानं मी बोललें, ' असं ?...तर मग सांग कीं सगळं नीट ! पाठ करीन मी. ' आणि तिच्या बोलण्याला कान दिला. वहिनीला बरं वाटलं. स्वस्तिकावर बोट फिरवीत ती अभिमानानं म्हणाली, ' ह्या रेघांच्यामध्यें आपण हे जे ठिपके देतों ना, त्यांचा अर्थ असा कीं, धार्मिक संस्कारांचं एकत्रीकरण त्या निमित्तानं करायचं. '

' म्हणजे ? '

' म्हणजे असं कीं, जगांतील जो खरेपणा आहे, ज्याला ना सुरवात ना शेवट अशीच अवस्था आहे आणि ' सत् ' शब्दानं जो ओळखला जातो, तो सर्व धार्मिक संस्कार म्हणून इथं एकत्र येतो. '

' हं ! आणखी ? '

' तसं पाहिलं तर ह्या ठिपक्यांना विशेष आकार नाहीं. पण मध्यबिंदू मात्र त्यास नक्की आहे...'

वहिनीनं मीं नुकत्याच शिकायला सुरवात केलेल्या भूमितीला हात घातला म्हणून ओळखीचं माणूस भेटावं तशी मी आनंदून ओरडलें, 'अगदीं बरोबर ! '

' हो ना ? ' वहिनीला वाटलं ती म्हणते तें सारं माझ्या मनांत ठसलं ! म्हणून समाधानानं ती पुढं जास्त सांगूं लागली, ' कुणी कुणी असंहि सांगतात कीं, विष्णूच्या बेंबीमधून निघालेल्या आठ पाकळ्यांच्या कमळाची खूण म्हणूनहि स्वस्तिक काढण्यांत येतं ! '

' अगबाई ग !...खरंच ? ' वहिनीच्या बोलण्याची मला शंका आली. त्यामुळं पोलक्याखालीं झाकलेल्या माझ्या पोटावरील बेंबीकडे मी कारण नसतांना बघत राहिलें...वहिनीनं तें पाहिलं बरीक आणि तिला एवढं हंसूं फुटलं, कीं त्या दणक्यानं मी फारच ओशाळून गेलें...

पण वहिनी हंसूं आवरीत माझ्याजवळ सरकली. तिनं माझ्या खांद्यावर हात ठेवला. बोटानं गालाला डिवचलं आणि म्हणाली कशी, ' हंसण्याचं सोडून द्या. पण सांगतें कीं, खरंखोटं देव जाणें बाई. पण ऐकलंय तें तुम्हांला सांगितलं इतकंच... ' त्यामुळं खालीं घातलेली मान मीं वर केली आणि नीट लक्ष देऊन तिचं म्हणणं लक्षांत घेऊं लागलें. वहिनी

मला समजावून सांगत होती, ‘ बरं कां दिवाणसाहेब, हेंच स्वस्तिक निरनिराळ्या प्रकारानं काढतात. त्यामुळं असंहि म्हटलं जातं कीं, हें स्वस्तिक म्हणजे जुन्या काळीं कल्याणदायक इच्छा प्रदर्शित करणारं असं लिहिलं गेलेलं खास पत्र असावं !... ’

‘ पत्र ? ’

‘ हो. असं म्हणतात खरं. माणसाच्या धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या प्रमुख भावना दाखविणारी ती मुख्य खूण आहे, असाहि कांहीं लोकांचा समज आहे या बाबतींत !...आणि कुणाकुणाला तर स्वर्गात चढून जायला ती एक फक्कड शिडी आहे असंहि वाटायला लागतं हो ! ’...

‘ अगग्गाई !....वहिनी खरंच का हें ? ’

‘ वाचलंय तें सांगितलं. आणखी कुणाकुणाची तर अशी श्रद्धा आहे म्हणतात कीं, पृथ्वीचा मध्यबिंदू दर्शविणारी ती एक खूण असून या चार रेषा म्हणजे उदयाचल, अस्ताचल, मेरू आणि मंदराचल या श्रेष्ठ पर्वतांच्या रांगा आहेत !... ’

‘ ऐकावं तें एकेक नवलच हं वहिनी ? ’

‘ हो ना !...म्हणून असलं कांहीं वाचत बसायला मजा वाटते मला. ’

वहिनी आणि मी आतां एकमेकींशीं जास्त घरोब्यानं बोलत होतों. इतक्यांत आईच्या हातांतील बांगड्यांचा आवाज जवळपास ऐकूं आल्याकारणानं वहिनीनं माथ्यावरचा पदर पुढं ओढला आणि चटकन् घरांत निघून गेली. म्हणून मग रांगोळीचा डबा उचलून घेऊन तिच्या पाठोपाठ तिला कांहीं विचारावं या भावनेनं मींहि सैंपाकघर गांठलं...

त्यावेळीं आई कांदा चिरीत बसली होती. मला पहातांच ती माझ्यावर खेंकसली, “ कार्टेऽऽ, ही वेळ आहे का गोष्टी करीत बसायची ?...आणि हें काम कोण करणार इथं ?... ” तशी मी गांगरलें. माझं मन हाबकलं. धाबं दणाणलं. आतां वहिनीची धडगत नाहीं या भावनेनं मला चांगलीच धडकी भरली...मुकाट्यानं मीं तिथून पाय काढला. अभ्यासाला बसावं म्हणून दाराकडे वळलें. तशी आई मघांपेक्षां रागावली, “ मागं फिर ! मसाला वाटून दे तेवढा. चल ! ” त्यामुळं मीं मुकाट्यानं चार पावलं माघारीं उचललीं. मसाला वाटावा म्हणून पाटावरवंटा धुऊन घेऊन आई-

शेजारीं बसलें. पण कशी कोण जाणें मला एकदम वाचा फुटली. चुलीवरच्या पातेल्यांत फोडणी टाकणाऱ्या आईला मीं विचारलं, " आई, लग्नांत नवरानवरीच्यामध्यें जो अंतरपाट धरतात, त्यावर स्वस्तिक कशासाठीं काढतात ग ? "

आतां मात्र आईचा राग निवळला. धार्मिक गोष्टींची तिला भारी आवड. तशांत कधीं नव्हे ती मीं धार्मिक भावनेला हात घातला म्हणून कीं काय चिरलेला कांदा चुलीवरच्या पातेल्यांत बिनबोभाट ओतून पळीनं तो उलथापालथा करीत ती म्हणाली, " अग नवरानवरीचं भलं व्हावं म्हणून अंतरपाटावर काढावं लागतं स्वस्तिक ! देवाची साक्ष असते ती. त्या रूपानं प्रत्यक्ष भगवान् सूर्यनारायण नवरानवरीला आशीर्वाद द्यायला येतो म्हणतात ! त्याच्यामुळं दोघांना सुख मिळतं पोरी !... "

आणखी मग तिनं नव्या बाळाच्या पांचवीला, बारशाला आणि वर्षसणाला तांदळाचं स्वस्तिक कसं काढलं जातं याची मोठी मजेदार हकीकत सांगितली. मला फार बरं वाटलं. त्या नादांत वहिनी ' नको नको मी वाटतें. ' म्हणून माझ्या हातांतील वरवंटा सारखी घेत होती, तरी मीं मोठ्या आनंदानं आईनं काढून दिलेला मसाला एका दमांत वाटून काढला...

त्या दिवशीं अख्खा दिवस स्वस्तिक माझ्या मनांत घोळत होतं. त्यामुळं मला एक चांगली कल्पना सुचली. अभ्यास चांगला होईल या भावनेनं दुकानदार दुकानांतील भिंतीवर ' शुभ–लाभ ' लिहितो व खालीं स्वस्तिक काढतो, त्याप्रमाणं सगळं करीत झाडून साऱ्या वह्या आणि पुस्तकं रंगवून मोकळीं झालें....

रात्रीं निजतांना मात्र ह्या स्वस्तिकाच्या जोडीला काढला जाणारा गाईचा पाय कांहीं केल्या नजरेपुढून हालेना. अगदीं एखादा आवडीचा खाऊ डोळ्यांत आणि मनांत भरावा तसं झालं.

गाईचा पाय कशासाठीं काढायचा असतो हें माहीत नव्हतं, तरी मीं माझ्या डोक्याला ताण दिला. त्यासंबंधीं मीं कुठं कांहीं वाचलं अगर ऐकलं नव्हतं, तरी उगाचच विचार करीत बसलें...कुणाला विचारावं म्हटलं तर वहिनी झोपली होती. आई आणि काकू ओसरीवर गोष्टी करीत होत्या. म्हणून मग माझं मीच डोकं चालवीत बसलें....पण गंमत

अशी झाली कीं, गाय फार पवित्र असली पाहिजे, तिनं मोठी कर्तबगारी केली असली पाहिजे, यापलीकडे माझी अक्कल चालेनाच ! डोक्याला मात्र शीण भरपूर आला. शेवटीं उद्यां उठल्याबरोबर वहिनीला विचारायचं ठरवून मी अंथरुणावर पडलें आणि तोंडावर पांघरूण ओढून घेतलं पण कुणीतरी गाढ झोंपेतून दचकून उठावं तशी त्या घटकेला माझी अवस्था झाली. माझ्या डोक्यांत एका गोष्टीनं जोरानं उसळी मारली. तशी मी तडकाफडकी उठून बसलें....

हलक्या पावलांनीं मी अंथरूण सोडलं. कंदिलाची वात वर केली. दार पुढं लोटलं. कागद–पेन्सिल दप्तरांतून बाहेर काढली; आणि मग तुळशीपुच बसलें आहे असं समजून, येत होती ती सर्व प्रकारची रांगोळी भराभर कागदावर काढीत सुटलें ... या सगळ्या रांगोळ्यांचा अर्थ वहिनीनं मला सांगावा आणि मग बाईच्यापुढं तो सारा पाढा वाचीत रुबाब मारून आपल्या अक्कलेनं उभ्या वर्गाला चकीत करून सोडावं, या ईर्षेनं माझा हात अगदीं वाऱ्यासारखा वेगानं हालूं लागला...

● ● ●

त्या शाळेच्या आवारांत पाऊल टाकलं, त्यावेळीं सगळीकडचं वातावरण कसं प्रसन्न झालं होतं. विविध प्रकारचीं वाद्यं एका तालासुरांत वाजत होतीं. मुलांची प्रार्थना कानांवर येत होती. ' मंगल देशा पवित्र देशा महाराष्ट्र देशा ' या गीतानं आणि ' करूं या भारत जयजयकार ' या जयघोषानं सभोंवतालचं जग दुमदुमून गेलं होतं...परमेश्वराच्या आठवणीनं, महाराष्ट्राच्या कीर्तीनं आणि भारताच्या निष्ठेनं त्या ठिकाणची ज्ञानोपासना उत्साहानं पुढं जात होती...उत्साहाचा वारा सगळीकडे पसरला होता. समाधानाचं गीत निनादत होतं. आनंदाची लकेर उसळत होती. प्रेमानं भारलेल्या माणसांचीं मनं फुललीं होतीं. जीवनाला जीवन जणुं प्रतिसाद घालीत होतं...

अशा वेळीं आकाशाला गवसणी घालूं पहाणारी आकांक्षा संगतीला घेऊन मीं त्या जागेंत प्रवेश केला. हृदयांत आनंदाचीं कारंजीं उसळलीं. मन प्रसन्न झालं. हात जोडून सर्वांना मीं अभिवादन केलं; आणि त्या मंजुळ गीतांच्या आवाजांत मींहि माझा साद मिसळला...मनापासून आणि शुद्ध चित्तानं केलेल्या सत्कर्माचं फळ माझ्या नजरेंत भरूं लागलं...

एवढ्यांत एक मध्यम वयाचे दिसावेत असे गृहस्थ हात जोडून नमस्कार करीत सामोरे आले. मीं त्यांना पाहिलं. उलट नमस्कार केला. उठून उभी राहिलें. तशी कुणीतरी पुटपुटलं, ' हेच आमचे भाऊ. या जागेला मंगल करणारे आणि आम्हां मुलांना नवजीवन देणारे हेच ते भाऊ. ' मला आनंद झाला. मीं त्या व्यक्तीला नखशिखांत न्याहाळलं. पांढराशुभ्र खादीचा स्वच्छ पोषाख परिधान केलेल्या त्या व्यक्तीनं माझ्या मनाला आकर्षिलं. कांहींतरी मंगल आणि पवित्र असं पुढ्यांत आहे असा भास झाला. म्हणून मी बोलून गेलें, ' आपली भेट झाली, आनंद वाटला.

तुमची शाळा आवडली मला. '

'अजून तर शाळा पहायची आहे!' भाऊंनीं हंसतमुखानं माझ्या कल्पनेची दुरुस्ती केली. म्हणून मीं चटकन् त्यांना सांगितलं, 'वर्ग पहायची आतां गरज नाहीं! शाळा म्हणजे इमारत नव्हे, हीं जिवंत मुलं म्हणजेच शाळा. नाहीं का?' मला वाटलं यावर भाऊ कांहीं बोलतील. पण गप्प राहिले. नुसते हंसले. त्यांनीं मला आपल्या कचेरींत नेलं. मोठी सुंदर व आटोपशीर खोली होती. अगदीं स्वच्छ. पायाचा केर जमिनीला लागावा अशी! आणखी टेबल खुर्चीची भानगड नव्हती. लहानसं लाकडी डेस्क एका लहानग्या गादीपुढं मांडलं होतं. समोर सतरंजी होती. डेस्कवर उदबत्ती दरवळत होती. भिंतीवर दोनच फोटो होते, एक विवेकानंदांचा आणि दुसरा रवींद्रबाबूंचा. बस्स! बाकी कांहीं सामान नव्हतं. भिंतींतल्या बंद कपाटांत कांहीं असलं तर देव जाणे! एरव्हीं कांहीं नाहीं. खिडकीचे पडदे अर्धवट उघडे होते आणि दारावरचा पडदा वाऱ्यानं मागंपुढं होत होता. मला खोली आवडली. म्हणून मीं भाऊंना सहज विचारलं, 'घर कुठं आहे तुमचं?' तेव्हां त्यांनीं चटकन् सांगितलं, 'आहे येथून दहा मिनिटांच्या रस्त्यावर.'

'घरीं कोण कोण आहे?'

'सौभग्यवती आणि मुलं.'

'तुम्हाला मुलगी आहे का हो?'

'पुष्कळ आहेत!'

"अच्छा!"

'पण घरची एकच आहे. सांभाळलेल्या मात्र पांच-सात आहेत.' भाऊंनीं असा खुलासा करीत माझ्यापुढं शाळेचं माहितीपत्रक ठेवलं. पण माझं लक्ष त्यांत लागेना. भाऊंनीं अनाथ मुलांना पालक म्हणून सांभाळल्याचं मीं ऐकलं होतं, त्याचा सुगावा लागल्याच्या नादांत माझं मन दंग झालेलं. म्हणून मी भाऊंना म्हणालें, 'भाऊ, तुमच्या कामाची आणि त्यागाची धन्य आहे!'

'असंच कांहीं नाहीं!...फार थोडं करतों मी!' खालीं मान घालून भाऊंनीं आपला विनय प्रगट केला. त्यांच्या शालीनतेनं मला भुरळ पाडली.

म्हणून मीं त्यांना आणखी विचारलं, ' भाऊ, तुमची बायको तुम्ही कराल त्याला आनंदानं संमति देते ? '

" अलबत् !...तिच्या संमतीचा प्रश्न येतोच कुठं पण ? "

' माफ करा. आपला प्रत्यक्ष परिचय आज होत असला तरी तुमच्या-बद्दल मी फार ऐकून आहें. आणि म्हणूनच शाळा पहायच्या निमित्तानं मी तुमच्याकडे आलें आहें...मला तुमच्याशीं मोकळ्या मनानं बोलतां आलं तर आनंद वाटेल. '

' वाटेल तें विचारा. मी आनंदानं बोलेन. लोकांची समजूत पटवून त्यांचं अज्ञान दूर करणं, गैरसमज घालवणं यांतच मी स्वतःला समाधानी मानतों. '

भाऊ मी विचारीन तें सांगायला मोकळ्या मनानं तयार आहेत, हें त्यांच्या तोंडून समजतांच मला मनस्वी आनंद झाला. येतांना माझ्याबरोबर आलेली भीति निघून गेली, धीर आला. मीं त्यांना विचारलं, ' रस्त्यावर सांपडलेल्या पोरांना तुम्ही तुमचं नांव लावून इस्टेटीचा भागीदार नाहीं का करत ? '

' इस्टेट आहे कुणाजवळ तेव्हां ही काळजी ? '

' म्हणजे ? '

' जें मिळतं तें मी या मुलांना वाटतों. घरांत मोजकं देतों. '

' तरी बायको रागावत नाहीं ? '

' कारण काय ? '

' बायकांना आपल्या मुलांपेक्षां इतर कुणी दिसत नाहीं न् आपल्या इस्टेटींत कुणी आलेलं खपत नाहीं हें जगजाहीर आहे ! '

' असेल ! माझ्याकडे हा जाहीरनामा नाहीं !...आणि मी हें करतोंय तें माझ्या घराला नवीनहि नाहीं !...'

भाऊंनीं माझ्या शंकेचा खुलासा केला. इतक्यांत एक दहा बारा वर्षांचा चुणचुणीत व गोरापान मुलगा आला. त्यानं आम्हांला अभिवादन केलं आणखी निरोप दिला, ' वर्गांत गेलों आम्ही. केव्हांहि पाहुणे येऊं शक-तात. ' तशी मीं त्याला विचारलं, ' काय रे बाळ, वर्गांत पहाण्याजोगं कांहीं आहे का ? '

‘ अवश्य आहे. ’

‘ काय ?...सांग ना. ’

‘ आम्ही मुलं. आमचा अभ्यास. आमची टापटीप. ’

‘ आणखी ? ’

‘ भाऊ आले म्हणजे आम्हांला होणारा आनंद ! ’

हंसतमुखानं मला एवढी बातमी देऊन तो मुलगा निघून गेला. त्याच्या पाठोपाठ आम्हीहि वेगवेगळ्या वर्गांत जाऊन हिंडून आलों. फार वेळ मी कुठं रेंगाळलें नाहीं. पण जें पाहिलं त्यानं मला जिंकलं ! दर ठिकाणीं कमालीची शिस्त होती. समाधान होतं. उत्साह होता. प्रसन्नता होती. विद्यादेवीचा आशीर्वाद होता. हंसरी मुलं होतीं. प्रेमळ शिक्षक होते. गडबड, धांदल नव्हती. आळस नव्हता. डिवचाडिवची नव्हती. कुजबूज नव्हती. सारं व्यवस्थित चाललं होतं. जिवंतपणा सर्वत्र नांदत होता.

म्हणून शाळेच्या क्रीडांगणावर येतांक्षणींच मीं भाऊंना विचारलं, ‘ हेंच वातावरण रोज असतं का ? ’

‘ होय, केव्हांहि येऊन पहा. कुणी येणार वा आलं म्हणून कांहीं फरक नाहीं. कोणाला बरं वाटावं म्हणून डामडौल नाहीं. चित्ताची प्रसन्नता निर्माण झाली कीं, मी सुखावतों. ’

‘ अस्सं ! ’ भाऊंच्या बोलण्यानं मला नवल वाटलं. त्यांच्या विचारांचं आश्चर्य वाटलं. असला माणूस मीं पाहिला नव्हता. असली शाळाहि मीं बघितली नव्हती ! त्या कारणानें मी मोठ्या आश्चर्यानं त्यांच्याकडे पहात राहिलें.

त्यावेळीं खालीं मान घालून भाऊ म्हणाले, ‘ समाजसेवेची आवड असणारा माणूस निष्कामकर्म करीत असतो. फलाची आशा धरीत नाहीं. शिफारशीची अपेक्षा बाळगीत नाहीं. स्वतःचा आनंद त्याला पुरेसा होतो.’

‘ खरं आहे. पण हें विरळा. ’

‘ असेना !...जगांत नाहीं तें करून दाखविण्यांत तर खरी मौज. माझ्या वडिलांचं सांगतों. त्यांनीं आजपासूनच्या पंचवीस तीस वर्षांमागं आमच्या घरांत एक हरिजनाचं पोर सांभाळलं होतं ! ’

‘ खरंच ? ’

'होय. आई कडक सोवळ्याची. पण वडिलांच्या भावनेचा अपमान तिनं केला नाहीं !...आईबापाविना रस्त्याला भुकेनं व्याकुळ होऊन पडलेलं आजारी पोर त्यांनीं घरांत आणलं. तिनं त्याची सेवा केली, त्याची आपल्या पोराबरोबर ऊठबस केली. कपडालत्ता, खाणंपिणं एकसारखं ! फरक म्हणून नाहीं !...मोठेपणीं त्याचं लग्न केलं तेव्हां वरमाय म्हणून हौसेनं ती मिरवली ! सुनेचं तर कोडकौतुक किती केलं विचारूं नका !...'

भाऊंनीं आपल्या वडिलांची सांगितलेली ही हकीकत ऐकून मी थक्क झालें. समाजसेवेबद्दलच्या आमच्या कल्पनेची मला कींव आली. अनाथांना सनाथ करणाऱ्या या माणसांच्याबद्दल मला मोठा अचंबा वाटूं लागला...

'आज माझ्या घरांत तुम्हांला हेंच बघायला मिळेल. कुणाच्या नांव-गांवाचा, जातीगोतीचा, पत्ता नसलेलीं मुलं घरीं सुखानं वाढताहेत !... आणि बायकोदेखील दुजाभाव न करतां त्यांना सांभाळते आहे. दिवसभर त्यांचे कष्ट उपशीत असते बिचारी.'

आपल्या स्वतःच्या घरची भाऊंनीं ही माहिती दिली तशी मी आणखीन् थक्क झालें. आपलींच पोरं संभाळायला काचकूच करणारे आम्ही या माणसापुढं किती फिक्के पडणार आहोंत याबद्दल मला लाज वाटूं लागली...

म्हणून मीं भाऊंना विचारलं, 'ह्या मुलांचं शिक्षण तुम्हींच करणार आहांत का ?'

'अर्थात् !'

'आणि लग्न ?'

'तें सुद्धां !...पण काळजी वाटते. दोन मुली आंधळ्या आहेत. दोन मुलं बहिरीं, मुकीं आहेत !'

'अगबाई !'

'हो. ह्यांना मात्र मीं आंधळ्याच्या शाळेंत आणि रिमांड होममध्यें ठेवलंय. शिकतात तिथं ! घरीं दोनतीनच आहेत. दोन मुली बोर्डिंगमध्यें आहेत एका.'

'अस्सं !...मग त्यांना भेटायला जातां केव्हां ?'

'सवड मिळेल तेव्हां जातों.'

‘ रात्रंदिवस या शाळेचं बघून थकून जात असाल नाहीं ? ’

‘ नाहीं. त्याचं कारण आहे. एकदां घालून दिलेला धडा माझीं मुलं बरोबर गिरवतात. शिक्षक चांगले आहेत. शाळा म्हणण्यापेक्षां आम्ही एका कुटुंबांतले आहोंत, एकमेकांना शिकवतों. आनंदानं जगतों. ’

भाऊंच्या वागण्याच्या आणि बोलण्याच्या या प्रकारानं माझ्या मनाला जास्तच धक्का दिला. एवढया मोठ्या मनानं वागणारीं माणसं मीं पाहिलीं नव्हतीं. त्यामुळं मला सारं अद्‌भुतरम्य वाटूं लागलं...जादूची कांडी फिरवून सारं घडावं तसा मला भास झाला म्हणून मीं स्वतःला चिमटा घेऊन सावध केलं.

त्यावेळीं भाऊ आणखी सांगत होते, ‘ मीं घरांत तसा ताण पडूं देत नाहीं. स्वतःचे कपडे धुतों. बायकोचेहि मधून मधून धुतों. ’

‘ काय म्हणतां ? ’

‘ खरं आहे तें सांगतों. मला थापा मारणं आवडत नाहीं. ’

‘ खरंच सांगतांय् तुम्हीं हें ? ’

‘ माझ्या बायकोला विचारा. तीहि हेंच सांगेल. ती थकली कीं सैंपाक देखील करतों ! ’

‘ मला नाहीं खरं वाटत ! ’

भाऊंच्या खरेपणावर मीं शंका घेतली तशी त्यांनीं थोड्या वेळानं मला आपल्या घरीं नेली. घर दाखवलं. तिथल्या प्रसन्नतेनंहि मी भारावलें. साधंच लहानसं घर. पण स्वच्छ होतं. मोजकंच सामान पण नीटनेटकं ठेवलं होतं. आणि भाऊंची बायको ? ती होती साध्या निळसर नऊवारी लुगड्यांत ! अंगावर मंगळसूत्राशिवाय दागिना नव्हता. हातांत कांचेच्या बांगड्या होत्या. पायांत जोडवीं होतीं. सैलसर अंबाडा घातलेला. पावली एवढं कुंकू लावलेलं. चेहरा प्रसन्न. मन तजेलदार, वाणी प्रेमळ. वागणं निर्मळ. त्यांना कांहीं विचारून खरंखोटं करायची हिंमत मला झाली नाहीं. मी नव्या नवरीसारखी तिथं गप्प बसून राहिलें.

अखेरशेवटीं भाऊ शाळेकडे निघून गेल्यावर त्यांच्या बायकोला मीं विचारलं, ‘ भाऊंचं वागणं तुम्हांला आवडतं ? ’

‘ कां नाहीं आवडावं ?...त्यांच्यामुळं तर जीवनाला शोभा आली

आमच्या...नाहींतर खूप पैसे मिळतात म्हणून आम्ही चैनींत रहातों तर माणुसकी जाती !...आपले हात स्वच्छ ठेवायला का आहेत ? सेवेनं त्यांना पावित्र्य आलं पाहिजे. खरं नाहीं का ? '

भाऊंच्या बायकोच्या–ताईंच्या–या बोलण्याला मी काय उत्तर देऊं ? माझ्या दरिद्री मनाची मला एकदां कींव आली. पण गप्प बसायचं भान मला राहिलं नाहीं. म्हणून मी त्यांना विचारून बसलें, 'भाऊंना पगार किती ?' तशा त्या चटकन् म्हणाल्या, 'पुष्कळ आहे ! पण मी आंकडा विचारायला विसरलें !...मला त्याची कधीं गरजच भासली नाहीं. वेळेला सारं घरांत येतं तेव्हां पैशांची नि माझी गांठ पडतेच आहे कशाला ?.... '

आतां मात्र मीं जीभ आवरली. ताई चहा करतांना व तो पितांना घरांतले काय काय सांगत होत्या. म्हणून मग मला वाचा फुटली नाहीं ! श्रीमंतींत सुख मानणाऱ्या आणि स्वतः आपण मिळवल्या आहोंत अशी घमेंड बाळगणाऱ्या माझ्या मनाला कसलीच हिंमत होईना. मुकं जनावर देखील एकपरी बरं मी म्हणतें, मान नाहींतर शेपूट तरी हालवील. पण माझ्याच्यांनीं हातांतील चहाची कपबशी देखील विसळायची झाली नाहीं ! मीं 'आ' वासून वेड्यासारखी ताईंच्याकडे पहातच राहिलें. नव्हें उठतां बसतां नवऱ्याचा उणेपणा काढून त्याला हिणवण्यांत सुख मानणाऱ्या माझ्या ओळखीच्या बायकांची तरफदारी कोणत्या तोंडानं करायची होती मीं ?...माझ्याजवळ लोकांना सांगण्यासारखं होतंच काय मुळीं ?

पण त्याची आतां कुठं मला जाणीव झाली होती. आणि म्हणून माझा जीव खुळा भैरा झाला होता ! ..अंतरंगाच्या सजावटीपेक्षां बहिरंगाच्या सजावटीच्या खुळ्या कल्पनेनं बरबटलेलं माझं मन आतां पार मरून गेलं होतं !...हुंकार घालून जिवंतपणाची साक्ष द्यायची देखील त्याला हिंमत होत नव्हती !...

● ● ●

# ५ : तूं मला आवडतेस—

" आतां एवढी एक गोळी खा म्हणजे थोड्या वेळानं ताप कमी होईल. तोंवर मी पुन्हां येतोंच." डॉक्टरांचा आवाज माझ्या कानावर आला आणि कुणीतरी मला हळूंच उठवीत म्हणालं, " हं, घ्या ही गोळी आणि वर थोडं पाणी प्या." मला त्यावेळीं सपाटून ताप भरला होता. डोळे उघडून समोर बघवत नव्हतं. सगळ्या अंगाला ठणका लागला होता. कोणींतरी जोरानं अंग दाबावं असं वाटत होतं. पण सांगणार कुणाला ? विशेष ओळख तरी कोणाची होती तिथं ? आणि त्या पोरकेपणाच्या जाणीवेनंच ताप होता त्यापेक्षां मला थोडा जास्त जाणवत होता.

" पुरें पुरें." घोटभर पाणी तोंडांत घेतलं पण भारी कडू लागलं, म्हणून हळूंच डोळे उघडीत समोरच्या व्यक्तीच्या हातांतला पेला मीं बाजूला सारला. खरं म्हणजे मला समोर बघवत नव्हतं. पण डोळे जेवढे उघडले आणि तेवढ्यांत जेवढं दिसलं तेवढ्यावरून मला कळून चुकलं कीं, जी मला फार आवडत होती तीच तरुणी हातांत पेला घेऊन समोर उभी होती. तिचा माझा तसा परिचय नव्हता, तरी मीं तिच्या हाताला घट्ट आवळून धरीत तिला म्हटलं, " घटकाभर बसा माझ्याजवळ." आणि तीहि बिचारी बसली.

तापाची झांपड डोळ्यावर होती आणि अंग ठणकत होतं, तरी त्या मुलीचा हात माझ्या हातांत होता, या भावनेनं मी निश्चिंतपणें एका अंगावर पडलें होतें. कांहीं तरी अंगावर पांघरायला हवं होतं, पण तिथं कोठून आणणार ? पुण्याच्या असेंब्ली हॉलच्या लेडीज रूममध्यें मी झोंपलेली ! तिथं थोडंच घरासारखं कांहीं मिळणार होतं ?...आणि निदान सभेच्या कामासाठीं आम्हीं सगळीजणंच एवढ्या लांबून आलेलों तेव्हां पुण्यांत आम्हांला घर तरी होतं कुठं ?...नाहीं म्हणायला आम्हीं उतरलेली क्वीन्स

बॅरॅक्सची जागा आम्हांला घरासारखी होती, आणि तिथं रहाणारे आमदार आमचे नातेवाईक बनले होते, इतकंच काय तें !

"अंग चेपून देऊं का थोडं ?" त्या मुलीनं कानाशीं तोंड आणून मला प्रश्न केला. तिचा हात माझ्या हातांत होता. त्यामुळं तिला चरका बसत होता तरी तो आणखी घट्ट धरून मी म्हणालें, "कशाला घेतां आपण तसदी ?"

पण माझ्या बोलण्याकडे दुर्लक्ष करीत व माझ्या अंगावरून भरभर हातानं दाबीत ती म्हणाली, "छे ! असं नका बोलूं...अशावेळीं ज्याला मन आहे अशा माणसानं पडेल तो त्रास हा घेतलाच पाहिजे. नाहींतर...होय, नाहींतर तो माणसांतून उठेल !"

तिचं हें बोलणं कोणाला उद्देशून होतं मला ठाऊक नव्हतं. तरीपण तें ऐकून कुठंतरी खटकल्यासारखं मात्र वाटलं; म्हणून मीं मान वळवून तिच्याकडे पाहिलं तों तिच्या डोळ्यांत पाणी तरारलं होतं...

"काय झालं हो ?" उठवत नव्हतं तरी मीं उठायची धडपड केली. तिच्या डोळ्यांत पाणी बघून माझ्या जिवाची घालमेल झाली. मला कसंतरीच वाटलं. इतके दिवस अगदीं खेळकर वाटणारी ही मुलगी एकदम गंभीर झाली हें माझ्या मनाला पटेनाच !

"कुठं काय आहे ?" माझे पाय चेपण्यांत तिचे हात गुंतले होते म्हणून मान हलवूनच तिनं डोळ्यांतील पाणी उडवलं आणि ती हंसली. इतक्यांत सभागृहांतील घंटा अचानक वाजूं लागली; चालू बिलाच्या चर्चेवर मत मोजणीचा प्रश्न अचानक निर्माण झाला असावा म्हणून, मला जातां येत नव्हतं तरी मी तिला म्हणालें, "तुम्ही जा ... तुम्हांला गेलंच पाहिजे...." पण ती म्हणाली, "तुम्हांला अशी टाकून कशी जाऊं मी ! जातील बाकीचे लोक."

"छे छे ! असं नका करूं. जा तुम्ही. काम झालं कीं, पुन्हा या." मीं तिला आग्रह केला म्हणून ती मुकाट्यानं गेली. जातांना मला वारं लागूं नये म्हणून तिनं दरवाजा लावून घेतला. पण क्षणभर ती बाहेरून जातांना मला दिसली. नेहमींच्या थाटांत यावेळीं तिला चालतांना बघून मी पुटपुटलें, "खरंच, तूं मला फार आवडतेस. तुझं नांव गांव मला

माहीत नसलं तरीहि तुझ्याबद्दल फार आदर वाटतो. ”

आणि मला मनापासून खरंच तसं वाटत होतं. गेले दहाबारा दिवस आम्ही एकत्र आलों होतों. एका सभागृहांत दिवसाकाठीं निदान चारपांच तास तरी आम्ही एकत्र असूं; पण ती आणि मी एकमेकींशीं आजच बोललों होतों! मी बसत असें मंत्र्यांच्या शेजारीं, स्त्रियांच्यासाठीं राखून ठेवलेल्या आडव्या कोचावर आणि इतर स्त्रिया माझ्या आसपास बसत असल्या तरीहि ही एकटीच मागं एका कोपऱ्यांत जाऊन बसायची! अगदीं एकटी–एकटी असायची ती नेहमीं. पण एकलेपणाच्या आगीचा तिला कधीं चटका बसल्याचं दिसून आलं नाहीं. जेव्हां पहावं तेव्हां हंसत मुख. अंगावर रोज परीटघडीचं शुभ्र पातळ, हातांत दोन दोन कांचेच्या पिवळ्या बांगड्या आणि कपाळावर पावलीएवढं मोठं कुंकू, यापलीकडे तिचा निराळा असा पोषाख कधीं दिसला नाहीं. एक चामड्याची छोटी बॅग खांकोटीशी मारलेली आणि चालणं अगदीं जलद पण ठेकेदार असायचं तिचं. मान कशी वाकवायची असते हें तिला ठाऊक आहे कीं नाहीं असं मला वाटायचं. पण सभापति आले अगर ती सभागृहांत आली कीं, दृष्ट लागेल असा मनोवेधक मुजरा करायची! ... आणि जेव्हां मान वळवून मागच्या बाजूला बघावं तेव्हां ही आपली पेन्सिल फिरवीत बसलेली दिसायची. मग ती कांहीं लिहीत होती कीं चित्रं काढीत होती हें तिचं तिलाच माहीत!...एक दोनदां ती सभागृहांत बोलली देखील एवढ्या मुदतींत. पण अगदीं मुद्देसूद आणि विषयाला धरून. त्यामुळं सर्वांनीं तिचं कौतुक केलं खरं, पण तिच्या चेहऱ्यावर त्याचा कांहींच परिणाम झालेला दिसला नाहीं....ती आपल्याच नादांत सदा असायची. कोणी आपण-हून बोललं तरच तेवढ्यापुरतं बोलायची आणि चहा पीत असतां शेजारीं कोणी दिसलं तरच ‘ चहा घ्या ’ म्हणायची! एरव्हीं तिची तीच एकटी.

“ लॉबींत जाऊन व्होटिंगची भानगड पहावी लागली नाहीं. नुसते दोन्ही बाजूंचे लोक उभे करूनच मतदान झालं...” मी तिच्याविषयीं असा विचार करीत असतांनाच अचानक आंत येतं तिनं ही माहिती मला दिली आणि माझ्या कपाळावर हात ठेवीत पुन्हां म्हटलं, “ कसं वाटतंय आतां? बरं आहे? ”

" तुम्ही आलांत तेव्हां एकदम बरं वाटतंय." मींहि तितक्याच आपुलकीनं तिच्याकडे पाहिलं. त्यामुळं माझं डोकं चेपल्यासारखं करीत व डॉक्टरांनीं तिच्याजवळ दिलेली दुसरी गोळी मला देत ती म्हणाली, " आतां घ्या ही गोळी म्हणजे एकदम बऱ्या व्हाल....पण..."

" आणखी एक गोळी आहे ? " ती अडखळली म्हणून मला थोडी शंका आली.

" नाहीं, एवढीच. घ्या ती. " तिनं ती गोळी माझ्या हातांत देऊन पाण्याचा पेला पुढं केला आणि मीं ती गोळी घशाखालीं ढकलतांच गंभीरपणानं खिडकींतून बाहेर पहात म्हटलं, " तुम्हीं कांहीं म्हणा... औषधापेक्षां अशा वेळीं मायेचं माणूस जवळ पाहिजे. नाहीं का ? "

" होय. म्हणून तर म्हटलं तुम्ही आलांत तेव्हां एकदम बरं वाटतंय् म्हणून...मघांशीं कोण त्रास होत होता. वाटत होतं धडपणें सभागृहाबाहेर येतेंय् कीं मधेंच कोलमडतेंय् ! ..पण आतां बरीक थोडं बरं वाटतंय्..."

" तात्पुरता उपचार आहे हा. खोलीवर गेल्यावर पुन्हां नीट उपचार हवेतच करायला. "

" गेला ताप एवढ्यानं तर ठीकच, नाहींतर पहातां येईल. "

" छे ! असं दुर्लक्ष नको बाई व्हायला. मला चांगला अनुभव आलाय् आणि हा इन्फ्लुएन्झाचा ताप तसा फार वाईट. एकदम थकतं माणूस. "

" तुम्हांला पण आला होता ! "

" होय...मोठा अटॅक होता चांगला ! "

" कधीं हो ! "

" मागें एक वर्षापूर्वींची गोष्ट. म्हणून म्हणतें, नीट सांभाळायला हवं. "

तिचं माझं हें बोलणं चाललं होतं इतक्यांत ' मिस देसाई, काय म्हणतोय् पेशंट ? ' अशी चौकशी करीत डॉक्टर आंत आल्यामुळं माझ्याजवळून उठत ती म्हणाली, " मघांपेक्षां ठीक आहे. पण एखादं इंजक्शन द्याल तर बरं. "

" त्याच तयारीनं आलोंय् ! " डॉक्टरांनीं आपली बॅग उघडली. आमच्या सारखेच तेहि एक आमदार असल्यामुळं विशेष आपुलकीनं त्यांनीं मदत देऊं केली होती...इंजक्शन देऊन ते परत जातेवेळीं देसाईला

म्हणाले, हो, त्यांच्या तोंडूनच कळलं मला तिचं खरं नांव. " थोड्या वेळानं ह्यांना पोंचवा घरीं. लागली तर माझी मोटार घेऊन जा." आणि ते निघून गेले.

" तुमची नि डॉक्टरांची जुनी ओळख आहे ? "

" हो. माझ्या भावाचे ते मित्र म्हणून तर तुमच्यासाठीं सांगितलं मीं त्यांना !...तुमचे डोळे अचानक लाल दिसले तेंव्हां म्हटलं तुम्हांला ताप भरला असणार !... "

" म्हणजे तुम्हीहि निम्या अर्धा डॉक्टर आहांतच कीं ! "

" होय...परिस्थितींत सगळं शहाणपण येतं माणसाला आपोआप... मला हा ताप आला त्यावेळीं मुंबईत जोरांत साथ होती म्हणे. आणि त्यावेळीं आमच्या एका स्नेह्यांकडे मी दादरला होतें. अचानक सपाटून ताप भरला म्हणून ते लोक म्हणाले रहा इथंच. मला काय, मुंबईला स्त्रियांच्या एका सभेसाठीं मी आलेली म्हणून कुठंहि राहिलं तरी सारखंच. म्हणून म्हटलं मी उतरलें होतें त्या हॉटेलमध्यें जाऊन एकटंच बसण्यापेक्षां 'रहा' म्हणताहेत तर माणसांत राहिलेलं बरं, आणि मी राहिलें.

" पण काय सांगूं तुम्हांला !... 'खास आपलीं माणसं' आपण ज्यांना म्हणतों तींच खरीं आपलीं नसतात, याचा मला त्यावेळीं खास अनुभव आला बघा. घरांत खंडीभर माणसं नसलीं तरी जेवढीं होतीं तेवढीं आपापल्या खोलींत जाऊन झोपलीं आणि ती रात्र मीं एकटीनं तळमळत काढली... जवळ पाणी द्यायला कोणी नाहीं कीं 'तुझं कसं आहे' असं म्हणायला देखील कोणी नाहीं ! रात्रींतून दोनतीनदां पाण्यापायीं जीव कासावीस झाला. माशासारखी अक्षरशः तडफडलें मीं...आईवडिलांना न भेटतांच मी मावळतें कीं काय असं दोनचारदां वाटलं, इतका भयंकर त्रास होत होता ! पण नशीब म्हणून वांचलें...

" पहांट झाली मात्र आणि मग मला तिथं दम निघाला नाहीं. अंगांत ताप होता तरी मी तशीच तिथून निघून आलें आणि ठरवलं कीं, जगाची आपण पर्वा नाहीं करायची ! एरव्हीं उपयोगी पडतील अशीं वाटणारीं माणसं वेळ आली म्हणजे कोणी कोणाचं नव्हे हें सिद्ध करतात असं...जाऊं द्या. दुसऱ्याबद्दल मला कांहीं म्हणायचं नाहीं.

माझ्यापुरतं मी पहाणार...आणि म्हणूनच आपण सगळे इथं नवीन आलें आहोंत तरी मघांपर्यंत मी तुमची चौकशी केली नव्हती. 'प्रसंगानंच झाली ओळख तर ठीक' असं मीं ठरवलं होतं. आयुष्यांत मनाला भेगा पडणारे असे कांहीं प्रसंग जरी आले तरी मैत्रीबद्दल मन उबगतं...बरं, तें जाऊं द्या. चहा मागवूं का?"

आपल्या आयुष्यांतील एक चमत्कारिक अनुभव सांगतां सांगतां देखील विशेष खोलांत न जातां मन आवरून मिस् देसाईनं पुन्हां माझी विचारपूस केली. पण तिची गोष्ट ऐकतांना भांबावून गेलेलं माझं मन ठिकाणावर नसल्यानं मीं तिला कांहींच उत्तर दिलं नाहीं. आपल्यावर असा प्रसंग न येतां ताप निघतो कधीं याचाच मी विचार करीत होतें...

इतक्यांत साडेचारची मधली सुटी झाली. सारी मंडळी सभागृहांतून बाहेर आली. आमच्या इतर स्त्रीसभासदहि, मी निजलें होतें तिथं आल्या. अजून फारशी ओळखपाळख झाली नसल्यामुळं 'अरे, झोपल्यांत आज इथं?' असं किंवा 'ताप आलाय् तर घरीं जा ना!' या पलीकडे कोणी बोललं नाहीं. ड्रेसिंग टेबलाच्या आरशांत बघून व आपण ठाकठीक असल्याची खात्री करून घेऊन सगळ्याजणी चहा प्यायला म्हणून शेजारच्या कॅंटीनमध्यें निघून गेल्या...

"माझं नांव उषा. तुम्ही मला त्याच नांवानं हांक मारीत जा आणि मी तुम्हांला 'ताई' म्हणत जाईन. मला फार आवडतं...हं, तर ताई-साहेब खोलीवर जायच्या तयारींत रहा. तोंवर मी टॅक्सी घेऊन येतें..." मिस् देसाईनं त्या निघून गेलेल्या बायकांचेकडे दारावरचा पडदा सारीत रोखून पाहिलं आणि ती बाहेर निघून गेली.

उषा कोणाची कोण! ना ओळख ना पाळख पूर्वींची! मी महा-राष्ट्रांतील आणि ती गुजराथेंतील! तिची आणि माझी रेजिम्स बसायची जागा देखील लांब लांब होती...आणि असं असतांना इतक्या जिव्हाळ्यानं ती माझं दुखणं-खुपणं पहात होती, हें बघून कांहींसा आनंद झाला असला तरी मला बरंचसं संकोचल्यासारखंच होत होतं...

"हां चला. आली मोटार." चारदोन मिनिटांतच उषा आंत आली आणि माझ्या मानेखालीं हात घालून तिनं मला उठवलं.

" एवढ्यांत कोठून आणलीत मोटार ? " मला थोडं नवलच वाटलं !

" ह्या पार्क केलेल्या मोटारी सगळ्या आपल्याच !...इथं येणारीं सगळीं माणसं आतां एकमेकांचीं नातेवाईक समजायचीं. "

" तुम्ही मराठी छानच बोलतां हं ! "

" मला सगळ्या भाषा येतात. रोज एक तास त्यासाठींच घालवतें मी....बरं आतां मुद्दा तो नाहीं. चला बघूं. सावकाश हं!... " उषानं मला धरून बाहेर उभ्या असलेल्या मोटारीपर्यंत नेलं. बिचारीनं माझा पदर देखील सारवला, केस नीट केले नि आपल्या खांद्यावर माझा भार घेऊन व्यवस्थित बाहेर आणली.

" क्वीन्स बरॅक्स ! " ड्रायव्हरला उषानं अगदीं थोडक्यांत पत्ता दिला आणि गाडी सुरू झाली.

कौन्सिल हॉलपासून थोड्या अंतरावर ही जागा असल्यामुळं पांच मिनिटांत आम्ही तिथं आलों. मला वाटलं ती माझ्या खोलींत मला नेऊन सोडणार, म्हणून ड्रायव्हरला मीं तसं सांगितलं. पण माझ्यापेक्षां मोठ्या आवाजांत तिनं आपल्या खोलीचा रस्ता ड्रायव्हरला दाखविल्यामुळं मोटरचीं चाकं त्या बाजूनं धावूं लागलीं...तेव्हां मी बोललें,

" तुम्हांला कशाला त्रास ? " पण मग उषानं हलकेंच मला आंत आणून आपल्या कॉटवर निजवलं आणि म्हटलं, " माणसं जन्माला येतांनाच कांहीं ऋणानुबंध घेऊन येत असतात. त्यांपैकींच हा प्रकार. मी गुजराथेंत रहात असलें तरी माझं आजोळ आहे कोल्हापूरला.... "

" खरं म्हणतां ? "

" हो ना. पण मी अजून कधीं गेलें नाहीं. पुस्तकांतच वाचलंय् सगळं .. " स्टोव्ह पेटवून चहाची तयारी आतां उषानं सुरू केली. आणि मला थोडा थकवा जाणवत होता म्हणून मीं डोळे मिटून भिंतीकडे तोंड केलं...

पण मला झोंप येईना कीं स्वस्थ पडून रहायचीहि इच्छा होईना. उषा-बद्दल मीं ऐकलं होतं तें खरं असावं कीं खोटं असावं, या विचारानं उगाचच त्यावेळीं मी अस्वस्थ होत चाललें...

उषा एका खूप श्रीमंत अशा मोठ्या चित्रकाराची मुलगी होती. आणि बापाच्या इच्छेविरुद्ध एका गरीब चित्रकार मुलावर तिचं प्रेम बसल्यामुळं

तिला वडिलांचं घर सोडावं लागलं होतं !

"छे ! लोक कांहींतरी बडबडतात..." माझी ती ऐकीव बातमी झुगारून देत मीं मनाची समजूत घातली. इतक्यांत चहाचा कप घेऊन माझ्याजवळ येत उषा म्हणाली, "घ्या आतां गरम गरम चहा म्हणजे बरं वाटेल." आणि तिनं बशींत चहा ओतून तो माझ्या ओठांना लावला देखील !

"ताई, त्याचं असं आहे बघा. आपली परिस्थिति कशीहि असली तरी जीवनाकडे पहाण्याची दृष्टि चांगली पाहिजे माणसाची. निदान स्वतःला तरी फसवूं नये आपण कधीं. माणसानं प्रामाणिक असावं." मला चहा पाजवून पुन्हां झोंपवीत उषा बोलत होती आणि मी ऐकत होतें.

"ही पहा आपल्या सभागृहांतील चित्रं !" उषानं मध्येंच विषयाला मुरड घातली आणि एक छोटी वही माझ्यापुढं धरली.

"बघूं बघूं !" उठायचा प्रयत्न करीत मीं त्या वहीवर झडप घातली, तेव्हां मला झोंपवून त्या वहीचं एकेक पान उघडून दाखवीत तिनं सांगितलं, "रोज एक चित्र काढून मी माझ्या जीवनांतील आनंदाची पूजा करतें ... अशींच आहेत नाहीं कांहीं माणसं ?"

उषानं आमच्या स्पीकरपासून तों पार राजदंड घेणाऱ्या शिपायापर्यंत अनेकांचीं वेगवेगळ्या पोझमधील चित्रं काढलीं होतीं ! अगदीं सुटसुटीत नि आटोपशीर तशींच मोठीं रेखीवहि. मला त्या चित्रांमधून प्रगट झालेल्या तिच्या कलाविष्काराचं आणि तिच्या त्या बोलण्याचंहि कौतुक वाटलं, म्हणून मी म्हणालें, "वडिलांची चित्रकलेची इच्छा पुरी करतांय तर !"

"नाहीं. वडिलांचीच केवळ नाहीं. मला आवडणाऱ्या एका गरीब पण हृदयानं श्रीमंत असलेल्या सन्मित्राची इच्छाहि मी डावलूं शकत नाहीं....वडिलांनीं माझा त्याच्याबद्दल अकृत्रिम लोभ बघून मला घराबाहेरचा रस्ता दाखवला त्यांना मीं त्याच्याशीं सलगीनं वागणं पसंत पडलं नाहीं...जाऊ द्या. फार मोठी कहाणी आहे ती ... पण मीसुद्धां त्यांचीच मुलगी. तितकीच स्वाभिमानी आणि तितकीच हट्टीहि. लग्नाच्या भानगडींतून मीं मन काढून घेतलं. माझी मींच आपली समजूत घातली

कीं, ' खरं घर माणसाच्या हृदयांत वसत असतं. त्याला चार भिंतींची अगर वरच्या छपराची आवश्यकता नसते. अस्थिर जगाच्या हालचालींत मनाला स्थिरता आली म्हणजे ह्या घराची इमारत बांधली जाते...खुद्द मृत्यु देखील तिला इजा पोचवूं शकत नाहीं.... म्हणून म्हणतें आपण सगळींच एकमेकांना आवडणारीं माणसं लग्नानंच केवळ एकत्र येतों असं नाहीं. आपले कांहीं स्नेहीच इतके चांगले असतात कीं, आपल्यासाठीं त्यांनीं एक निराळंच घर निर्माण केलेलं असतं. माणुसकीच्या भिंती त्याच्यासाठीं बांधलेल्या असतात. प्रामाणिकपणाचं छप्पर त्यांवर उभारलेलं असतं. कर्तव्याला तीं जागत असतात...."

उषा बोलतां बोलतां उठली आणि तिनं निवत चाललेला आपल्या वाटचा चहा घेतला. तिच्या जीवनाचं हें स्वानुभवाचं शब्दचित्र ऐकतांना अगोदरच तिच्याबद्दल वाटणारा आदर माझ्या मनांत वाढला...डोळे मिटले असतांनाहि कौन्सिल हॉलवर वावरणारी उषा आज मला दिसूं लागली....पिजनहोलमधील आपले कागद काढून घेतांना, रोलवर सही करतांना, ग्रंथालयांत वर्तमानपत्रें वाचतांना, कँटीनमध्यें चहा घेतांना, इतर सभासदांशीं बोलतांना, सभागृहांत जातांना येतांना आपल्याच नादांत असणारी आणि सदा आनंदी दिसणारी उषा मला ' कां कुणांस ठाऊक ' भारी आवडत होती...आणि आतां तें दूरचं काल्पनिक आवडणं तिच्या सहवासानं वाढीला लागायच्या तयारीनंच अकस्मात् अंकुरलेलं बघून मला फार समाधान वाटलं. तिच्या जवळच्या विचारसरणीनं माझ्या मनाला भुरळ पाडली...त्यामुळं मीं तिला एवढंच म्हटलं, " आणि म्हणूनच मला तूं फार आवडतेस...तुझं बोलणं, तुझे विचार सारे तुझ्या कृतींतहि विलीन झालेत. जगांत हेंच फार दुर्मिळ असतं..."

त्यावर माझ्याजवळ येऊन माझ्या अंगावर चादर घालीत गोडसं हंसून तिनं मला बजावलं, अं हं !...माणसानं आपल्या प्रेमाचा उच्चार नाहीं करूं. मनांतच तें सांठवून ठेवावं, नाहींतर त्याला दृष्ट लागते. मुग्धतेंत देखील विलोभनीय सौंदर्य असतं ताई...कधीं समजायचं ग तुला हें ?... बरं तें बघूं मग. झोंप हं आतां निवांत. डरो मत. मी जवळ असल्यावर तूं खात्रीनं बरी होशील. औषधापेक्षां जिव्हाळ्याची मलमपट्टीच प्रभावी ठरते

म्हणे...खरं का ग?..." आणि आम्ही दोघींनींहि एकमेकींना एवढी घट्ट मिठी मारली कीं, न बोलतांहि मनांतल्या साऱ्या भावना एकमेकींना समजल्या. दोघींच्या मधलं इतक्या दिवसांचं अंतर क्षणार्धांत विलीन झालं...

## ६ : कुंकवाचं वर्ख

मी रहात होतें त्या खोलींत तसा उजेड भरपूर होता. हवा खेळती होती. सामानसुमान बेताचंच पण हवं तेवढं होतं. एक सोडून विजेचे दोन दिवे होते. डोक्यावर विजेचा पंखा होता. दारावर पडदा होता. लिहायला टेबल होतं. बसायला आरामखुर्ची होती. निजायला प्रशस्त पलंग होता. कपडे ठेवायला आरशाचं कपाट होतं. म्हणजे मला लागणारं कांहीं नव्हतं असं नाहीं. सगळं कांहीं होतं. तरीपण मी आज विलक्षण अस्वस्थ होतें. पंखा सुरू केला होता. तरी मला गुदमरल्यासारखं होत होतं. म्हणून मी इकडून तिकडे फिरत येरझाऱ्या घालीत होतें. हातांतील वर्तमानपत्रानं व रुमालानं तोंडावर वारं घेत होतें...

पण कांहीं केल्या मला चैन पडेना. उचलून टाकल्यासारखं वाटायला लागलं होतं...त्यामुळं मीं गार पाण्यानं माझं तोंड स्वच्छ धुतलं. माथ्यावरहि गार पाण्याचा हबका मारला; आणि मग टॉवेलनं तोंड पुशीत आरशापुढं आलें तशी मी एकदम दचकलें. तोंड धुतलं होतं तरी कुंकूं तसंच होतं आणि त्याभोंवतीं उमटलेला वर्खाचा छापहि शाबूत होता ! मी चटकन् मागं झालें आणि नळावर जाऊन साबणाची वडी बरीचशी झिजस्तोंवर माझं कपाळ घासून घासून वर्ख काढीत बसलें...पण मी गार पाण्याचा हबका तोंडावर जसजसा मारीत गेलें, तसं तसं मला भारी झोंबल्यासारखं वाटूं लागलं. म्हणून मग पदरानं तोंड टिपून मी कुंकूं न लावतां तशीच पलंगावर पडून राहिलें...वाटलं आतां तरी मला शांत वाटेल. पण तसं झालं नाहीं. माझी अस्वस्थता वाढतच गेली...

आणि जास्तच खुळ्याभैऱ्यासारखं झालं, म्हणून दोन्ही हातांनीं माझं तोंड गच्च धरून मी किंचाळलें, 'वन्दन, शपथ रे आतां मी पुन्हां कध्धीं म्हणून कध्धीं वर्ख लावणार नाहीं!...' पण मग मला फार भीति वाटली.

आणि म्हणूनच कशी कोण जाणें मी चटकन् आरशापुढं गेलें आणि भरंदिशीं कुंकूं लावून नेहमींसारखं वर्खहि कपाळावर चिकटवून मोकळी झालें !...आतां कुठं मला थोडं हायसं वाटलं...कारण माझ्या वन्दनसाठींच जन्मभर कुंकवाभोंवतीं वर्खाचा छाप उठवीन म्हणून मीं एका माणसाजवळ शपथ घेतली होती ! आणि ती मोडली तर वंदनच्या जिवाला कांहीं बरं-वाईट होईल या धास्तीनं माझं काळीज नेहमींच दडपल्यासारखं असायचं तें आतां आणखीन् दडपून गेलं...मला जोराचा हुंदका आला. ओक्सा-बोक्शीं रडत मी आणखी एकदां ओरडलें, 'वंदन, एवढी अट घालशील तर माझी शपथ आहे तुला !...'

तेवढ्यांत खाड्दिशीं दार उघडल्याचा आवाज झाला...आणि पडदा बाजूला सारून वंदननं आंत येत मला खडसावून विचारलं, 'कसल्या नाटकाची रंगीत तालीम चाललीय ही ? '...तशी मी चपापलें. गालावरचे अश्रू पदरानं टिपले. चोरासारखी एका कोपऱ्यांत उभी राहिलें. मला कापरं भरलं...पण कांहीं केल्या माझी दांतखिळी उचलली नाहीं....

वन्दन रागावला. नजरेनं त्यानं मला खाऊन टाकली आणि 'थांब, माझ्याच हातानं तुझं कुंकूं पुसून टाकतों' असं ठणकावून बोलत माझ्या-जवळ येऊन त्यानं माझ्या कपाळावरून जोरानं हात फिरवला...तशी मात्र मी त्याच्या अंगावर ओरडलें, 'हें काय चालवलं आहेस तूं ?....'

आणि मग त्यानंहि माझ्यावर तोंडसुख घेत म्हटलं, 'आजपर्यंत बोललों नाहीं. पण आतां सांगतों कीं, ह्या वर्खानं तुझ्या जन्माचं वाटोळं केलंय ! इषारा देऊन ठेवतों. वेळींच सावध हो. नाहींतर हातातोंडाशीं आलेलं सुख गमावून बसशील !...'

'वन्दन ! '...माझ्या छातींत धस्स झालं...त्याच्या हाताला धरून त्याला खालीं बसवावं आणि सगळं कांहीं स्पष्ट बोल म्हणावं म्हणून मी त्याचा हात धरायसाठीं वेगानं पुढं झालें. तशी तो हातभर त्याच वेगानं मागं सरकला आणि दांत ओठ खात माझ्याकडे पुन्हां एकवार रागानं बघत सरळ खोलींतून निघून गेला. विजेसारखी मी त्याच्यामागून धांवलें. 'थांब थांब' म्हणून मोठ्यानं ओरडलें देखील ! पण तो गेला तो गेलाच. हां हां म्हणतां समोरचा रस्ता ओलांडून तो दिसेनासा झाला ! तोंडांत

बोट घालून मी भावलीसारखी दरवाजांत निश्चल उभी राहिलें...आणि एकाएकीं छाती फुटतेय असं वाटलं म्हणून तिथंच खालीं बसलें. तशी माझा आवाज आंत ओढला गेला आणि श्वासोच्छ्वास देखील आंतल्या आंत कोंडला गेला...

त्यानंतर आमच्या शेजारच्या एका बाईनीं 'काय झालं ?...काय झालं?' असं विचारीत मला उठवली नसती, तर मी त्याच अवस्थेंत किती वेळ घुटमळलें असतें कुणाला माहीत.

पण एकपरी तसं झालं असतं तर बरं झालं असतं, मी म्हणतें. तेवढाच माझा मला विसर पडला असता आणि मला नेमकं तेंच हवं होतं. परंतु त्या बाईनीं घोटाळा केला. मध्येंच येऊन मला माझ्या तंद्रींतून जागी केली आणि तेवढ्यावर गप्प न बसतां त्यांनीं माझ्यापुढं अनेक प्रश्नांचा ढीग उभा करीत सारखं विचारलं, 'काय झालं हो ?' त्यामुळं मी बरीक थोडी ओशाळलें आणि 'डोकं दुखतंय' एवढंच उत्तर देत खालीं मान घालून माझी खोली गांठली..

त्यावेळीं मला एकसारखं वाटलं कीं, आपल्या मनांतील ही अस्वस्थता आपण कुणाला तरी बोलून दाखवावी, त्याखेरीज मनाला शांति मिळायची नाहीं. पण कुणाजवळ बोलायचं ? आणि गेले कितीक दिवस माझ्या मनांत कायमचं घर करून बसलेल्या व चिरंजीव होत चाललेल्या कल्पनेला भगदाड पडूं पहात आहे असं बोलायचं तरीं कसं ? कारण इतके दिवस खाजगी म्हणून माझ्याजवळ वावरलेली भावना सार्वजनिक जीवनांत उत-रायला सहजासहजीं राजी होईना ! त्यामुळं मला भारी वेड्यासारखं झालं. माझ्या भावनेला बसलेला जबरदस्त धक्काच मला कांहीं केल्या सहन होईना त्याला मी तरीं काय करूं ? तीक्ष्ण धारेच्या शस्त्रानं भली मोठी जखम होऊन असह्य वेदना व्हाव्यात तसं कांहींसं मला झालं. म्हणून मी डोक्या-वरच्या पंख्याचा वेग वाढवला आणि त्याच्या खालीं फतकल मारून बसून राहिलें.

पण तशा करण्यानं मला जास्तच खुळ्यासारखं झालं...वन्दनच्या स्वभावाला माझ्या कपाळावरचं वर्ख एवढं खुपेल याची मला स्वप्नांत देखील कल्पना आली असती, तर मीं एका माणसाजवळ शपथ घ्यायला धजलें नसतें. पण

माझ्या भोळ्या मनाला त्यावेळीं ही दाद न लागल्यानं तें फसलं आणि त्यानं आतां मला दगा द्यायची वेळ आणलीय, ही नुसती कल्पनादेखील मला सहन होत नाहीं ! माझ्या वैयक्तिक भावनेनं वाहिलेली शपथ प्रामाणिक होती अशी माझी ठाम समजूत आहे; आणि ती वावगी आहे असं म्हणायला अद्यापहि मी तरी तयार नाहीं बाई.

ती शपथ वाहिली त्यावेळीं माझी भावना शुद्ध होती. तो प्रसंग देखील तसा साधा होता. सहजासहजीं सारं घडून आलं होतं.

म्हणजे त्याचं असं झालं कीं, मागं एकदां मी बडोद्याला गेलें होतें. त्यावेळीं आमच्या ओळखीच्या एका माणसाच्या घरीं लग्न होतं. माणसं आमच्या घरोब्यांतील. त्या कारणानं करवली म्हणून माझ्या कपाळावर त्या घरांतील मुलींच्या सारखा कुंकवाचा नक्षीदार मळवट भरला होता. आणि अधून मधून त्यावर वर्खाचे नाजूक छाप उठवून शोभा आणली होती. आरशांत पाहिलं तेव्हां मी हारखलें. मला माझा हा शिणगार आवडला. त्यावेळीं मला निरखून पहात तिथली एक बाई म्हणाली, 'कपाळावर कुंकवाभोंवतीं रोज वर्ख लावा. नवऱ्याचं आयुष्य वाढेल बघा.' तशी मी मनापासून हंसलें. अजून माझं लग्न झालं नव्हतं तरी मी स्वतः तें वन्दनशीं होईल असं मनाशीं पक्कं केलं होतं...म्हणून मी त्या कल्पनेनं भारी लाजलें...माझीं कानशिलं कारण नसतांना गरम झालीं आणि नव्या नवरीप्रमाणं मीं माझ्या माथ्यावरचा पदर पुढं ओढीत त्या बाईला वचन दिलं, 'ऐकेन मी तुमचं...' आणि त्या दिवसापासून मी खरोखरच केवळ वन्दनचं आयुष्य वाढावं या भावनेनं कुंकवाभोंवतीं वर्ख लावीत आलें ! कधीं म्हणून खंड पडूं दिला नाहीं. तुळशीला पाणी घालावं त्या भावनेनं मीं ही कल्पना उराशीं बाळगली.

पण मध्यंतरीं एक दिवस त्या माझ्या भावनेचा कडेलोट झाला. वन्दन-बरोबर मी आमच्या कॉलेजच्या वादविवाद सभेच्या उद्घाटन समारंभाला गेलें होतें. त्यावेळीं माझा पोषाख अगदीं साधा होता. कुणीं माझ्याकडे रोखून बघावं असं कांहीं खास माझ्यापाशीं बिलकुल नव्हतं. पण मी तिथं गेलें तशी प्रत्येकाची नजर माझ्यावर खिळूं लागली ! जणु एखादं कांहीं अद्भुतरम्य असं समोर दिसावं तशांतलाच प्रकार झाला. अखेर शेवटीं मीं

कुणालातरी या चमत्काराचं कारण विचारलं. तशी एकदोन मुलं कुज-बुजल्याचं मीं ऐकलं, ' अरे आज ह्यांनीं वर्ख चिकटवलंय. काय भानगड रे ? ' तेव्हां मात्र मला उलगडा झाला...पण मीं त्यावेळीं कुणाच्या बघण्याला अगर बोलण्याला भीक घातली नाहीं. माझ्या पवित्र कल्पनेशीं मी एकनिष्ठ राहिलें.

परंतु सभा संपवून घरीं येतांना वन्दन जेव्हां कधीं नव्हें तो चिडून मला म्हणाला कीं, 'आजपासून हा नखरा बंद केला पाहिजे तुला...' तेव्हां मात्र मी चपापलें. ह्याच्या मनांत आपल्याविषयीं गैरसमज निर्माण झाला आहे अशी मला दाट शंका आली. म्हणून मी सहज त्याच्या मनांतील काढावं एवढ्यासाठीं म्हणालें, ' माझी ती हौस आहे. '

' हौस ? ' वन्दनला आश्चर्य वाटलं. त्यानं आपली रागीट नजर माझ्याकडे वळवली...आणि विचारलं, ' हौस कुणासाठीं ही ? ' त्यामुळं माझी बाजूहि थोड्या नेटानंच मीं त्याच्यापुढं ठेवली,

' माझ्यासाठीं, माझ्या कल्पनेला साकार करण्यासाठीं. '

' माझं आणि तुझं मन जर एक असेल तर हें चालणार नाहीं. '

' कारण ? '

' मला तें आवडत नाहीं ! '

' आणि मला आवडलं तर ?...'

' तर तुला माझ्यापासून विभक्त व्हावं लागेल ! '

' वन्दन !...'

' मला स्पष्ट बोलायला आवडतं. '

' पण...'

' नाहीं. मी विचार करूनच आज तुला बोलतों आहें. '

' हं !...लोकांनीं माझ्याकडे पाहिलं म्हणून तुझ्यांतील पुरुष का जागा झाला आहे ? ' वन्दनच्या बोलण्याची मला चीड आली म्हणून मीं थोड्या रागानंच त्याच्याकडे बघत असा प्रश्न केला, तेव्हां तो माझ्यापेक्षां दुप्पट चिडून म्हणाला, ' मुळींच नाहीं. माझं मन एवढं क्षुद्र नाहीं. '

' मग ?...'

कारण मला विचारूं नकोस !...पण सांगून ठेवतों कीं, 'मी हवा असेन

तर तुला हें सोडून दिलं पाहिजे. ' वन्दननं माझ्या खोलींत प्रवेश करतांना मला असं निक्षून सांगितलं; आणि आंत आल्याबरोबर त्यानं आपल्या हातानं माझं कुंकूं पुसून टाकायचा प्रयत्न केला !...

पण मी चटकन् दोन हात मागं सरकलें आणि त्याला मोठ्या आवाजांत शपथ घातली, ' कुंकवाला हात घालशील तर माझी शपथ आहे...माझ्या कुंकवाला हात घालशील तर बघ हं...मागं हो !...' तसा तो मागं सरकला.... आणि मग एक शब्दहि न बोलतां सरळ माझ्या खोलीबाहेर निघून गेला...

आणि असं आजपर्यंत एकदां सोडून चांगलं तीनचारदां तरी झालं आहे !....तरी पण आज त्या कल्पनेनं अखेरची मर्यादा गांठली म्हणूनच वन्दन मला कडक इषारा देऊन निघून गेला असला पाहिजे. एरव्हीं एवढी निर्वाणीची भाषा त्याच्या तोंडून तरी निघाली नसती !...आणि म्हणूनच मला भारी वेड्यासारखं झालं आहे. काळजांत कसा आगडोंब उसळला आहे. धरणी ठाव देत नाहीं आणि मनहि आवरत नाहीं अशा दुहेरी कात्रींत मी गुदमरून गेलें आहें...एवढ्या क्षुल्लक गोष्टीसाठीं वन्दननं आपलं माझ्यावरील प्रेम काय म्हणून पणाला लावावं हेंच मला कळत नाहीं ! आणि बायकांच्या असल्या किरकोळ गोष्टींत ह्यानं लक्ष तरी कां घालावं मी म्हणतें ?

नन्दनची मला भारी चीड आली. आणि म्हणून मी एका मैत्रिणीकडे जाऊन तिच्यापुढं हें सारं भाडभाड ओकून टाकीत तिचा सल्ला घ्यावा यासाठीं खोली बंद करून जिना खालीं उतरून आलें...गडबडींत पायांत चपला घालायचं देखील भान राहिलं नाहीं ! तशीच रस्ता कापीत पुढं निघालें. आणि आतां तिच्या घरांत शिरणार, एवढ्यांत माझ्या समोरून वंदन सायकलवरून वेगानं कुठं तरी चाललेला दिसला. मी तिथंच थबकलें. म्हटलं एकदां सोक्ष मोक्ष तरी काय तो लावून मोकळं व्हावं ! आणि त्या चिडीचिडींतच मीं त्याला जोरानं हांक दिली, ' थांब नाहींतर शपथ आहे बघ ! ' तशी त्यानं धांवत्या सायकलला एकदम ब्रेक लावला आणि माझ्या हातांत एक चिठी देऊन आपला रस्ता झटपट सुधारला...क्षणभरहि तो थांबला नाहीं कीं एक शब्दहि बोलला नाहीं. त्या कारणानं माझं डोकं जास्तच भडकलं आणि मी ओरडलें, ' मेल्यानं अगदीं छळवाद मांडला

आहे ! त्यापेक्षां आयुष्यांत न येतां तर किती किती चांगलं होतं ! '

तेवढ्यांत माझा आवाज ऐकून माझी त्या घरांतील मैत्रीण धांवत बाहेर आली आणि मला मिठी मारीत तिनं घाबरून विचारलं, ' काय झालं ग ? ओरडलीस कां ? ' आणिक तिनं आपली भ्यायलेली नजर माझ्यावर अशी रोखली कीं, जणुं कुणाशीं तरी जोराचा सामना खेळूनच मी तिथं उभी राहिलेंय !

पण मी तिच्याशीं बोललें नाहीं. वंदननं दिलेली चिठी माझ्या पोलक्याच्या खिशांत कोंबीत तिला दूर ढकलली आणि स्वतःशींच पुटपुटलें, ' काय व्हायचं असेल तें होऊं दे. नशिबानं कपाळावर ओढलेली रेघ कांहीं झालं तरी कुणी पुसत नाहीं.'

त्यामुळं माझी मैत्रीण आणखीनच घाबरली. मला गदगदां हालवीत तिनं विचारलं, ' शुद्धीवर आहेस का ग ? ' आणि तिनं माझ्या अंगाखांद्यावर हात ठेवीत माझ्याजवळ माझ्या आजाराबद्दल चौकशी केली ! आतां तरी मीं तिला उत्तर द्यावं कीं नाहीं? पण अं हं ! मीं तिचा हात झिडकारून टाकला आणि सरळ तिच्या घरांत घुसलें....

' काय होतंय ग तुला ? ' माझ्या मैत्रिणीनं आपल्या पलंगावर मला धरून बसवीत काळजीनं माझी चौकशी केली. पण अजूनहि मैत्रिणीशीं सरळ बोलायची मला बुद्धि झाली नाहीं. मला थोडा वेळ एकटीला गप्प बसायचं होतं म्हणून मीं तिला थाप दिली, ' चहा दे म्हणजे मग बरं वाटेल.' ती बिचारी माझ्या बोलण्यावर विश्वासून ' आत्तां आणतें ' असं आश्वासन देऊन माझ्यापासून निघून गेली...मला एकदम हलकं वाटलं. मी वंदननं दिलेला तो कागद खिशांतून काढला आणि वाचूं लागलें. त्यानं मला लिहिलं होतं—

' माफ कर. तुझ्या भावनेला दुखवावं म्हणून मी ही वर्ख लावण्याची मोडती घालीत नाहीं. बोलणार नव्हतों. तूं ऐकशील असं वाटलं होतं. पण बोलण्याखेरीज गत्यंतर नाहीं. माझं म्हणणं ऐकून तूं मला वेडा म्हणशील, हंसशील. पण माझ्या मनाला मी लपवूं शकत नाहीं. तुझ्यावरील माझं प्रेम प्रामाणिक आहे. श्रद्धेनं मी तुझा हात माझ्या हातांत घेणार आहें. पण... हें बघ, मागं एकदां असंच वर्ख लावल्याकारणानं माझ्या मित्राची

बायको...हो...ती त्याला सोडून न यायच्या वाटेवर निघून गेली. ती देखणी होती. वर्ख लावल्यानं सुंदर दिसायची. हा तिला दृष्ट होईल म्हणून नको म्हणायचा... पण अखेर त्याचं तिनं ऐकलं नाहीं...ती गेली !... संसाराचा डाव तिनं उधळला...

मला ती भीति वाटते...तुझं आयुष्य वाढावं म्हणून मी ही गळ घालीत आहें ..मी हवा असेन तर तूं एवढं ऐक...नाहीं म्हणूं नकोस. माझी शपथ आहे तुला...'

वन्दननं अशी लिहिलेली चिठी भरभर मी एकवेळ वाचून काढली आणि निश्चिंतपणानं पुन्हां वाचणार एवढ्यांत माझी मैत्रीण चहा घेऊन आंत आली. मोठ्या चपळाईनं मीं तो कागद माझ्या खिशांत कसाबसा कोंबला. पण तिनं तें पाहिलं. माझ्या पुढ्यांत चहाची कपबशी ठेवून तिनं मला विचारलं, 'कसली ग चिठी होती ती...?' पण मीं तिला उत्तर दिलं नाहीं. बोललें तर सगळी भावना तिच्यापुढं उघडी होईल म्हणून मीं मोठ्या मुष्किलीनं माझं मन आवरलं. मीं फक्त तिला नकारार्थी मान हालवीत तिनं आणलेली चहाची कपबशी माझ्या हातांत घेतली. आणि आतां तो चहा पिणार एवढ्यांत कसा कोण जाणें मला एवढा जोराचा हुंदका आला कीं, माझ्या हातांतील ती कपबशी निसटली. आणि मी माझ्या मैत्रिणीच्या गळ्याशीं पडून एवढा वेळ दाबून ठेवलेल्या माझ्या मनाला स्वतःशींच पोटभर बोलूं दिलं...

आतां माझं मन आवरणं माझ्याहि आवाक्याबाहेरचं झालं. म्हणून मी पुटपुटलें, 'वाटेल तें झालं तरी तूं मला सोडूं नकोस...तुझ्यासाठींच तर मी वर्ख लावतेंय रे वन्दन ! ..'

पण माझं पुटपुटणं माझ्या मैत्रिणीच्या कानावर गेलं ! ती चपापली. माझं तोंड दोन्ही हातांनीं वर उचलीत तिनं आपल्या पदरानं माझे डोळे पुसले आणि ती म्हणाली, 'खरंच काय झालं ?...वर्खाची काय भानगड ?...'

आतां मात्र मी गडबडलें. माझ्या भावनेला मीं बांध घातला. आपल्या पदरानं नीट डोळे पुशीत मी तिला एवढंच म्हणालें, 'तुला सांगण्यासारखं नाहीं ग !' आणि चटकन् तिथून उठून मी माझ्या खोलीचा रस्ता

पकडला...तशी ती माझ्यामागून धांवत ओरडली, ' अग पण नीट बोलशील तरी की नाहीं...? '

पण मीं नुसतं मागं वळून देखील पाहिलं नाहीं. माझं तिच्याकडे लक्षच नव्हतं !...माझ्या वर्खामुळं अस्वस्थ झालेल्या वन्दनाला माझी भावना केव्हां बोलून दाखवीन याचा मला ध्यास लागला होता. आणि मनांतील सारं कांहीं त्याला लिहून दाखवावं, म्हणून काय काय व कसं कसं लिहायचं याचा विचार करीत मी झपाट्यानं चाललें होतें...

## ७ : हळी

बराच वेळ पडत असलेला पाऊस बंद झाला, तेव्हां गुडघ्यांच्याभोंवतीं घट्ट बसलेली लोकरीची लड मी हळूच काढून घेतली; आणि तशीच खुर्चीच्या दोन्ही हातांना ती गच्च अडकवीत हातांतील लोकरीचा गुंडा खुर्चीवर ठेवून खिडकीशीं आलें. त्यावेळीं घट्ट बसलेली खिडकी दोन्ही हातांनीं जोराचा दाब देत मीं उघडली. तेव्हां काजळलेल्या ढगांतून चमकलेल्या सूर्याचा प्रकाश आंत आला. मन एकदम प्रसन्न झालं. म्हणून गॅलरींत येऊन मी कठड्यावर रेललें आणि इकडे तिकडे नजर टाकली. मला बरं वाटलं. न्हालेल्या केसांतून पाणी निथळलं म्हणजे त्यांना जसा तजेला येतो तसं सभोंवतालचं जग मला दिसलं, म्हणून मी माझ्या समोरून येणाजाणाऱ्या लोकांच्याकडे सहजच टक लावून बघत उभी राहिलें.

एवढ्यांत आमची मीना मोठ्या आनंदानं उड्या मारीत, हंसत खिदळत घरीं येतांना मला दिसली. माझी कल्पना आज मिळणाऱ्या उत्तर पत्रिकेंत तिला भरपूर गुण मिळालेत म्हणूनच ती एवढी खुशीत असावी. म्हणून कधीं नव्हें तों तिच्या दोन्ही मनगटांच्याभोंवतीं गुंडाळलेल्या फुलांच्या गजऱ्यांकडे पहात मीं मोठ्यानं तिला हांक दिली, “पहिला नंबर आला हो ग मीना?”

“आक्का!...” मीनानं हंसतमुखानं एकदम मान वर केली. तशी दोघींची नजरभेट झाली. मीं तिला लौकर वर ये म्हणून मानेनं खुणावलं आणि तिच्या उत्तर पत्रिका बघाव्यात यासाठीं गॅलरींतून जिन्याकडे धांवलें. पण तिथं जाऊन बघतेंय तर मीना खालीं मान घालून गालांतल्या गालांत हंसत आणि लाजत मुरकत जिना चढून वर येत असलेली!...तिच्या एका हातांत कसलसं एक पुडकं होतं आणि दुसरा हात पदराशीं चाळा करीत असलेला!....

" किती गुण मिळाले ग मीना ?..." मला रहावलं नाहीं म्हणून मी आधाशासारखी दोन तीन पायऱ्या उतरून मीनाला सामोरी गेलें, तशी ती एकदम माझ्या कुशींत घुसली आणि एखाद्या लहानग्या मुलाप्रमाणं मला बिलगली. माझी समजूत तिच्या अपेक्षेपेक्षां तिला यश आलं असावं म्हणूनच ती एवढी बालिश होऊन माझ्याकडून बक्षिस उपटायच्या नादांत असावी ! म्हणून तिला घेऊन खोलींत येत मीं तिला म्हटलं, " तूं काय म्हणशील तें देईन. पण आधीं मला सांग तरी सगळं ? "

" खरंच ? मी सांगेन तें देशील आक्का ? " मीनाचा चेहरा खुलला. ती हंसली. तिनं माझ्याकडे मोठ्या आशेनं पाहिलं. म्हणून पुन्हां एकदां मीं होकारार्थी मान हालवली. मीना आणखी एकदां मनापासून हंसली आणि लाजत लाजत तें बरोबर आणलेलं पुडकं उघडीत म्हणाली, " तुला मीं हळी आणलीय्. त्यांनीं दिलेली !

" हळी ?...आणि त्यांनीं दिलेली ?... " मला आश्चर्य वाटलं. मी ' आ ' वासून तिच्याकडे बघतच राहिलें. पण मीनाचं माझ्याकडे लक्षच नव्हतं. ती आपल्याच नादांत होती. हातांतील कागदांत असलेली मोगरीची वेणी माझ्या हातांत ठेवीत तिनं मला बजावलं, " ही वेणी तूं घातलीच पाहिजेस. "

" छे छे !... " मीं एकदम नकार दर्शविला आणि तिच्यापासून दूर होत म्हटलं, " मी वेणी घालीत नाहीं हें तुला माहीत आहे ! "

" हो, म्हणूनच घाल म्हणतंय्....त्यांनीं एवढ्या प्रेमानं दिलीय ती ! एकटींच सगळीं फुलं घालूं ?...नाहीं म्हणूं नकोस हं आक्का !...माझी शपथ आहे ! "

" मीना !... सुटली म्हण .. " मीनाची ही भलतीच शपथ मला आवडली नाहीं म्हणून मी तिला थोड्या रागानंच विचारलं, " असे हे कोण ग गृहस्थ आहेत म्हणून तुझा एवढा आग्रह ? "

" अक्का !... " मीनानं लाजत लाजत मान वर केली आणि माझ्या कुशींत शिरत लाडिकपणानं म्हटलं " त्यांच्याशीं मला लग्न करायचंय !... तुझी परवानगी हवी. ' हो ' म्हण आक्का !... "

मीनाच्या या बोलण्यानं मी थक्क झालें. ही कार्टी एवढ्या लौकर

लग्नाच्या फंदांत पडेल याची मला कल्पना नव्हती. मला चांगलाच हबका बसला. तापलेला तवा भाकरी टाकतांना एकदम मनगटाला डसावा तसं कांहींसं मला झालं म्हणून आश्चर्यानं तिच्यावर माझी नजर रोखीत मीं तिला विचारलं, " काय म्हणतेस ?...कुणाशीं लग्न करायला निघालीस ? "

" अग कीं नाहीं... " मीनानं माझ्या कुशींतून मान वर केली आणि ती वेणी माझ्या केसांच्या वेणीवर माळायसाठीं उठत ती पुन्हां लाजली. तिचे गाल लालबुंद झाले...पण तिचं कौतुक करायच्या अवस्थेंत मी नव्हतें. वेणी घेतलेला तिचा हात मीं खस्दिशीं मागं ओढला आणि तिच्यावर कडाडलें, " मागं हो ! !...मीने तूं काय आरंभलं आहेस ? "

आतां मात्र मीना चपापली. माझ्यापासून हातभार बाजूला सरली आणि घाबरलेल्या नजरेनं माझ्याकडे पहात भीतभीतच म्हणाली, "...म्हणजे मग तूं परवानगी देणार नाहींस ? त्यांना तर मी...हो...तूं परवानगी देशील म्हणून सांगून आलेंय... "

" पण हा गृहस्थ कोण आहे तें तर सांगशील कीं नाहीं अगोदर ? " मीनाचा मला राग आला म्हणून मी थोड्या चिडक्या आवाजांत तिला स्पष्ट विचारलं.

" अक्का !... त्यांच्यावर माझं प्रेम आहे !...तेव्हां अशी पहिल्यापासूनच राग करणार असशील तर... " मीनानं थोड्या धीटपणानं आणि निर्धाराच्या आवाजांत माझ्याशीं असं बोलणं केलं तेव्हां मी गप्प राहिलें... श्वास रोखून तिच्याकडे पहात राहिलें...तिच्या चेहऱ्यावर उमटणारा भाव बघत राहिलें...तशी तीच पुन्हां म्हणाली, " नीट ऐकून घे...माझ्या जागीं तूं आहेस असं समज आणि काय तें बोल ! " तेव्हां माझ्या अंगावर सर्रदिशीं कांटा उभा राहिला. ज्या श्रीकांतानं माझ्या प्रेमाचा अव्हेर केला होता तो श्रीकांत माझ्या नजरेसमोर अचानक आला आणि मी कारण नसतांना एकदम गोंधळून गेलें...मीनाला उत्तर द्यायचं मला भान राहिलं नाहीं...तिच्याजवळून मी उठलें आणि माझी चलबिचल तिच्या लक्षांत येऊं नये म्हणून लोकर गुंडाळीत खालीं मान घालून उभी राहिलें ..

" आक्का !...तसे ते फार चांगले आहेत बघ. भारी गोड आहे त्यांचा

स्वभाव...त्यांनीं आपल्या हातानं माझ्या हातांत फुलांचे हे गजरे बांधले आणि..."

पण मीना असं बोलतांच जेव्हां अडखळली तेव्हां मात्र चमकून मीं तिच्याकडे पाहिलं...ती आणखी काय सांगणार आहे इकडे उत्सुकतेनं मीं कान दिला...परंतु माझ्या न बोलण्यानं थोड्याफार गांगरलेल्या मीनानं पुन्हां कांहींच भाषा केली नाहीं. पोलक्याच्या खिशांतील एक फ़ोटो काढून तिनं माझ्या हातावर ठेवला आणि ती पाठमोरी अशी गॅलरींत जाऊन उभी राहिली...

मीनानं दिलेला फोटो पहातांच मला मोठा धक्का बसला !...मी मटकन् खालींच बसलें...आणि तसं करतांना माझ्या हातांतील लोकरीच्या गुंड्याला जोराचा हिसडा बसल्यानं खुर्ची कोलमडल्याचा आवाज झाला म्हणून मीनानं चटकन् मागं वळून पाहिलं तशी मी मेल्याहून मेली झालें... जन्मभर कुणाला न सांगतां स्वतःजवळच ठेवलेल्या भावनेचा आतां स्फोट होणार अशी मला भीति वाटली, म्हणून मी गप्दिशीं डोळे मिटले. दांत-खिळी बसावी त्याप्रमाणं माझे दांत एकमेकांवर गच्च बसवीत भिंतीला डोकं टेकलं...

"काय झालं ग आक्का ?" माझ्या या चमत्कारिक वागण्यानं मीनानं माझ्यावर झेप घेतली तशी मी आणखीच घाबरलें...पण तिला कांहीं बोलायचा धीर मला झाला नाहीं. त्यामुळं तिला काय वाटलं कुणाला माहीत. ती माझ्याजवळून रागानं उठली आणि "माझं सुख तुला बघवेल असं वाटलं होतं..." असलं कांहीं पुटपुटत झणकाऱ्यानं माझ्या खोलींतून निघून गेली. त्यामुळं मला आणखीनच वेड्यासारखं झालं...मला तो एकांत असह्य झाला आणि स्वतःशीं देखील बोलायला माझं मन आतां जास्तच घाबरलं...बुजत चाललेल्या जखमेवरचा कांहींतरी खसकन् लागून ढलपा निघावा आणि जखमेंतून बुळूबुळू रक्त वहावं तसं मला झालं, म्हणून मी जोरानं माझ्या दडपून गेलेल्या छातीवर दोन्ही हातांनीं दाब दिला; आणि उफाळून वर येणाऱ्या भावनेला जबरदस्तीनं कां होईना मागं खेंचायची शिकस्त केली...पण मला यश आलं नाहीं...त्या भावनेचाच उलट विजय झाला !...

माझं पोळून निघालेलं मन क्षणभर हलुवार झालं. मीनासारखी मीहि एक दिवस अशीच आनंदानं हुरळून गेलें होतें तो क्षण माझ्या आठवणींत आला. हाच फोटो बघून जीवनाचीं अनेक सुखस्वप्नं रंगविण्यांत दंग झालेलं माझं मन जागं झालं...

श्रीकांताची आणि माझी ओळख झाली त्या गोष्टीला आतां सहा-सात वर्षं तरी झालीं होतीं. तो आणि मी महाविद्यालयांत बरोबर शिकत होतों. एक दिवस कुठल्याशा तरी सभेला आम्हांला जायचं होतं म्हणून एक मोटर घेऊन तो एकाएकीं माझ्याकडे आला होता आणि तो आला म्हणून त्याच्याबरोबर मोटरींत बसून जात असतांना त्याच्याविषयीं बरेच दिवस मनांत रेंगाळणारी ओढ अचानक मला बिलगली होती...मी त्याच्याशीं भारी लाडिकपणानं बोलत होतें...त्याला आनंद होत होता...

आणि त्यानंतर आमचा दाट स्नेह घडून आम्ही हळुहळू प्रेमानं एकत्र येत होतों...त्यावेळीं त्यानं माझ्या हातांत अनेकदां असेच फुलांचे गजरे बांधले होते. आपल्या हातानं माझ्या केसांत मोगरीची वेणी माळली होती...माझा फोटोदेखील काढला होता. त्या घटकेला निर्धास्तपणानं मी त्याच्या खांद्यावर माझी मान टेकवीत सुखावलें होतें ..

पण आमच्या प्रेमाला दृष्ट लागली. एकसारखं त्याच्या म्हणण्याप्रमाणं वागायला मला जमेना....माझं अभ्यासांत लक्ष असायचं. पहिला नंबर यावा म्हणून माझी धडपड चालायची. पण त्याला तें खपायचं नाहीं. तो एकपाठी होता. थोडं वाचलं तर लक्षांत ठेवून पास होत होता. मला घोकंपट्टी करावी लागत होती. त्यामुळं फार वेळ अभ्यासांत गढून गेल्या-खेरीज माझं भागत नव्हतं. आणि कुठंतरी जाऊन तासन् तास आम्ही दोघांनीं फिरल्याखेरीज त्याला चालत नव्हतं...त्या कारणानं आमचे खटके उडूं लागले. तरीपण त्याला आवडतं म्हणून मी रोज हळी केसांत माळूं लागलें. मधून मधून मनगटांत फुलांचे गजरे बांधूं लागलें...त्याच्या आवडीचीं पातळं नेसूं लागलें....पण झालं मात्र असं कीं, त्याचं मन मी सांभाळायला जाईन तसा तो माझ्यापासून जास्तच दूर दूर जाऊं लागला...प्रत्येक गोष्टींत कांहींतरी दोष काढीत माझ्यावर तोंडसुख घ्यायला जेव्हां त्यानं सुरवात केली, तेव्हां मी कळून चुकलें कीं, याच्या मनांत मला जास्त शिकूं

द्यायचं नाहीं !...गाणं, फोटोग्राफी, चित्रकला, शिवण असलं कांहीं जमेल तेवढं मीं शिकावं आणि घरीं बसावं असा त्याचा विचार असला पाहिजे अशी माझी ठाम समजूत झाली...मला या कल्पनेचा उबग आला. मला पदवी परीक्षेचं शिक्षण घ्यायचं होतं. खूप शिकायचं होतं. त्यासाठीं माझ्या बाबांनीं मला परगांवीं शिकायला ठेवली होती...आणि याला फक्त मी त्याच्या होला हो देणारी मठ्ठ बायको म्हणून हवी होतें...मला संताप आला. मग एक दिवस मी त्याला स्पष्टच म्हटलं, " माझी शिकायची हौस पुरी करूं न देणारा तूं कोण ?...माझ्यासाठीं कसलाहि त्याग तूं करणार नसशील तर तुझ्याशीं संसार करणं मला शक्य नाहीं !..."

त्यावेळीं त्यानंहि आपल्या खड्या आवाजांत मला सांगून टाकलं, " माझ्यापेक्षां तुला शिकणंच पाहिजे असेल तर आजपासून आपलं नातं संपलं !..." आणि माझ्यासाठीं म्हणून त्यानें आणलेली हळी त्यावेळीं त्यानं माझ्यादेखत चुरगळून दूर फेंकून दिली...

त्या दिवसापासून आम्ही अबोल झालों. एकमेकांना न भेटायचं ठरवूं लागलों...रस्त्यांत गांठ पडली तरी बोलायचं टाळूं लागलों...आणि अखेरीस त्यानंच या गोष्टीचा शेवट केला !...बी. ए. च्या ऐन परीक्षेंत मला कॉलेजच्या आवारांत अडवून त्यानं अखेरची भाषा केली, " आजच्या आज माझ्याशीं लग्न करायचं वचन दे !...नाहींतर जन्मांत तुझं तोंड पहाणार नाहीं ! " पण त्याच्याशीं वाद घालायला मला वेळ नव्हता. परीक्षेंत पहिला नंबर पटकावून वडिलांना चकित करायच्या नादांत मी गुंगलें होतें. वाचलेलं माझ्या नजरेंत भरत होतें. आणि उत्तर पत्रिका कशी झक्क लिहायची याचा मी विचार करीत होतें...म्हणून त्याच्या बोलण्याला भीक न घालतां तशीच पुढं निघालें तशी माझ्यासमोर येऊन त्यानं माझं थोबाड रंगवलं !... माझ्या अंगाची लाही झाली... क्षणभर वाटलं प्रिन्सिपॉलना जाऊन सारं सांगावं...पण तेवढ्यांत वेळ झाल्याची घंटा वाजल्यामुळं मी भरभर परीक्षेच्या वर्गाकडे निघून गेले... परंतु तिथं गेल्याबरोबर चार पांच जणींनीं व एकदोघांनीं जेव्हां मला खोंचून विचारलं कीं, " शिकलेली मुलगी लोकांच्या देखत नवऱ्याचा मार खायला राजी असते वाटतं ? " तेव्हां मात्र माझं मस्तक उठलं

आणि दांत ओंठ खात मी एकेकाची हजेरी घेतली...

पण त्या दिवशीं मला सगळं येत होतं तरी कांहीं लिहितां आलं नाहीं आणि मी अखेरीस एवढा खटाटोप करूनहि नापास झाल्याचं निकालाच्या वेळीं जाहीर झालं!...

या आठवणीनं माझ्या मनांत जोराची कालवाकालव झाली. माझ्या मीनाला खूप खूप शिकवायला उत्सुक असलेलं माझं मन भ्यालं आणि मीं माघार घ्यायच्या इराद्यानं तिला शोधीत तिच्या नांवाचा पुकार केला आणि घरभर फिरलें ... बघतें तर घरांत मीनाचा पत्ता नाहीं. छातींत धस्स झालं. तशीच जीव मुठींत धरून अंगणांत धावलें, तेवढ्यांत पाऊस सुरू झाला...पण छत्रीची वाट न बघतां मी तशीच चाललें. वाट फुटेल तिकडं परसदारीं भटकूं लागलें...

तिथं बघतेंय तर मीना एका आंब्याच्या झाडाखालीं पावसांत वाचीत बसलेली !...तिच्या हाताला धरून मीं तिला खस्‌दिशीं ओढली आणि माझ्यासमोर उभी करीत विचारलं, "या माणसाचं नांव गांव ?" तशी मीना खालीं बसत म्हणाली, "अभ्यास करतें मी ! ... तुला त्यानंच सुख मिळेल ..." आणि अंगावर ठिबकणारं पाणी तसंच ठेवीत तिनं पुस्तक उघडून वाचायला सुरवात केली. मला थोबाडींत मारल्यासारखं झालं...तरी पण मी अवसान गळूं दिलं नाहीं. वडीलकीच्या नात्यानं तिच्या हाताला धरून लोकांसमोर शोभा नको म्हणून खेंचीतच घरांत घेऊन आलें....तेवढ्यांत शेजारच्या काकूंनीं तें बघितलं. म्हणाल्या, "रुसलीय का बहीण आज? सिनेमाला जायचं असेल !...आज काल फारच बाई सिनेमा सिनेमा करतात हं मुली !...इश्य !" परंतु मीं त्यांना उत्तर दिलं नाहीं. खाड्‌दिशी दार बंद केलं आणि मीनाला उराशीं कवटाळीत म्हणालें, "मला सारं सांग तरी मीना !...लग्न म्हणजे पोरखेळ नाहीं ग पोरी !"

आतां मात्र मीनानं तोंड उघडलं. म्हणाली कशी, "आक्का !...नीट ऐकून घेणार असशील तर सांगतें." त्यावर मी मानेनंच तिला होकार दिला. आणि तेवढ्यावर संतोषून ती पण मला सांगूं लागली, "त्यांचं नांव व्यंकटेश. एम्. ए. झालेत ते. घरांत माणसं आहेत, शेतबीत पण आहे म्हणे !...त्यांनीं आपण होऊन मला मागणी घातलीय..."

" अस्सं !...आणि त्यांचं आडनांव ?..." श्रीकांताचं नांव तिनं घेतलं नाहीं म्हणून मीं थोड्या उत्सुकतेनं तिला प्रश्न केला.

" आडनांवाशीं काय करायचंय तुला ?...तुझ्या ओळखीच्या श्रीकांत देशमुखांचे ते धाकटे भाऊ... "

मीनाचा हा खुलासा ऐकतांच मी ओशाळलें. माझ्या शंकेखोर मनाची मला कीव आली. श्रीकांताचाच तो फोटो समजून भडकलेलं माझं मन आतां कावरंबावरं झालं आणि म्हणून सपशेल माघार घेत मीं मीनाला जवळ घेतली आणि विचारलं, " तूं त्यांना काय सांगून आलीस ? " त्यावर ती एवढंच म्हणाली, " आक्काला पसंत असेल तर बाबा कांहींच म्हणायचे नाहींत !...आणि मीं लौकर लग्न केलं तर तें आईला हवंच आहे ! "....आणि चहा करायचं निमित्त करून माझ्यापासून ती दूर निघून गेली.

त्यावेळीं क्षणभर मीनाचं म्हणणं पसंत असल्याबद्दल मीं तिला बोलून दाखवावं आणि बाबांना पण तसं पत्र लिहावं, असं मनांत आलं, पण मीं तो मोह आवरला....माझ्या एका मैत्रिणीच्या बाबतींत असंच घडलं असतांना लग्नानंतर दोघांचं पटलं नाहीं म्हणून जन्मभर मला शिव्या देत रहायचं तिनं बांधलेला चंग मला आठवला, म्हणून मीं माझ्या विचाराला मार्ग खेचलं ... आणि जणूं काय कांहींच आठवूं नये या भावनेनं जोरानं मान हालवली. माझ्या स्मरणशक्तीला मी वेगानं मागं खेचेलं : तरी मण माझ्या शंकेखोर मनानं उचल खाल्लीच, " कुणाला माहीत हा व्यंकटेश तरी कसला आहे ! ... माझ्या मीनाला ह्यानं छळलं तर ? ... एखादवेळ श्रीकांतपेक्षां उस्सेजादा निघणार नाहीं कशावरून हा तरी मेला ?..." पण मनांत आलेली ही उसळी मीं मोठ्या मुष्किलीनं तशीच खालीं दाबली आणि मला काय वाटलं कुणाला माहीत, मीनानं आणलेली वेणी लगबगीनं तिच्याकडे नेत मी स्वतः तिच्या केंसावर माळली. त्यावेळीं उसनं कां होईना हंसूं आणीत मी म्हणालें, "अग, ज्यांनीं दिली ना, ती दिली तुझ्यासाठीं ! .... तूं घातलीस तर त्या बिचाऱ्यांना आनंद !...वेडी कुठली ! ...."

मला वाटलं मीना त्यावर कांहीं बोलेल. पण तसं झालं नाहीं.

उलट माझ्या बोलण्यावर खूष होऊन तिनं आपली वेणी नीट बसवली आणि लाडिकपणें माझ्याकडे पहात मोठं दृष्ट लागावं असं तिनं मंदस्मित केलं... तेव्हां मात्र माझं आयुष्य एखाद्या पुस्तकाचं पान उलटावं तसं मागं सरलं नी मीनाच्या जीवनाचा विचार माझ्या डोक्यांत जोरानं घुसला. त्यामुळं कांहींतरी आठवल्या सारखं करीत मीं मीनाला विचारलं, "खरंच, आज ज्या उत्तर-पत्रिका मिळाल्या त्यांत तुला गुण किती पडले बघूं या ?"

त्यावर खदखदून हंसत मीना माझ्यापासून दूर गेली आणि दरवाजाचा उंबरठा ओलांडतांना तिनं मला जातां जातां निरोप द्यावा तसं सांगून टाकलं, "मला कांऽऽहीं माहीत नाहीं !...वेळच झाला नाहीं ग तें बघायला !..."

• ० •

अनुक्रम 3०७२८
विभाग ...
क्रमांक ...

" छे छे ! तसं मुळींच नाहीं. मी नेहमीं बसतें ना, त्या जागेपासून नेमक्या समोरच्या रस्त्यानं मी पलीकडे मतदानासाठीं निघालेली. तर झालं काय कीं, मीं पहिल्या पायरीवर एक पाय ठेवायला आणि दुसरा उचलीत असतांना समोरून ह्या बाई यायला एकच गांठ पडली. त्यामुळं मीं त्यांना हातानं थोडं थोपटलं आणि मागं व्हा: म्हटलं. तरी त्यांनीं मला रेटून पुढं यायचा प्रयत्न केला आणि मग मलाहि त्यांना थोडसं मागं ढकलणं भाग पडलं. नाहींतर सपशेल मी मागें पडलें असतें. आणि माझ्या हाताशीं असलेला माईक माझ्या कपाळावर आपटूनचं नुसतं भागलं नसतं तर रिपोर्टरची खुर्ची देखील माझ्या अंगावर आली असती ! म्हणजे साराच देखावा झाला असता आणि हातपाय शाबूत राहिले नसते तें आणखी वेगळंच ! खरी गोष्ट अशी होती, आणखी ह्या बाई अपमान झाला म्हणतात नाहीं का ? हा वयाचा आणि मानापमानाचा प्रश्न नाहींच मुळीं ! साधी माणुसकी देखील कळूं नये म्हणजे काय ? "

मघांशीं सभागृहांत घडलेल्या प्रकाराबद्दल केशवरावांनीं जास्त बोभाटा झाला म्हणून माझ्याजवळ जेव्हां खऱ्या खोट्याची विचारपूस केली, तेव्हां माझं डोकं जास्तच भडकलं. खरी गोष्ट मीं माझ्यापरीनं त्यांच्या कानावर घातली आणि आज मला सभागृहांत बोलायचं होतं म्हणून मी हातांतील कागदपत्र चाळीत बसलें. ह्या विषयावर मघांपासून एवढी चर्चा झाली होती कीं, केशवरावांशीं आणखी कांहीं बोलायची माझी इच्छा नव्हती. पण त्यांनीं मला वाचत बसूं दिलं नाहीं. मागच्या बाजूवर ते बसले होते ते आतां माझ्याशेजारी पुढं येऊन बसले आणि म्हणाले, "ही बाई आहेच तशी. तिला कुणाचं बरं बघवत नाहीं." त्यामुळं मग मलाहि बोलणं भाग पडलं, " जाऊं द्या. तिचा विषय आतां बंद ! "

" नाहीं ! बंद नाहीं होऊं शकत ! आज तुमच्या आधीं ती बोलणार आहे. सभापतींना सांगायला गेलीय आतां एवढ्यांत ! आणि मुख्य म्हणजे तुमच्या नोट्स् तिनं नेल्यात ना ? "

"खरंच ?...." केशवरावांनीं सांगितलेल्या या बातमीनं माझं पित्त जास्तच उठलं आणि मी माझे कागदपत्र पुन्हां चाळूं लागलें. बघतेंय तर खरंच माझ्या नोटस् नाहींत !...माझा संताप अनावर झाला आणि मी तडका-फडकीं सभागृहांतून बाहेर येत त्या बाई कुठं आहेत याची चौकशी लॉबीत असलेल्या शिपायाजवळ केली ! पण त्याला उत्तर देतां आलं नाहीं. तो 'माहीत नाहीं' एवढंच म्हणाला. त्यामुळं माझे उरलेले कागद तरी माझ्या पिशवींत नीट घालून ठेवावेत आणि थोड्या वेळापूर्वीं लिहिलेलं एक पत्र वेळींच पोस्टांत टाकून मग तिच्या शोधाला लागावं, या भावनेनं मी पुन्हां सभागृहांत गेलें. टेबलावरचे माझे सगळे कागद नीट गोळा करून मी पिशवींत भरले आणि शोधाशोध केली खरी पण मी लिहिलेलं पत्र कुठं होतं ? काळ्याकुट्ट ढगांतून एकदम वीज चमकावी त्याप्रमाणं माझ्या डोक्यांत कळ निघाली आणि मी मटकन् खालीं बसलें. 'ह्या बयानं तें पत्र पण नेलं कीं काय ? ' मला जबर शंका आली. माझं अंग शहारलं. जीव दडपून गेला. माझं तें पत्र अगदीं खाजगी होतं, त्यामुळं माझं डोकं सुन्न झालं...मी विलक्षण अस्वस्थ झालें ..त्या बाईनं माझं हें पत्र वाचावं ही कल्पनाच मला सहन होईना. म्हणून दाणदिशीं मीं माझं डोकं टेबलावर आदळलं तशी शाईची दौत एकदम उडाली अन् माझ्याजवळून चार पावलांवर शाईनं हातपाय पसरले...

एवढ्यांत मधली सुट्टी संपल्याची घंटा वाजूं लागली आणि एकेक सन्माननीय सभासद आत यायला सुरवात झाली...माझं धाबं दणाणलं... ही बाई आतां माझ्या पत्राची वाच्यता बिनतारी यंत्राप्रमाणं सगळीकडं करणार याची मला खात्री वाटली. म्हणून लगबगीनं मी सभागृहाबाहेर आलें. पहिल्यांदां लेडीज रूममध्यें ती आहे का बघावं म्हणून अक्षरशः पळत गेलें...मला पळतांना बघून जो भेटेल त्यानं विचारलं " काय झालं हो ? " पण उत्तर द्यायला मला वेळ नव्हता. तशीच पळत सुटलें...मला कशाचंच भान राहिलं नाहीं !...

पण एवढं करूनही सभागृहाचं कामकाज सुरू झालं तरी ही बाई मला सांपडली नाहीं ती नाहींच! कुठं गेली होती कुणाला माहीत? पण नेहेमींच्या शिरस्त्याप्रमाणं सभागृहांत जाण्यापूर्वीं ती चहा घेईल या आशेनं मी कँटीनमध्यें बसून राहिलें. नको असलेल्या माणसाची वाट पहायची वेळ आली म्हणून माझं मन खट्टू झालं. पाण्याचा घोटदेखील न घेतां मी खालीं मान घालून विचार करीत बसलें.

माझ्या एका जिवलग मैत्रिणीच्या प्रेमभंगाची रसभरीत हकीगत त्या पत्रांत मी माझ्या बहिणीला लिहिली होती आणि ह्या बाईच्या कारस्थानाचा तो परिणाम असला पाहिजे असं माझ्या कानावर आलं होतं तें मी तिला कळवून मोकळी झालें होतें! घरचं पत्र म्हणून कसलीहि भाडभीड न ठेवतां मी त्या पत्रांत माझं मन मोकळं केलं होतं.

आणि म्हणूनच माझ्या भाषणाच्या नोटस्‌पेक्षां त्या पत्राची मला जास्त काळजी होती. गेली अख्खी रात्र माझ्याजवळ बसून माझ्या मैत्रिणीनं जें जें मला सांगितलं होतं तें तें सारं मी माझ्या बहिणीला लिहून बसलें होतें! हें पत्र कुणाच्याहि हातीं पडणं इष्ट नव्हतं म्हणून मीं मुद्दाम तें वाचनालयांत बसून लिहिलं होतं. आणखी आतां तें ह्या बयेच्या हातांत गेलं तेव्हां त्याचे बारा वाजणार हें ठरलेलं होतं, म्हणून मी अस्वस्थ झालें होतें. मला कांहीं सुचत नव्हतं....

"अरे! इथं काय बसलांत उगाचंच?" कुणी तरी माझ्या समोरच्या खुर्चीवर येऊन बसल्यामुळं मीं दचकून मान वर केली. बघतेंय तर आमचे मुख्य व्हीप! त्यांना बघतांच मी उठलें आणि बोलून गेलें, "तुमचा माझ्यामागं रोज तगादा बघा! थोडं देखील स्वस्थ बसूं देत नाहीं तुम्ही!"

त्यावर ते मोठ्यांदां हंसले आणि म्हणाले, "छे हो! कोरम नाहीं म्हणून बोलवायला नाहीं आलों मी....तुमची मैत्रीण आतां बोलायला उठली म्हणून आलों बाहेर!"

"शप्पथ!..." माझी शंका निष्फळ ठरली म्हणून आणि मला धक्का देणारी बातमी कानावर आली, म्हणून मी आश्चर्यानं त्यांच्याकडे बघतच राहिलें. त्यामुळं आणखी एकदां मनापासून हंसून ते म्हणाले, "जाऊन बघा हवं तर!" आणि म्हणून मी लगबगीनं खरंच निघालें तर त्यांनीं मला आडवून

म्हटलं, " असल्या भाषणांत ऐकण्यासारखं आहे का कांहीं? बसा. चहा तर घ्या पहिला नि जा मग पाहिजे तर. "

पण मला दम निघेना. मागं एकदां अंदाजपत्रकावर मी बोलायच्या आधीं माझ्या हातांतून माझ्या टिपणाचा कागद हिसकावून घेऊन ही बाई बोलली होती; आणि माझ्या प्रमुख विचारांचा तिनं निकाल लावून टाकला होता. एवढंच नव्हे तर दुसऱ्या दिवशीं वर्तमानपत्रांत तिचा फोटो येऊन भाषणाची विलक्षण तारीफ झाली होती!...पुन्हां त्या गोष्टीची पुनरावृत्ति होऊं नये म्हणून ह्या गृहस्थांच्या म्हणण्याकडे लक्ष न देतां मी बिगीनं सभागृहांत निघून गेलें...

आणि आंत जाऊन बघतेंय तर खरंच या बाईचं भाषण चाललेलं! मुकाट्यानं मिळेल त्या जागेवर मागं बसून, मी ऐकत राहिलें...माझ्याच विचारांना ती आपल्यापरीनं सभागृहापुढं ठेवीत होती हें ध्यानांत आलं, तरी मी हूं का चूं केलं नाहीं. तशीच गप्प बसलें...त्यामुळं केशवरावांची चिठ्ठी आली, " खरं ना मीं सांगितलं ते मघाशीं?" तरीपण मी त्या चिठ्ठीला मुडपून एका हातांत धरली आणि गप्प बसलें...यापेक्षां कोणते वेगळे मुद्दे मांडावेत इकडे आतां ईर्षेनं माझं मन कामाला लागलं होतं!... आणि काय वाटेल तें झालं तरी आज बोलायचंच या कल्पनेंत मी दंग होतें...

परंतु ह्या बाईचं भाषण संपलं आणि ती खालीं, बसली तशी तिच्या शेजारच्या माझ्या जागेवर मी जाऊन बसलें. मला दम निघाला नाहीं. मीं तिला सरळ विचारलं, " मला न विचारतां माझ्या नोटस् घेण्याचं कारण?" तशी ती काळ वेळ आणि स्थळहि विसरून माझ्यावर खेकसली " चूप!.. माझं डोकं मीं कांहीं गहाण ठेवलं नाहीं!... मला अक्कल आहे!... " आणि शेजारच्या सभासदांच्या नजरा एकदम आमच्यावर रोखल्या गेल्या...त्यामुळं माझ्या शेजारींच बसलेल्या दुसऱ्या बाई माझ्या कानांत म्हणाल्या, " तिच्या नादीं नका लागूं तुम्ही!...ती फार फटकळ आहे... " आणि गंमत अशी कीं तिनं तें ऐकलं मात्र आणि तिच्यावर तोंड सोडलं, "हा माझा अपमान आहे...मीं सभापतींना नांव कळवीन!"

तेवढयांत सभापतींनीं उठून तिला रागीट शब्दांत समज दिली, " सन्माननीय सभासदांना असं एकमेकांत बोलायचं असेल तर बाहेर

जावं. खाजगी चर्चेची ही जागा नव्हे!...." त्या कारणानं ती रागारागानं बाहेर उठून गेली आणि आम्ही पण चित्रांतल्या भावल्यांप्रमाणं गप्प बसून राहिलों...

पण सभापतींचं हिच्यापायीं बोलून घ्यावं लागलं, ही गोष्ट माझ्या मनाला भारी झोंबली. मीं म्हणून ठरवलं कीं, उद्यांपासून हिच्यापासून लांब बसायचं...तितक्यांत माझ्याजवळ बसलेल्या दुसऱ्या बाईनीं माझ्या हातांत चिठ्ठी ठेवली आणि हलक्या आवाजांत म्हटलं, "तुमचं पत्र आहे वाटतं हें!" तिशा मला खाड्दिशीं एकदम जाग आली; आणि त्या पत्रावर वाघासारखी झेप घेऊन मी तें वाचूं लागलें...बघतेंय तर माझ्याच मघांच्या पत्रांतील तो अर्धा भाग होता आणि अर्ध्या भागावर दुसरा कांहीं मजकूर होता!

आतां मात्र माझी उत्सुकता वाढली. मी मन लावून वाचूं लागलें. बघतेंय तर माझ्या बहिणीला ह्या बाईनं त्यांत लिहिलेलं कीं,..."तुमची बहीण निष्कारण माझ्याशीं भांडते. तुम्ही तिला ताकीद करा. वडील माणसांचा अपमान करतांना तिला शरम वाटत नाहीं..."

हें वाचून माझा माथेसूळ पुन्हां उठला म्हणून मी चटकन् उठलें आणि तिला पोटभर बोलून घ्यावं म्हणून आतां बाहेर जाणार, एवढ्यांत बोलत असलेले सभासद भाषण संपवून खालीं बसले; आणि माझ्या शेजारचे एक सभासद बोलायला उठतांच त्यांचं नांव पुकारलं गेल्यानं मटकन् मी पुन्हां खालीं बसलें. तशीच गेलें असतें तर सभापति व बोलणारे सभासद यांच्या-मधून गेल्याचा गुन्हा होऊन मला सभापतींचं बोलून घ्यावं लागलं असतं, आणि माझ्या फजितीला पारावार न उरता!

आपली फजिती होऊं नये म्हणून मी खालीं बसलें खरी पण मनाला स्वस्थता वाटेना. पत्राची रुखरुख एका बाजूनं पिळीत होती आणि दुसऱ्या बाजूनं सभागृहांत बोलायची ईर्षा डिंवचत होती...मी भांबावून गेलें होतें...निरनिराळ्या देशांतील स्त्रियांनीं विधिमंडळांत बजावलेली कामगिरी माझ्या मनांत भरत होती; आणि माझ्यासारखीचा असल्या बायकांच्या कारस्थानानं होणारा हिरमोड मला खात होता...माझं चित्त ठिकाणावर नव्हतं. वेड्यासारखी माझी नजर सभागृहांत भिरभिरत होती आणि मन

स्वतःभोंवतीं पिंगा घालीत होतें...

इतक्यांत कुणीतरी तगादा घेऊन मला बाहेर भेटायला आल्याचा शिपायानं निरोप आणला, म्हणून सभागृहांतून बाहेर पडायचा मार्ग खुला होतांच मी बाहेर आलें. बघतेंय तर माझ्या भावाचा मित्र दत्ताराम! त्याला पहातांच मी चपापलें व म्हणालें, "कां रे दत्ताराम? एकदम कुणीकडं?" तसा तो म्हणाला, "तुला लौकर घरीं आलं पाहिजे. तुझा किसन फार आजारी आहे. कालपासून शुद्धीवर नाहीं...तुला घेऊन जायला आलोंय मी!..."

माझी कंबर बसली....दत्तारामशीं बोलायचं देखील मला भान राहिलं नाहीं. ह्या बाईच्या वाईट नजरेनं माझ्या किसनला दृष्ट लागली हीच माझी भावना. माझ्या डोक्यांत काहूर उसळलं...मागं एकदां किसन मला भेटायला आला, त्यावेळीं हिनं त्याच्या धष्टपुष्ट शरीरयष्टीवर रोखून नजर फिरवीत माझ्या देखत म्हटलं होतं, "मला असला मुलगा पाहिजे होता. आमचीं मेलीं सारीं मरतुंगडींच. ह्या तुमच्या भावाचं शरीर बघा, नजर हालत नाहीं." तें आठवणींत येतांच मीं तिच्या वाचेला मनांतल्या मनांत शाप दिला आणि तशीच दत्तारामच्या मागोमाग आलें...कौंसिलहॉल सोडून तशीच सरळ स्टेशनवर आलें...कशाचंच मला भान राहिलं नाहीं. भाऊ माझ्या नजरेंत खेळत होता आणि ह्या बाईच्या दुष्टाव्यानं माझं काळीज फाटून जात होतं. म्हणजे तिची जिरवायला मला जमत नव्हतं असं नव्हे, तर तिच्यासारखी माणुसकी सोडून वागणं मला धार्जिनी नव्हतं, म्हणून मी सरळपणानं वागत होतें इतकंच काय तें....पण माझ्या ह्या स्वभावाचा ती गैरफायदा घेत होती. आणि तें कळत असूनहि तिला एकदांच फाडफाड बोलून मोकळं व्हायला मी राजी होत नव्हतें...कारण ती विलक्षण लोचट होती. संधि साधण्यांत हुषार होती. त्यामुळं तिच्यावर मी रागावलें आणि तिला कितीहि टाळली तरी ती वेळ आली कीं, हटकून माझ्या गळ्यांत पडून रडायला कमी करीत नव्हती! आणखी मग मलाहि तिला टाळणं जड जात होतं!...

## ९ : गोदावरी

" आज वारं कसं छान सुटलंय नाहीं ? "

" हो. त्यामुळं बरं वाटतंय थोडं. ती पलीकडची खिडकी नीट उघडतां कां तेवढी ? "

" हो हो. उघडतें कीं !...बस्स ? "

" हूं ! बसा आतां...अगबाई ! वास कसला आला ? फुलं आणलींत वाटतं ?....वेणी का गजरा ? "

" व्या...छान आहे ! "

" मस्त !...बाकी तुम्ही कांहीं म्हणा गोदावरी. तुम्ही संसार फार छान केला असतां !...तुमच्या ह्या फुलांच्या वेडानं तर तुमचे पतिराज तुमच्यावर बेहद्द खूष होते !...एखाद्याच्या आयुष्याचं नुकसान नाहीं करूं असं ! "

" नुकसान ? छे हो ?....मी आहें तीच छान आहें एकटी. "

" कां हो ?.. तुमच्या आयुष्यांत कुणींच आलं नाहीं का ? "

" पुष्कळ आले ! पण...माझं कुणाशीं नाहीं जमलं ! " गोदावरीनं एक दीर्घ उसासा टाकला; आणि माझ्या नाकासमोर मोगरीचा फुललेला गजरा धरून ती माझ्या उशाशीं बसली. -

त्यावेळीं रात्रींचे दहा वाजून गेले होते. सगळीकडे निजानीज झाली होती. दवाखाना शांत झाला होता. माझी बाळंतीण बहीण झोपली होती. तिचं बाळ निजलं होतं. खोलीबाहेर मोलकरीण झोपली होती. गड्यानं दवाखान्याचं मुख्य दार लावलं होतं. डॉक्टर घरीं गेले होते. रात्रपाळीची नर्स दोन तीन लहानग्या पोरांना घेऊन पलीकडच्या खोलींत निजवीत होती. म्हणजे सगळीकडे सामसूम झालेली.आम्ही दोघीच तेवढ्या बोलतेल्या. त्यामुळं गोदावरीला विचारलेल्या प्रश्नाचं उत्तर ऐकायला मी आतुर

झालेली. गेल्या वर्षभरांतील तिच्या ओळखीनं तिच्याविषयीं वाटणारी उत्सुकता जागी झालेली. कान देऊन मी ऐकायला उतावीळ झालें. पण तिनं उसासा टाकला तसं मला थोडं खटकलं. म्हणून मीं तिला विचारलं, " राग आला का ? " तशी ती नेहमीं सारखी गोड हंसून माझा हात आपल्या हातांत घेत म्हणाली, " छे छे ! रागबीग मला कधीं येत नाहीं. आला तर तो मला आवडत नाहीं. "

" मग ?....माझ्या प्रश्नाचं उत्तर ? "

" तसं तें रोखीनं मी देऊं शकणार नाहीं. पण ऐकून घ्या मी सांगेन तें चालेल ? "

" जरूर ! अगदीं मोकळ्या मनानं बोला. मैत्रीच्या नात्यानं. "

" एक विचारूं का ? "

" काल तुम्हीं काय लिहिलं माझ्या खोलींत बसून ? "

" पत्र नव्हें खास ! "

" मग ?...लिहितांना तुमचा चेहरा हंसत होता. "

" असं होय ?...अहो, मी पास झाल्याबद्दल माझं मींच तें अभिनंदन केलं ! " माझ्या बोलण्याचं मलाच हंसूं आलं. पण गोदावरी हंसली नाहीं. माझ्या डोळ्यांत बघत गंभीर होऊन म्हणाली, " खोटं !...तुम्हीं कुणाला तरी तें गोड पत्र लिहिलंय ! "

" कशावरून ? " मी झोपलें होतें ती आतां उठलें.

" तसं वाटलं मला. "

" छे हो !...पत्र कुणाला लिहूं ? घरची सारी इथंच आहेत कीं ! "

" अंहं !...घरच्यांना नव्हें. "

" मग ?...तसं माझ्या आयुष्यांत वेगळं गुपीत नाहीं ! "

" तसं असेल तर उत्तम !...नशिबवान आहांत ! "

" तें कस काय ? "

" अहो, परवांची गोष्ट सांगतें. माझ्या ओळखीच्या एका माणसा-बरोबर मी चहा घ्यायला हॉटेलमध्यें गेलेंवतें. तर काय गंमत झाली कीं, बोलतां बोलतां माझ्या लग्नाचा विषय निघाला. तशी म्हटलं गंमत करावी. म्हणून त्याला सांगून टाकलं कीं, माझं लग्न केव्हांच झालंय म्हणून ! "

“ अगबाई !...खरंच ? ”

“ ऐका ना ! आणिक मग मीं त्याला सांगितलं कीं, माझा नवरा फार हौशी आहे. मला नेहमीं नवीन नवीन कपडे घेतो, दागिने करतो, फिरायला नेतो....तशी गंमत बघा, त्याचा चेहरा एकदम पडला. तो गोरामोरा झाला. ”

“ कारण ?...त्याच्या मनांत तुमच्याशीं लग्न करायचं होतं ? ”

“ हरी जाणे !...पण तेव्हांपासून त्यानं माझ्याकडे येणं जाणं बंद केलं !...नाहीं तर दर चार दिवसांनीं यायचा. फोन करायचा. ”

“ येडबंबूच दिसतोय हं मग ? ”

“ मीं म्हटलं, पिडा गेली. असली स्वार्थी माणसं आयुष्यांत न आलेलीं चांगलीं ! उगीच त्रास !... ”

“ तुम्ही गेलाच कशाला त्याच्याशीं ओळख करायला ? ”

“ छे हो ! मी कुठली जातेय ?...एका पेशंटच्या निमित्तानं ओळख झालेली !... ”

“ अशाच ओळखी फार होत असतील नाहीं गोदावरी ? ”

“ हो, नेहमींच !... ” गोदावरीनं मोठ्या ठसक्यानंच मला उत्तर दिलं आणि ती माझ्यां शेजारी आडवी होत पुटपुटली, “ असल्या माणसांशीं कोण लग्न करील हो ? ”

त्यावर मला कांहीं बोलायचं होतं. पण तेवढ्यांत कुठून तरी पेशंटची घंटी कानावर आल्याकारणानं गोदावरी चटकन् उठली आणि विजेच्या वेगानें ‘ आलेंच हं ! ’ अशी हातानं खूण करीत निघून गेली.

गोदावरीच्या या चपळाईनं आणि वेळेला आवश्यक असणाऱ्या मदती कारणानं माझं मन तिच्यावर बसलं होतं. दवाखान्याची ती मुख्य नर्स. सारं तिच्या हातांत. सदा हंसरी दिसायची. नेहमीं आनंदानं जगायची. कंटाळा म्हणून नाहीं. म्हणूनच तिच्याबद्दल मला भारी कुतूहल असायचं. बिचारी दवाखाना सोडून कधीं फारशी बाहेर जायची नाहीं. आणि रात्रभर जागून चार बाळंतपणं उरकावीं लागलीं तरी दमलेली दिसायची नाहीं. नेहमीं कशी टिपटॉप असायची ! तिचे केंस कधीं विसकटलेले दिसायचे नाहींत कीं, कपड्यांची इस्त्री कधीं मोडलेली आढळायची नाहीं. सारं

जिथल्या तिथं. दिसायला काळीसांवळीच. पण तजेलदार. टपोरे काजळ माखलेले डोळे. सुटसुटीत डौलदार बांधा. भरभर चालणं. बोलणं गोड. सदा वेणींत फुलं माळलेली. मनगटांत फुलं बांधलेली. पांढरा स्वच्छ परीट-घडीचा पोशाख. कुणाचंहि मन तिच्यावर बसावं. पण असं असून ती कधीं कुणाच्या तोंडाकडे पहात असलेली दिसायची नाहीं. कामापलीकडे बोललेली आढळणार नाहीं. खुद्द डॉक्टरांशीं पण मोजकंच बोलेल. पेशंटशीं पण वेंचक व धीराचं बोलेल. अघळपघळ असं तिच्यांत कांहींच नाहीं. कधीं कुणी तिच्याकडे खाजगी आलेलं पण दिसायचं नाहीं ! ती सदा दवाखान्याच्या कामांत दंग असलेली.

त्यामुळं तिच्या आयुष्याविषयीं मला भारी उत्सुकता. म्हणून मीं तिच्याशीं मैत्री घडली तसं बोलणं काढलं. पण सुरवात झाली नाहीं तोंच घंटा वाजावी का ? मला राग आला. उठून खोलीच्या दाराशीं आलें. बघतेंय तर एक दोन दिवसांचं पोर गुंडाळून घेऊन, रडत होतं तें त्याच्या आईपासून नेऊन, दुसऱ्या नर्सकडे द्यायला गोदावरी निघालेली. मला पहातांच ती हंसून म्हणाली, “ आलेंच हं ! ”

आणि बोलली तशी चटकन् आली देखील. आणखी येतां येतांच म्हणाली देखील “ आमचं हें असं आहे. कधीं म्हणून रिकामपण नाहीं. नवरा करून हें कसं जमावं हो ? ” आणि पोटभर हंसली. तशी मीं तिला विचारलं, “ कंटाळा नाहीं येत या गोष्टीचा ? ”

“ अं हं !... कंटाळा करून तुमच्यासारख्याचं भागावं कसं ? ” गोदावरीनं मला टोला दिला तशी मी वरमलें. परवां माझ्या बहिणीच्या पोटांत दुखत होतं त्यावेळीं शंभरदां तरी मीं स्वतः तिला दमवली असेल ! इतरांचाहि तोच प्रकार. कंटाळून तिला चालावं कसं ? आपण उगाच वेड्यासारखा प्रश्न केला म्हणून मी स्वतःवरच चिडलें.

पण गोदावरीनं तें ओळखलं. उशीवर डोकं टेकून बाहेरच्या चांदण्याकडे पहात ती मला म्हणाली, “ आयुष्यांत चढउतार हा पाहिजेच बघा. नुसत्या संथपणाला अर्थ नाहीं. ” पण तिच्या बोलण्याचा रोख माझ्या ध्यानांत न आल्याकारणानं उत्तर द्यायचं तें मी तिच्याकडेच बघत राहिलें. म्हणून तीच म्हणाली, “ माझं एका डॉक्टरवर एकदां प्रेम होतं ! ”....

तशी मी दचकलें...आणखी कशी कोण जाणे बाई एकदम बोलूनहि गेलें, "कल्पना तर सुंदर आहे गोदावरी. दोघांचं मिळून भलं होवो." त्यामुळं गोदावरी मला चिमटीत पुटपुटली, " मी भूतकाळ सांगतेंय!" आणि तिनं आपल्या जीवनांतील एक करुणरम्य गोष्ट मला ऐकवली. माझ्या केसावरून हात फिरवीत ती म्हणाली, "तसा तो फार चांगला होता. दिसायला देखणा. कामांत हुषार. मनानं प्रेमळ. पण मोठा आपमतलबी. बेट्यानं मला कितीक दिवस त्याला बायकापोरं आहेत याची दाद लागूं दिली नाहीं!"

"खरं म्हणतां?...काय बाई माणूस हा?" गोदावरीला मीं मधेंच थांबवली. पण तिनं माझ्याकडे लक्ष दिलं नाहीं. ती बोलतच होती, "...एक दिवस आम्ही दोघं एका बागेंत फिरायला गेलों. संध्याकाळ झालेली. हातांत हात घालून चाललेलों. संसाराचीं चित्रं मी रंगवीत निघालेलीं. पण वाटेंत एका तळ्याच्या कट्ट्यावर मला बसवून जेव्हां त्यानं माझ्या गळ्याभोंवतीं पहिल्यांदांच हात टाकला तशी मीं बाजूला होत त्याला विचारलं, 'तुम्ही मला विश्वासून जवळ करणार ना? ... जन्माची सोबत देणार ना?'... तसा तो गप्प बसला, बोलला नाहीं. पण त्याचा श्वास जोरानं चाललेला. कामुकतेनं नजर माखलेली. मला भीति वाटली. मी चटकन् उठलें आणि ताड्ताड् इथं निघून आलें ...."

गोदावरी बोलतां बोलतां थांबली. तिच्या चेहऱ्यावर निराशा आली. तिनं मान वळवली. ती गप्प राहिली. मग घटकाभर कुणीच कुणाशीं बोललों नाहीं. मला सारंच चमत्कारिक वाटत होतं. काय बोलणार मी तरी? अखेर शेवटीं माझ्याकडे वळून तीच म्हणाली, ".... आमच्या डॉक्टरांनीं मग एक दिवस मला त्यांच्याबद्दल सांगितलं. आणि त्याचं जाणं येणं बंद होईल असं मी वागत गेलें. स्वतःच्या भोंगळपणाला शिक्षा द्यायची म्हणून मीं कुणाला माझ्या जीवनांत न येऊं द्यायची शिकस्त चालवली...पण..."

"पण काय गोदावरी?...थांबलांत कां?...बोला..."

"पण माझा नियम नेहमींच मोडत गेला!"

"कारण?"

" मला कठोरपणानं वागायला जमलं नाहीं. कुणाचं मन नीट ओळखतां आलं नाहीं."

" तुम्ही तर फारसं कुणाशीं बोलतहि नाहीं ! "

" हो. तरीपण असं होतं....आणि मी काळीसावळी म्हणून कुणीं माझ्या वाटेला जाणार नाहीं म्हणून मी मनाशीं बांधलेली गांठहि सुटते. कुणीतरी माझा विचार करतंच !..."

" एखादा चांगला माणूस नाहीं का भेटला कधींच ? गोदावरीला बरं वाटावं म्हणून मीं हा प्रश्न काढला. पण ती जास्तच गंभीर झाली. तिनं रोखून माझ्याकडे पाहिलं. आणि मलाच विचारलं. " चांगला म्हणजे ? "

" चांगला म्हणजे समंजस, सरळ, प्रामाणिक. "

" तुमच्या जीवनांत असं कुणीं आलंय ? "

गोदावरीच्या या रोखीच्या प्रश्नानं माझं अंग शहारलं. आणि मी कारण नसतांना उठून पाणी प्यालें. त्यामुळं तिला काय वाटलं कुणाला माहीत. मोगरीच्या गजऱ्याचा मनसोक्त वास घेत ती उठली आणि 'झोपा आतां' म्हणून तडकाफडकीं आमच्या खोलींतून निघून गेली.

मला नाहीं नाहीं तें आठवूं लागलं. तिनं मला कुणाबरोबर आणि कुठं पाहिलं असेल याचा मी अंदाज घेत बऱ्याच वेळ बसलें. पण पक्की आठवण गवसेना. माझं कांहीं नव्हतंच तर कुठं कांहीं सांपडावं कसं ? तरीपण खुलासा करून घ्यावाच म्हणून मी हलक्या पावलांनीं तिच्या खोलींत गेलें. बघतेंय तर दिवा मालवलेला आणिक गोदावरी झोपलेली. आतां काय करावं ? मुकाट्यानं परत जावं म्हटलं तरी जिवाला चुटपुट लागली आणि तिला उठवावं म्हटलं, तर गडी नको म्हणत जवळ उभा असलेला ! मला पेंच पडला. वाटलं, माझ्या बहिणीनं नेमकं यावेळीं कसलं तरी औषध गोदावरीला मागावं. म्हणून झपाझपा मीं आमच्या खोलीकडे आलें, पण बहीण आरामांत झोपलेली. तिला तरी कशी उठवूं ? गेले तीनचार दिवस तिची झोप मोडलेली. आजच कुठं विसांवा मिळालेला. त्या कारणानं तिला उठवणं गाढवपणाचं होणार होतं. म्हणून मग शेवटीं मी दाराजवळ येऊन तिथल्या बाकावर बसलें.

आणि थोड्या वेळांत माझं नशीब उजाडलं. कुणीतरी बाई बाळंतपणाला

आली. दार उघडलं गेलं. रात्रपाळीची नर्स बाहेर आली. आणि आलेल्या बाईचं पोट बरंच दुखत असल्याची बातमी तिच्याबरोबर आलेल्यांनी दिल्या कारणानं गोदावरीहि आपोआप तिथं आली. मला बरं वाटलं. मी लगबगीनं गोदावरीजवळ गेलें. तशी ती म्हणाली, "आतां गप्पा नाहीं. मला पेशंटला तपासूं दे पहिली. नॉर्मल नसेल तर डॉक्टरांना बोलवावं लागेल. तुम्ही झोपा."

त्यामुळं मुकाट्यानं मी आपल्या खोलींत आलें. पण मला झोप येईना. एक वाजून गेला तरी मी जागीच! सारखी आंत बाहेर करीत राहिलें. गोदावरी काय करतेय म्हणून डोकावीत बसलें. पण त्या आलेल्या बाईला टेबलावर घेऊन तिची नाडी पहात उभी असलेली गोदावरी दिसली, तशी-मात्र मी गुपचूप माघारीं येऊन निजून राहिलें....

मला झोप केव्हां लागली कुणाला माहीत. पण बहिणीनं हांक मारली म्हणून मी उठलें त्यावेळीं साडेचार झाले होते. आणि बाहेर नव्या बाळाचा आवाज येत होता. म्हणून मी झटकन् उठलें आणि बहिणीच्या बाळाला पाणी आणायचं निमित्त काढून गोदावरीला धुंडाळूं लागलें. बाहेर डिली-व्हरी रूमच्या तिथं येऊन बघतेंय तर दरवाजा बंद होता आणि आंत गडबड चालली होती. म्हणून मग सैंपाकाच्या बाईना उठवून बाळाला पाणी घेऊन आलें आणि बहिणीला विचारलं, "ही गोदावरी झोपते केव्हां ग?" तशी ती म्हणाली, "मला ग काय माहिती? ... पण बिचारी सारखी कामांत असते. इथं काम नसेल तर औटडोअरचं पहाते. पण रिकामी नसते म्हणे." म्हणून मला मुकाट्यानं गप्प बसावं लागलं...

पण झोप म्हणून येईना. अस्वस्थ वाटत होतं. उगाच अंथरुणावर पडून राहिलें. केव्हां उजाडतंय असं झालं म्हणून मनगटावरील घड्याळ काढून वेळ मोजीत राहिलें...

आणिक त्या नादांत केव्हांतरी माझा डोळा लागला. शेवटी मला जाग आली ती माझी आई सकाळीं आठाला आली त्यावेळीं!...

मग मी घरीं निघून गेलें. माझ्या कामाला लागलें. गोदावरीचा विषय मनांतून मागं सरकला. दिवसभर त्यानं पुन्हां तोंड वर काढलं नाहीं.

परंतु संध्याकाळीं झोपायला म्हणून मी दवाखान्यांत गेलें, तशी त्या

विषयानं पुन्हां मला घेरली. जिना चढून वर आलें ती सरळ गोदावरीकडे निघालें. पण बघतेंय तर त्यावेळींहि ती कुणाची तरी केस घेऊन कामांत गुंतलेली ! मला चीड आली. रागारागानं पाय आपटीत मी बहिणीकडे आलें. तशी मला पहातांच तिनं एक चिठी माझ्या हातांत ठेवली.

" कुणाची ग ? "

" बघ वाचून. "

" कुणीं दिली ? "

" गड्यानं ! "

" केव्हां ? "

" दुपारीं. "

चिठी उघडतां उघडतां बहिणीचं नि माझं बोलणं झालं. घाईघाईनं मीं ती चिठ्ठी एकदां वर नि एकदां खालीं बघून घेतली. अक्षर ओळखीचं नव्हतं. पण खालची सही माहीत होती. गोदावरीनंच मला कांहीं लिहिलं असावं. असा मीं तर्क केला. मोठा दिवा लावला; आणि बहिणीला विचारलं, " तूं वाचलीस ? " आणि " नाहीं. झोंपलें होतें मी दिवस भर ! " असं तिचं उत्तर आलं तसं मी निःशंक मनानं जें वाचलं तें असं होतं—

" ... रात्रीं अर्धवट बोलणं झालं. माफ करा. जीवनच अर्धवट आहे माझं. कसलीच पूर्णता आलेली नाहीं. जीवनाचा प्रवासच तसा आहे. मधेंच खुंटलासा वाटतो. पण तो चालूंच असतो. तसं माझं आहे. ओळखी होतात. मनांत चित्र भरायला लागतं. रंगारूपाला चढूं पहातं. पण अचानक पुसूनहि जातं. म्हणून मी खंत बाळगीत नाहीं. माझ्या कामांत आनंद मानतें. झालं गेलं विसरूं पहातें. लोकांच्या सेवेंत मन रमतं. इतरांना दिलेल्या मदतींत जीव विसावतो. ह्या भावनेनं अजून तरी मला कधीं फसवलं नाहीं. ती माझ्याशीं प्रामाणिक आहे. एकनिष्ठ आहे. म्हणून माझा पगार वाढवा असं देखील मी डॉक्टरांना कधीं बोलत नाहीं, बोलणार नाहीं, किंवा कुणाकडून बक्षिस पण घेत नाहीं.

" ताई, लहानग्या बाळाच्या पाप्यांत माझा जीव फुलतो. तुमच्यासारख्यांच्या मैत्रींत मी वाढतें. सेवेंत जगतें. तोच माझा आनंद. ह्या

आनंदाला उरीशीं कवटाळणारा पुरुषोत्तम कधीं भेटला तरी वाहवा, नाहीं भेटला तरी त्याच्या केवळ चिंतनांतहि मी आनंदीच असेन. माझा हा स्वभाव बनला आहे ... आणि जास्त विचार करीत बसायला वेळ कुठं आहे हो ? ..., आजच बघाना. दोन तीन ऑपरेशन्स आहेत लागोपाठ. तुमची माझी भेटहि परवां पावेतों व्हायला फुरसत नाहीं ... रागावूं नका हं:! ”

## १० : गीता पठण

‘ ह्या बांगड्या कधीं केल्यास वहिनी ? ’

‘ झाले असतील पंधरा दिवस. कां ? ’

‘ दिव्याच्या उजेडांत रात्रीं चमकल्या फार. ’

‘ बरं मग ? ’

‘ बाईचा हात असाच सुंदर चमकावा. ’

‘ कारण ? ’

‘ असा चमचमता हात जेवायला वाढूं लागला म्हणजे खाणारा बेभान होतो म्हणतात ! ’

‘ म्हणजे ? कुणीं सांगितलं तुला हें ? ’

‘ राघवानं ! त्याला आवडतात अशा नव्या नव्या बांगड्या घातलेल्या.’

‘ कुणीं ? ’

‘ बायकांनीं ! ’

‘ बायकोनं म्हण ! बायकांनीं कसं ? इतर बायकांशीं ह्याचा काय संबंध ? ’

‘ वा चिडलीस ? ’

‘ कां ? चिडेन नाहीं तर राहीन वाटतं ! ह्याला काय ग अधिकार असं बोलायचा ? आणिक तूं मेली कशाला सांगत आलीस तें ? इश्य ! ’

‘ बघा बाई ! सहज बोललें मी ! तुझ्या मनाला कां लागलं पण एवढं ? ’

‘ मला नाहीं खपत असलं ! राघव काय लायकीचा आहे जाणतें मी ! त्याची तूं तारीफ नको करायला हं ! ’

‘ ही तारीफ नव्हे. ह्याला मतप्रदर्शन म्हणतात. ’

‘ चूप किशे ! बस्स झाली तुझी बडबड. ’

‘ रागावलीस ? ’

‘ बोलूं नकोस तूं आतां !

'एकदांच सांगतें हं ! ' किशीचं आणि माझं असं बोलणं चाललं होतं. तितक्यांत गीता अचानक माझ्यासमोर आली तिनं मला कडकडून मिठी मारीत घाई गर्दीनं विचारलं, ' कशी आहेस तूं ? '

त्यामुळं विषय बदलणं मला भाग पडलं. आणि किशीला सोडून गीताशीं बोलण्याखेरीज दुसरा मार्गहि उरला नाहीं. तरी पण किशीच्या बडबडण्यानं आलेली चीड दडपली गेली नाहीं. धुमसत राहिली. एकाएकीं मधेंच उफाळून वर येऊं लागली. गप बैस म्हणून ऐकायला ती राजीखुषी होईनाच. शेवटीं मला भान राहिलं नाहीं. गीताशीं नेहमींप्रमाणं सरळ बोलायचं, खूप दिवसांनीं ती भेटली म्हणून तिची विचारपूस करायची, ती मी तिच्यावर खेंकसलें, ' तूं आणिक कशाला ग आत्तांच उगवलीस ? ' तशी गीता चपापली. माझ्यापासून दूर झाली. टकांमकां बघूं लागली. खुळीभैरी झाली. तरी देखील मी माझ्याच तंद्रींत !

म्हणून मग किशीच मला चिमटीत म्हणाली, ' वहिनी ! अग तुझी मैत्रीण आलीय् ना ! ' तेव्हां कुठं मीं धडपणें गीताकडे पाहिलं ! माझ्या ती लक्षांत आली. आणिक मग मात्र माझा नूर अचानक बदलला. आवाजांत फरक पडला. बोलण्याची भाषा बदलून गेली...गीताला मी कारण नसतांना रागावलें तें लक्षांत आलं...

' म्हणजे ? तुम्ही काय ग बोलत होतां ? ' माझं रागावणं गीताला उद्देशून नव्हतं हें तिच्या ध्यानांत आलं तशी तिनं डोळे वटारीत मला प्रश्न केला. त्यामुळं किशीच पुटपुटली, ' जाऊं दे अग ! ही अशीच बडबडते म्हाताऱ्यासारखी ! '

' कोण ? मी ? '

' हो हो ! तूंच ! '

' म्हाताऱ्यासारखी ? '

' नाहींतर काय ? मुलखाची मागासलेली. बुरसटलेल्या विचारांना धरून बसलेली...गांवढळ !...अडाणी !... '

' किशे ! जीभ सैल सोडूं नकोस ! '

' कां ? काय करशील ? तरुण माणसांच्या भावना तुला कळतात का ? अनुभवल्या आहेस कधीं ! मला नाहीं वाटत. '

'आतां जास्त बोलशील तर थोबाड फोडीन!' किशीच्या बोलण्यानं माझा संताप वाढला तशी मी तिच्या अंगावर धांवलें. तें बघून गीता मधें आली आणि फिदीफिदी हंसत सुटली!...माझा संताप जास्तच भडकला ...मी किशीच्या अंगावर धांवून जात गीतेला ढकलली; आणि ओरडलें, 'थांब किशे! जीभ उचकटतें तुझी!'

पण किशी पळून गेली. मला तिला गांठतां आलं नाहीं. तरी. ती पुढं मी मागं अशा चांगल्या कितीतरी लांब अंगणांतून पळालों. पण किशिनं मला मागं टाकली. मी मुकाट्यानं दांत ओंठ खात आणि याचा वचपा कसा काढायचा तें ठरवीत माघारीं फिरलें...

मग मला खालीं बसवीत गीतानं विचारलं, 'अग, काय भानगड आहे सांग तरी? एवढ्या कां निकराची लढाई खेळताय् ग आज?

'काय सांगू तुला गीता?...' गीताच्या प्रश्नानं माझा ऊर भरून आला. सगळा संताप अश्रूंच्या रूपानं निथळूं लागला. मनांत भडकलेली आग विझवायची शिकस्त करीत मी उत्तरलें, 'आतां कांहीं विचारूं नकोस. मी बोलूं शकणार नाहीं गीता!'...आणि गीताला मिठी मारून पोटभर रडलें...

घटकाभर मग अगदींच शांतता नांदूं लागली. दोघीहि गप्प बसलों.

थोड्या वेळानं शेवटीं गीतानंच विषय काढला, 'आलिकडे तूं नियमानं गीतापठण करतेस म्हणे!'

म्हणून मला बोलणं भाग पडलं. मी 'होय' म्हणालें.

'तुला गीता वाचायला आवडते?'

'हो.'

'समजतो का अर्थ?'

'हं!'

'मला नाहीं वाटत!'

'कां बरं?'

'मग तूं एवढी रागावली नसतीस! सांगायचं तें तुला शांतपणें पटवून देतां आलं असतं!'

'सगळं खरं! पण आवाक्याबाहेर गेलंय सारं! मी स्वतःला सावरूं

शकत नाहीं !...'

नको होतं तें नकळत मी बोलून गेलें म्हणून जीभ चावली आणि चटदिशीं विषय बदलीत म्हणालें,

'तुझं कसं आहे ? ठीक ?'

त्यावर कांहींशा चमत्कारिक नजरेनं न्याहाळीत मला गीता म्हणाली, 'उत्तम !...आणिक तुझं ?'

'माझं ?'

'हो ! तुझं कसं चाललंय ?'

'हे चांगले आहेत. मुलं चांगलीं आहेत. घरचीं माणसं चांगलीं आहेत ...आणि पोटापुरतं आहे घरांत.'

'अग मग हंसून सांग कीं हेंच ! इश्श !' गीताला माझा सूर आवडला नाहीं. मला गदगदां हालवीत तिनं माझ्या नजरेंत पाहिलं आणि विचारलं,

'मग तूं दुःखी का ?'

'कोण मी ?'

'मग दुसऱ्या कुणाचं विचारलं ? शुद्धीवर आहेस ना ?'

'....अग माझं छान चाललंय गीता !' माझ्या बोलण्यांत कांहींशी विसंगति आलीय हें ध्यानांत आलं, तशी मीं स्वतःला सावरली आणि चहा करायला उठलें...

पण गीता माझ्या मागोमाग सैंपाकघरांत आली आणि तिनं मला दरडावीत विचारलं, 'आज तूं सरळ बोलणार आहेस कीं जाऊं मी ?'

तशी मात्र मी एकदम बावरलें. गीतेला कडकडून मिठी मारली आणि पुटपुटलें, 'सांगण्यासारखं नाहीं ग ! नाहींतर एरव्हीं मी तुझ्याशीं का अबोला ठेवीन ? ... पुन्हां बोलूं आपण. आजचं सोडून दे गीता ? ... पाया पडतें. कांहीं विचारूं नकोस. घरचा भात घरांतच असूं दे !.... कोंड्यांत नको टाकूंस गीता !'

त्यानंतर गीता कांहीं बोलली नाहीं. शहाण्यासारखी गप्प राहिली. चहा घेतला. मुलांशीं खेळली आणि निघून गेली.

मग मात्र माझ्या जिवाला चटका लागला. माझं मन मला खाऊं

लागलं. जिवाभावाच्या मैत्रिणीशीं पोटभर बोलून मन मोकळं करायला हवं होतं असं सारखं वाटूं लागलं. बोलण्या-बोलण्यांतून कांहीं मार्ग गवसला असता, अशी आशा मनांत घोळूं लागली. म्हणून गीता जाऊन वेळ झाला होता, तरी मी खुळ्यासारखी दाराशीं येऊन तिला मोठ्यानं हांक दिली, तों दरवाजांतून गीतेऐवजीं हे आले ! त्यामुळं वाऱ्यासारखी मी घरांत आलें आणि कामाला लागलें...सारं स्वप्नांत घडावं तसा आव आणला ... मला ह्यांच्याशीं देखील आज कांहीं बोलायला नको होतं, एवढा माझा जीव उडून गेला होता...

नाहींतरी अशा गोष्टींना फारशी वाचा न फुटावी हेंच चांगलं. झांकली मूठ सव्वा लाखाची म्हणतात तें अशा वेळीं खरं वाटायला लागतं. आणि कुणाजवळ बोलून तरी काय फायदा ? ऐकणाराच्या जीवाला नसता त्रास आणि सांगणाराचीहि फुकटची उठाठेव. नाहींतर काय ? भोगणारा भोगतो, निस्तरणारा निस्तरतो, इतरांची आपली उगाच पायपीट ! माझं देखील तसंच कीं ! किशी माझी मामेबहीण. तिच्या बऱ्यावाईटाची जबाबदारी तिच्या घरच्यांच्यावर. पण मी आपली खुळी म्हणून जिवाला लावून घेत बसलेली !

तसंच पाहिलं तर किशी नवऱ्याजवळ नांदूं दे अगर न नांदूं दे. मला त्यांत पडायचं काय कारण ? आणि राघवाशीं तिची जास्त सलगी म्हणून तरी डोकं उठायचं काय कारण बाई ? पण नाहीं. मला तें सारं सारं झोंबतं. डोक्यांत झिणझिण्या उठतात त्या कल्पनेनं ! हो खरं तें सांगतें. असं वाटूं नयें पण वाटतं त्याला मी तरी काय करूं !

पण खरंच सांगायचं तर माझ्या वाटण्याला अगदींच निराधार म्हणतां येणार नाहीं. त्याचं भक्कम कारण आहे माझ्याजवळ. तें लपवून मीं स्वतःला तरी कां म्हणून फसवावं ? आणिक किशीला त्याचा सुगावा लागलाय म्हणून तर ती माझ्यापुढं तीन तीनदां नाक घाशीत येऊन हवीतशी बडबड करते आहे ! एरव्हीं एवढं करून माझ्यापुढं यायची तिला हिंमत झाली नसती. नव्हे तिनं तें अपमान मानून टाळलं असतं मुद्दामच ! पण तिनं बेटीनं माझ्याजवळच्या या दुबळेपणाचा बरोबर फायदा घेतला आहे, यांत शंका नाहीं.

आतां त्या गोष्टीला तसे बरेच दिवस लोटले आहेत. पण अधून मधून ती ताजी होऊन मला हैराण करून सोडते. आणि मग अशा वेळीं मी कमालीची चिडतें ! मला तें समजतं. पण कितीहि नाहीं म्हटलं तरी तें घडून जातं आणि मग मनाला लावून घेत बसतें...

वास्तविक राघव माझ्या आवडीचा माणूस. नात्या गोत्यांतील नसला तरी चांगल्या घरोब्यांतला. वाडवडलार्जित मित्रपणांतला असा. दिसायला देखणा. गुणानं चांगला. कर्तबगारीनं वाखाणण्याजोगा. म्हणून आमच्या ह्या किशीचं मीं त्याच्याशीं लग्न करावं म्हटलं. पहिल्यांदां होय नाहीं झालं तरी मागाहून किशीचे वडील हो म्हणाले, पण आमच्या मामींनं आयत्या वेळीं कांहींतरी खुसपट काढून मांडलेला डाव उधळून टाकला ! तशी माझ्या जिवाची लाही झाली. पण बोलतेंय कुठली न कुणाला ? किशी माझी लेक थोडीच होती ? आपली मुकाट्यानं गप्प राहिलें. आणि तिचं दुसरीकडे लग्न ठरलं तेव्हां त्या लग्नाला पण गेलें ! परंतु लग्नाला उभी रहातांना किशीच माझ्याजवळ पुटपुटली, ' हें लग्न खरं नाहीं वहिनी ! राघवाशींच माझं खरं लग्न झालंय ! मी मनानं त्याला वरलंय् ! तुझी निवड मला मान्य. ही आईची समजूत. ' आणि तेव्हां-पासून माझं काळीज उडून गेलं....हिनं मनांतील ही गोष्ट फेकून द्यावी म्हणून मीं तिची सतरांदां समजूत घातली...पण तिचा हेका कायम ! नाहीं म्हणजे नाहींच. दुसऱ्याचं ऐकावं हें तिच्या गांवींच नाहीं !

आतां काय करावं ? किशी खरंच नव्या घरीं नांदायला राजीखुषीनं तयार होईना. तेव्हां सगळ्यांच्याच तोंडचं पाणी पळालं ! मीं तर बाई अगदींच हाय खाल्ली. हा सारा दोष माझाच समजून मी चाललें. राघवाचं नांव मीं काढलं नसतं तर हा प्रसंग न येता ! माझा जीव चुटपुटूं लागला.

एक दिवस मग मी तेवढ्यासाठीं राघवाकडे गेलें. किशीची समजूत घाल म्हणून त्याला विनवणी करावी म्हणून गेलें. पण बघतेंय तर किशी त्यावेळीं त्याच्या तिथें बसलेली. दोघांचीं सलगीचीं बोलणीं चाललेलीं ! त्यामुळं तिथें टाकलेला पाय मीं मागं घेतला. ओशाळून मागं फिरलें. पण राघवाच्या तें लक्षांत आलं असावं. कारण तो चटकन् माझ्या मागोमाग आला. आपल्या घरीं मला घेऊन गेला. आणि मुख्य म्हणजे गेल्या गेल्या

भरल्या नजरेनं त्यानं बोलणं केलं, 'तूं तरी माझा विचार बाजूला ठेवूं द्यायचः नाहींस ! तूंच ना माझा हात किशीच्या हातांत देणार होतीस ? मग उलटलीस कशी अशी ?'

त्यावेळीं काय बोलणार मी ? तो खरं बोलत होता तर काय सांगणार ? माझाच डाव माझ्यावर उलटला होता ! मी पार ओशाळून गेलें. खालीं मान घातली. एकवेळ वाटलं राघवाची क्षमा मागावी. पण दुसऱ्या वेळीं मनांत विचार आला कीं, तसं करणं त्यावेळीं तरी योग्य नव्हतं ! उलट राघवानं किशीची समजूत घालायला हवी होती ! पण हें बोलणार कशी मी ? एखाद्या चोरासारखी गप्प बसून राहिलें नुसती !

तेव्हां मग किशीच फणकाऱ्यानं म्हणाली, 'राघवा, अरे ही आपली समजूत काढायला आलीय !' म्हणून मला वाचा फुटली. मी गडबडीनं म्हणालें, 'नाहींतरी आतां समजुतीनं मार्ग काढलाच पाहिजे. दुसरा इलाजच काय ?' तरी राघव म्हणाला, 'मी किशीच्या मार्गांत कधींच येणार नाहीं. ती सुखी असूं दे, बस्स ! माझी तेवढीच अपेक्षा आहे.' पण किशीनं आम्हांला साफ सांगून टाकलं, 'मी राघवाजवळ राहीन तरच सुखी होईन ! दुसरं मला कोणीहि सांगूं शिकवूं नये हें चांगलं.'

'किशीचा हा वेडेपणा आहे.' माझ्या तोंडून त्यावेळीं चटकन् ही भाषा निघाली. म्हणून किशीनं डोळे फाडून माझ्याकडे बघत म्हटलं, 'तूं माझ्या जागीं असतीस तर असलं ऐकून घेतलं असतंस वहिनी ?' आज मी खरंच निरुत्तर झालें. मी एक तर असं दुसऱ्याचं ऐकलं नसतं आणि मामीसारखं अकांडतांडव आमच्या आईनं केलं म्हणून त्याला दाद दिली नसती ! आणि तेवढ्यावरूनहि निराळा मार्ग पत्करलाच असता, तर मग मनांतलं सारं गिळून संसार सुखी करायच्या मागं लागलें असतें ! पण असा देखावा नक्कीच केला नसता. परंतु त्या ह्या जरतरला अर्थ नव्हता. कारण ही केवळ कल्पना होती. आणि किशीच्या जागीं मी असून खरेंच अशी वेळ येती; तर मी काय केलं असतं याची निश्चित अंदाज म्हणूनच मी तिच्यापुढं ठेवूं शकत नव्हतें. तरी पण जगाच्या दृष्टीनं, घरच्या माणसांच्या दृष्टीनं, आतां किशीनं राघवचं वेड डोक्यांतून काढणं इष्ट होतें, हें मात्र मला निश्चितपणें वाटत होतं. मात्र मी तसें बोलूं शकत नव्हतें.

कारण तीं दोघंहि माझं ऐकायच्या मनःस्थितींत मला दिसलीं नाहींत. म्हणून त्या दिवशीं मी फारसा वाद न घालतां घरीं निघतांना राघवाला एवढंच सांगितलं कीं, ‘ तूं पुरुष आहेस, विचारानं काय तें ठरव. ’

त्यानंतर मी कुणालाच कांहीं बोललें नाहीं. पण माझा जीव मात्र मलाच खात राहिला. किशी सासरीं जाईना म्हणून मामीच्या घरीं वादळ माजलेलं आणि कशालाहि न जुमानतां किशी खुशाल राघवाशीं प्रेमानं वागतेली ! शिवाय कितीहि नाहीं म्हटलं तरी थोडा तरी दोष माझ्या माथ्यावर फुटतेलाच कीं !

पण त्यांतल्या त्यांत नशीब म्हणजे राघवानं किशीला फार मर्यादेनं वागूं दिली होती ! कुठंहि मर्यादेचं बंधन तोडूं दिलं नव्हतं ! मात्र ह्या सगळ्याचा परिणाम म्हणून त्यानं लग्न तर केलं नव्हतंच, पण तो व्यसनी बनत चालला होता ! त्याच्या तोंडांतून सिगरेट क्षणभरहि बाजूला सरूं शकत नव्हती; आणि तो कुणाचीहि पर्वा करीनासा झाला होता ! एक-सारखं दुसऱ्याला टाकून बोलणं त्याच्या आवडीचं झालं होतं ! त्यामुळं सर्वांना तो दुरावला होता. आणि खरं बोलायचं तर माझ्याहि मनांतून तो उतरला होता ! म्हणून मी त्याच्यावर सारखी चिडत होतें...किशीला तर फोडून खात होतें. अशा वागण्यानं तीं दोघं स्वतःवर तर सूड उगवताहेतच, पण माझ्यावरहि त्याच भावनेचा वर्षाव करताहेत, असा मला भास होत होता ! म्हणून माझ्या मनाला किशीचं वागणं विशेष झोंबत होतं आणि राघव मूर्ख वाटत होता...त्याला हें वागणं शोभत नाहीं अशी माझी ठाम समजूत होती...आणि म्हणूनच या साऱ्या कल्पनेनं माझा जीव एवढा गुदमरून गेला होता कीं, इतरांशींच काय, पण खुद्द ह्यांच्याशींहि बोलायला मी धजत नव्हतें...

नाहीं म्हणायला मी मनाला शांति मिळवायचा एक मार्ग शोधला होता. मी रोज गीतापठण, गीतावाचन करीत होतें. मनाला विरंगुळा मिळवूं पहात होतें. पण किशीला तें बघवत नव्हतं. ती मधूनच माझ्याकडे यायची आणि माझ्या हातांतील गीता फेकून देत नाहीं तर माझ्या ताडावर हात ठेवीत मला बजावायची, ‘ अशानं मन शांत होणार नाहीं; माझं सरळ करून दे पाहिलं ! ’

पण तिला वेडीला हें कधींच कळायचं नाहीं कीं, तिच्या बऱ्यासाठींच मीं गीता पठणाचा मार्ग धरला होता ! कारण माझी वेडीची अशी भोळी श्रद्धा होती कीं, माझ्या अशा करण्यामुळं किशीचं नशीब उजाडेल ! आणि राघव तिला चार समजुतीच्या गोष्टी सांगून सुखानं तिचा उधळलेला संसार मांडून देईल !...पण ह्या सगळ्या गोष्टीला किशीचा नवरा आतां राजी होईल कीं नाहीं हरी जाणे बाई ! कारण तो एवढा अवलिया आहे म्हणतात कीं, शहाण्यानं त्याच्या वाटेला जाऊं नये ! आतां माझ्या गीता पठणाचाच त्याच्यावर काय परिणाम झाला तर गोष्ट वेगळी ! बघूंया काय काय होतंय तें ! मी तरी दुसरं म्हणणार काय ! नाहीं का?

● ● ●

## ११ : कधींमधीं खोटं बोलावं

खरं म्हणजे चावलीन काकूंचं आणि माझं; तसं फारसं कधीं सूत जमलं नाहीं. आम्ही कधीं एकमेकींशीं एकजीव होऊं शकलों नाहीं. कधीं एकत्र काम केलं नाहीं. एकमेकींच्या घरीं गेलों नाहीं. पण कशी कोण जाणें, मी परवां चावलीन काकूंच्या बोलण्याला एकाएकीं भाळलें. देवाशपथ ! सांगितलं तरी कुणाचा या गोष्टीवर विश्वास बसणार नाहीं, पण घडलं बरीक खरं हं !

म्हणजे त्याचं असं झालं कीं, महिला मंडळाच्या खास वार्षिक सभेसाठीं निमंत्रण करायला मुंबईला जायचं असं चावलीन काकूंनीं म्हटल्याबरोबर त्यांनीं कांहीं म्हणायच्या आंतच मी एकदम ‘ हो, मी येतें. ’ असं बोलून गेलें... आणि काय गंमत बघा, आम्ही दोघी पण एकमेकींच्याकडे आश्चर्यानं बघत राहिलों ! आणखी आमच्याभोंवतीं बसलेल्या बाकीच्यांना पण कमालीचं नवल वाटलं...आम्हीं दोघींनीं एकत्र येऊन काम पाहायचं म्हणजे मोठा चमत्कारच होता ! न पटणारी, न घडणारी ही गोष्ट होती. पण अचानक सारं कसं जुळून आलं देव जाणे कीं हरी जाणे ! मी बरीक चावलीन काकूंवर अशी चटकन् भाळलें, त्याला नाहीं म्हटलं तरी थोडं कारण आहे. ह्या बाईचं नांव सरळ सरळ सुमित्राबाई देसाई असतांना ह्यांना चावलीन काकू कां म्हणतात हें कोडं मला त्यांच्याकडून उलगडून घ्यायचं होतं. आणखी तेवढ्यासाठीं माझ्या तोंडून एकदम हुंकार भरला गेला न् काय ! मागाहून जीव थोडा चुटपुटला, पण माघार घ्यायची आतां सोय नव्हती. छे मुळीच नाहीं ! म्हणून तर मीं पांच मिनिटांत सारी तयारी करायचं वचन देऊन चावलीन काकूंना म्हटलं, “ चावलीन काकू, कोणत्या गाडीनं जाऊं या ? मला फार आवडेल तुमच्याबरोबर यायला. ” आणखी आपण मनांत नसतांना दाबून खोटं बोललों म्हणून जीभ चावली. बाकीच्यांना

माझं हें जीभ चावणं मी संकोचलें म्हणून घडलं असं वाटलं; आणि चावलीन काकूंना तो विनय वाटल्यानं त्या माझ्यावर बेहद्द खूष झाल्या! माझ्याकडे प्रेमानं, कौतुकानं बघत म्हणाल्या कशा, "बाईला माझ्या डेक्कन क्वीननं नेईन हो. पण गडे लौकर तयार रहायचं हं उद्यां सकाळीं! मी साडेसहाच्या ठोक्याला न्यायला येईन." मग काय? इतर चारचौघींनीं मला बघून 'आहे बुव्वा!' चा नखरेल शेरा मारला आणि मला अस्मान ठेंगणं झालं. मीं चहूदिशीं सगळ्या अटींना होकार दिला आणि लगोलग घर गांठलं. तयारी करायला हवी होती नाहीं का?

पण काय गंमत बघा हं! मीं जेव्हां घरांत आल्यावर आईवडिलांना आमच्या मुंबई-प्रवासाची हकीकत सांगितली आणिक तयारीला लागलें, तेव्हां खरंच कीं मला कांहीं सुचेना. चावलीन काकूंबरोबर जायचं म्हणजे दाबून नट्टापट्टा हवा होता. सुंदर पातळं हवीं होतीं. आणखी मुख्य म्हणजे खिशांत पैसे भरपूर पाहिजे होते. मग हें जमावं कसं? माझं तर सगळं साधंबाधं. म्हणजे मोठीच पंचाईत कीं! तेव्हां बसलें विचार करीत. घरांत कुणाला बोललें नाहीं. जवळ होते नव्हते ते पैसे घेतले, आणखी साधींच दोन पातळं एका पिशवींत घालून रात्रभर विचार करीत राहिलें. कसं होतंय नि कसं नाहीं, हा एकच विचार. धड झोंपहि येईना. जीव कसा उलथापालथा झाला अगदीं. कोठून ह्या फंदांत पडलें असं झालं पण करणार काय?

अखेर शेवटीं बरोबर सात वाजतां चावलीन काकू आल्या, रिक्षा घेऊन आल्या. गाडी 'फेल' झाली म्हणाल्या. मग कशाबशा आम्ही स्टेशनवर आलों. तर मला वाटलं कीं, ह्यांनीं तिकिटं काढलीं असतील. बघतेंय तर काय? त्यांनीं मलाच पहिल्या वर्गाचीं तीन तिकिटं काढा म्हटलं तशी माझं धाबं दणाणलं. आणूं कोठून एवढे पैसे? पण घाबरलें नाहीं कीं तिसरं तिकीट कुणाला म्हणून चौकशी केली नाहीं. होते नव्हते तेवढे पैसे खिशांतून काढून तिकिटं काढलीं आणि रुबाबांत रेल्वेंत जाऊन बसलें. चावलीन काकू माझ्या मागोमाग आल्या. घटकाभरानं त्यांची लेक येऊन शेजारीं बसली. मी आपली गप्प होतें. बरोबर घेतलेलं पुस्तक वाचायचा आव आणला होता. शेवटीं गाडी सुरू झाली आणिक दार बंद

करून माझ्या शेजारीं बसत शंभराची एक नोट माझ्या पुढ्यांत ठेवीत चावलीन काकू म्हणाल्या, " सगळे पैसे घ्या. तिघींचे पण. मोड नाहीं. " पण मी कुठली मोड देऊं ? आतां आला का वांधा ? पण डगमगलें नाहीं. दाबून ' देतें ' म्हणालें. घटकाभरानं चहाचं निमित्त काढलं. रेल्वेच्या रेस्टॉरंटमधून मोड घेऊन आलें. चहा मागवला.

आम्हीं मग चहा घेतला. चहाचे पैसे मीं दिले. तेव्हां मात्र तोंड भरून माझं कौतुक करीत चावलीन काकू म्हणतात कशा, " अशा बायका असाव्यात, कुरकूर नसावी. प्रवासाला निघालं कीं पैशाची नड नको. माणसानं उदार असावं. आतां माझंच बघाना ! हा प्रवास-खर्च मी पदरचा करणार. महिला मंडळ थोडंच देतंय ? आणखी वर सभा संपल्या-वर भात पिठलं सर्वांना खाऊ घालणार. आमच्या घरचे तांदूळ तामसाळ. भात कसा खातच रहावा वाटतो. हिंदींत तांदुळाला चावल म्हणतात. म्हणून गंमतीनं मी चावलीन काकू !

" अगबाई ! " मला हवी ती गोष्ट झटपट बाहेर आली म्हणून टाळी वाजवून मी हंसलें. त्यांनाहि हंसू आलं. मग त्या आणखी म्हणाल्या, " मी नांदायला आलें त्या वेळीं घरांत महिला मंडळ फियला मंडळ कुठलं खपायला ? आणिक वेळ तरी कुठला ? सारखं घरकाम नि गर्भारपण नाहींतर बाळंतपण ! पण सारं एकटी करायची गडे मी. सासूबाई माझ्यावर खूष असत. मग मीं हळूहळू एक गंमत केली. रात्रीच्या वेळीं सासूबाई निजल्या कीं ह्यांना सांगून शेजारीं चार बायका गोष्टी करायला यायच्या तिथं जाऊन बसूं लागलें. पत्ते खेळूं लागलें. भजन करूं लागलें. आणिक मग हळूहळू पोराबाळांचा पाठीमागचा तगादा मागं सरला न् पोरं मोठीं झालीं तशी पापड-लोणच्यावरून एक मंडळ काढलं घरांत. "

" खरं म्हणतां ? " चावलीन काकूंच्या बोलण्याचं नवल वाटलं म्हणून मी चटकन् बोलून गेलें. तशी त्या आणखीनच नेटानं म्हणाल्या, " हो तर ? ऐका ना पुरतं. मग मीं काय केलं कीं सासूबाईनाच अध्यक्ष केल्या न् काय गडे ! "

" अस्स ! कमाल आहे बाई तुमची ! "

" आणखी मग हळूहळू आमचं मंडळ बाळसं धरूं लागलं. चांगल्या

तीस पस्तीस बायका येऊं लागल्या घरीं! एक दिवसाआड हं मात्र. मग मीं एक शक्कल काढली. सासूबाईंना खूप चढवल्या, खूप चढवल्या. त्यांच्यासारखी माझी आई कीं मावशी देखील नाहीं म्हटलं. एवढंच नाहींतर जगांत एवढी छान सासू नसेल म्हटलं. उदार माणूस शोधायचं तर तुम्हीच, असंहि म्हणालें. त्याचा परिणाम बरा झाला. माझ्यावर त्या ज्या खूष झाल्यात म्हणतां कीं बस्! मी म्हणेन तें घरांत होऊं लागलं. आमच्या मंडळापायीं आतां पैशाच्या पिशवीचं तोंड उघडलं गेलं. बायकांना चहापाणी मिळूं लागलं. लोणच्या-पापडावरून आम्ही शेवया गांठल्या. मग तिखटामिठाचे सांडगे, मग गव्हले, असं कांहीं करीत करीत गोष्टींचीं पुस्तकं वाचूं लागलों. आणिक शेवटीं तर सभेंत बोलण्यापोतर आमची मजल गेली!.... ”

“ अरे वा! ”

“ म्हणून तर आतां मी अध्यक्ष होईन या वर्षी! आतां घरांत कटकट नाहीं. दारांत वटवट नाहीं. पोरं मोठीं झालीं. यावरून त्यावरून असा पैसा गोळा केला. म्हणजे कुठं नाटकच कर, कुठं गाणंच कर. अगोबाई, एकदां तर आम्हीं मंगळागौर तिकीट लावून केली ना, तर शंभर रुपये आले! ”

“ काय म्हणतां? ”

“ पण त्या वर्षीं मग कोण भांडणं! ”

“ कशाबद्दल? ”

“ मी सांगतें. ” आतांपर्यंत गप्प बसलेली चावलीन काकूंची बाळी मधेंच बोलली म्हणून मी थोडी सावरून बसलें. तिला सांग म्हटलं. म्हणून ती म्हणाली, “ अहो, त्या सरस्वतीबाई नाहींत का? त्यांना आमच्या आईचा मोठेपणा खपेना. म्हणाल्या कशा, ‘ ह्याच कोण लागून गेल्या जिथंतिथं पुढारपण करणाऱ्या? ’ मग आई चिडली. ‘ मंडळ मीं काढलं ’ म्हणाली. मग तर त्या आणखीनच भडकल्या. अहो, त्यांची मजल एवढी दूरवर गेली कीं पाजलेला चहा देखील काढला! ”

“ कुणीं? सरस्वतीबाईनीं? छे हो, त्या तशा नाहींत. ”

“ आहां! कैवार नका घेऊं. फार बिलंदर बाई आहे. अलिकडे तुमचं

न् त्यांचं फार जुळलेलं दिसतंय म्हणून सांगतें. सावध राहा हो. फसवील ती बाई ! भूल पाडील ! ”

चावलीन काकूंनीं लेकीला चिमटून स्वत: खुलासा केला म्हणून मी चटकन् बोलून गेलें, “ छट्, बाई बाईलाच कुठं भूल पाडते काय ? पुरुषाबद्दल म्हणतां एखाद्या तर एक असो ! ” मला तितकासा पोंच यावेळीं राहिला नाहीं बोलतांना.

पण चावलीन काकूंचा पारा तेवढ्यानं एवढा चढला कीं, मी बाई पारच बावचळून गेलें. त्या दांतओंठ खातच डोळे फाडून माझ्याकडे बघत म्हणाल्या, “ मेल्यांना नुसता मोठेपणा हवा. इकडच्या तिकडच्या चुगल्या करायला हव्यात. कामं नकोत. पुरुषांचा संबंधच काय ? गोडबोल्या बायंका काळजाच्या भारी खवट. ही ही सरस्वतीबाई, दिडकी तरी खर्च करते का पदरची ? पण ऐट बघा ! झक् मारतंय इंद्राघरचं वैभव ! परवां साफ साफ तिनं सांगून टाकलंन् कीं, कलेक्टरच्या बायकोनं हें मंडळ काढलं म्हणून ! भर सभेंत हं ! म्हणजे ? जिभेला कांहीं हाड ! मीं मग ताड्दिशीं उठून खुलासा केला. मग ? सोडीन का ? हाडाचीं काडं केलींत मीं ! ”

एव्हांना लोणावळं गांव आलं. गाडी थांबली. आणिक कमळांचा झक्कास गुच्छ चार आण्यांला मिळत असल्याची वर्दी बाळीनं आपल्या आईला दिली. त्यामुळं चावलीन काकू गप्प बसल्या. पण घेतलेला गुच्छ माझ्या हातांत देऊन आणखी दोन गुच्छ घ्यायला मात्र त्यांनीं बाळीला खुणावलं. आणिक गाडी चालू झाली तशी त्यांनींच पुन्हां तोंड सोडलं, “ ह्या ह्या बयेनंच माझ्या पोरीला लग्नांत भेट म्हणून दिलेलं पेन परत मागावं का ? आणि मीं तिच्या मुलाच्या लग्नांत लुगडं दिलं तें ? मग मागूं परत ? छे छे ! आमचं ब्रीद नव्हे तें ! माणसानं पचेल तें खावं, शोभेल तें ल्यावं, आणखी मुख्य म्हणजे स्वतःला फसवूं नये कधीं ! हो, फुकटचा तेगारा करूं नाहीं. दिशाभूल होते अशानं, आपली न् जगाची पण.”

चावलीन काकूंचं हें बोलणं ऐकून घराला हादरा बसावा तसा कांहींसा मला भास झाला. म्हणून मी त्यांच्यासमोर थोडी चुळबुळ केली आणि कारण नसतांना खोटं बोलून गेलें, “ जग फार वाईट बघा ! ”

“ नाहीं. जग मुळींच वाईट नाहीं. आपण वाईट आहोंत. स्वतः

भक्कम असलं ना कीं कुणी वाटेला जात नाहीं. तुमचा बावळटपणा सोडून द्या!"

"कुणाचा? माझा?"

"हो हो, तुमचा."

"म्हणजे?" चावलीन काकूंच्या बोलण्यानं मी एकदम दचकलें. मला त्यांच्या बोलण्याचा रोखच कळेना. आपली 'आ' वासून त्यांच्याकडे टक लावून बघतच राहिलें वेड्यासारखी. त्यामुळं त्याच पुन्हां म्हणाल्या, "तुमचा बावळटपणा खरंच सोडून द्या. तुम्ही फार फशी पडतां लोकांच्या बोलण्याला. मग लोक तुमची पाठीमागं निंदा करतात. हवं तें बोलतात. कां म्हणून मी म्हणतें? तरी पण माझ्याच्यानं बोलवलं नाहीं." मग बाळीनंच माझी बाजू घेऊन आपल्या आईला म्हटलं,

"अग आई, ह्यांचं खरं खोटं उघड कर. मोघमांत नको. त्यांना कसं कळावं तें?"

तेव्हां मग चावलीन काकू थोड्या खालच्या आवाजांत म्हणाल्या,"मधीं एकदां तुम्ही त्या सीताबाईच्या–डॉक्टरणीच्या–घरीं आलां होतात. तुमचं लक्ष नव्हतं. पण मी बघत होतें. काय तमाशा केलांत पण?"

"तमाशा?..."

"नाहींतर काय! तुमची कदर कोणाला होती? डॉक्टरणीचं तोंड एकीकडे, त्या पाटलिणीचं–रखमाचं हो, तर तिचं तोंड दुसरीकडेच. आणिक हावरटासारखी तुमची मधें लुडबूड! दिसायला बरं दिसतं का? माणसाला कांहीं किंमत हवी. सोडून द्या हा बावळटपणा. काय म्हणून? आपण लागाच कां ह्यांच्या पाठीशीं? जेवायला मिळत नाहीं म्हणून कीं ह्यांचं कांहीं देणं लागतों म्हणून?"

आतां मात्र माझी दांतखिळी बसली. चावलीन काकूंच्या पुढं माझी मात्रा चालणार नव्हती. कारण घडली गोष्ट खरी होती माझा बावळटपणा त्या वेळीं माझ्या लक्षांत आला नव्हता असं नाहीं. उलट मी सीताबाईच्यावर माझा अपमान केला म्हणून चिडलें देखील त्या वेळीं! पण चावलीन काकूंच्या पुढं हें कबूल कसं करूं? म्हणून त्यांना मीं बनवलं हं! म्हणालें, "अहो, त्यांत माझा काय अपमान झाला? त्यांचा त्यांनाच पस्तावा झाला

असेल."

पण त्यांनीं माझी खरडपट्टी काढली, "अरे वा ! चोर तो चोर नि वर शिरजोर ! गप्प बसा. ठाऊक आहे सगळं मला. तुम्ही मागं मागं फार करतां लोकांच्या. फुकटचा मोठेपणा हवा म्हणून ! खुद्द माझ्याबद्दल देखील खोटंनाटं ठोकीत असतां लोकांच्याकडे हवं तसं ! पण गडे माणसानं एवढं खोटं नाहीं बोलूं ! मला नाहीं तें खपायचं. उगीच तुम्ही लेकीसारख्या म्हणून खपवून घेतें. म्हटलं आली सुधारता तर पाहावी म्हणून सारं गिळून वागतें तुमच्याशीं. आणिक आज तर तुम्ही माझ्या सहवासाची खोटी उंची दाखवलीत, तरी मी खरी मानून भडभड ओकावं तसं मोकळं केलं आपलं मन तुमच्यापुढं !"

"चावलीन काकू !...." मला कसं एकदम ओशाळल्यासारखं झालं. गहिंवरून आलं. डोळे पाणावले. वाटलं एकदम चावलीन काकूंची क्षमा मागावी. त्यांच्यापुढं चुकलं म्हणून लोळण फुगडी खेळावी.

पण माझ्या ताठपणानं मला ह्या भावनेंतून मागं खेंचली. खोटंनाटं बोललें म्हणून चावलीन काकूंनीं खरी गोष्ट ऐकवली असं वाटलं. आणि कशी कोण जाणे बाई, माझी मलाच एकदम फुशारकी वाटली ! कधीं मधीं असं खोटं बोललंच पाहिजे, त्याशिवाय माणसाचं खरं मन उघडं व्हायचं नाहीं, अशी माझी खात्री पटली. म्हणून डोळ्यांत तरारलेलं पाणी पदरानं हळूंच टिपीत मी चावलीन काकूंना म्हणालें, "तुमच्या पिठलं-भातांपेक्षां तुमचं बोलणं गोड आहे. एकदम पोटांत शिरतां तुम्ही माणसाच्या."

त्यावर बाळीला चहा मागवायला सांगून त्या मला एवढंच म्हणाल्या, "माणुसकी माणसाजवळ शिल्लक राहूं द्यायची एवढंच माझं काम. त्यासाठीं मग कधीं मला रागवावं लागतं. कधीं गोड बोलावं लागतं. कधीं सांभाळून घ्यावं लागतं. कधी रुसावंहि लागतं. आणि कधीं कधीं ताठपणा देखील बाजूला ठेवावा लागतो.

"त्यामुळं तुमचा माझ्याबद्दल अनेक दिवस गैरसमज होता तसा अनेकांचा असेलहि ! पण माझा कोणी तिरस्कार करीत नाहीं आणि मला वाटतं हीच माझी खरी संपत्ति ! लोकांची सेवा हीच माझी धनदौलत.

आतां बवाल मुंबईत. बिशाद नाहीं कुणाची नकार द्यायची!" आणिक त्यांनीं माझ्या पाठीवरून प्रेमानं हात फिरवला. लहान मुलासारखी मला जवळ घेतली. आणिक लाडीकपणानं 'शहाणी हो' म्हटलं. त्यावेळीं मला काय वाटलं तें कसं सांगूं? छे! नाहींच सांगतां येणार...असूं दे तें माझं माझ्याचजवळ...

● ● ●

## १२ : वेळ निघून जाते !

त्या दिवशीं सभागृहाकडे यायला मला बराच उशीर झाला होता. एक तर मी निघायच्या वेळीं एकाएकीं एक बाई मला खोलीवर भेटायला आल्यामुळं मला लवकर येणं जमलं नाहीं; आणि दुसरं म्हणजे, तो दिवस बिनसरकारी कामकाजाचा असल्याकारणानं वेळेला गेलंच पाहिजे असा निकडीचा कौल माझ्या मनानं दिला नाहीं. म्हणून मी नेहमीं दीड दोनला यायची ती आतां चांगली तीन वाजून गेल्यावर आलें. आणिक गडबडीनं हजेरीपटावर सही करून आतां सभागृहांत जाणार तोंच शिपाईबोवानं हातावर एक चिठ्ठी ठेवली. कुणीतरी माझ्यासाठीं बाहेर वाट पाहात असल्याचं त्यानं मला सांगितलं, म्हणून मीं ती चिठ्ठी उघडली, वाचली. आंत मजकूर होता, " आमच्या वनिता समाजांत व्याख्यानाला यावं म्हणून निमंत्रण करायला मी आलें आहें. काल फोनवर बोलणं झालंच आहे. आपली भेट व्हावी. "

" हें पहा, त्यांना म्हणावं कीं पांच दहा मिनिटांतच येतें म्हणून. थांबा म्हणावं हं ! " शिपाईबोवांचेजवळ मला भेटायला आलेल्या बाईना मी निरोप दिला आणि एक वेळ काय चाललंय तें सभागृहांत डोकावून पाहावं म्हणून मी गडबडीनं सभागृहांत शिरलें.

त्या वेळीं मी नेहमीं बसत होतें त्या जागेशेजारचे एक सन्माननीय सभासद मला म्हणाले, " आज बोलणार कां ? " तशी मी चटकन् बोलून गेलं, " अंहं ! कालच तर बोललें नाहीं का मी ? "

" आज बोललं पाहिजे तुम्हाला. "

" कारण ? "

" तुमचा लोकशिक्षणाचा विषय आहे. "

" असेल ! मग ? "

" तुम्ही बोला. आजचा ठराव महत्त्वाचा आहे. "

" कोणता ? "

" हा बघा. आतां हे गृहस्थ बोलताहेत तें संपलं कीं हा ठराव येईल."

" अस्सं !...मीं वाचलाय हा ठराव. "

" म्हणूनच बोला तुम्ही. "

त्या गृहस्थांनीं मला फारच आग्रह केला म्हणून मी मग बोलायची गप्प झालें. सभागृहाचं कामकाज चालू असतांना असं फार वेळ आपापसांत बोलणं बरं नाहीं असं वाटलं. म्हणून ऐकत बसलें...

तेवढ्यांत कुणीतरी हळूच माझ्या पुढ्यांत एक घडी घातलेला लहानगा कागद सारला. स्वाभाविकच तें काय आहे म्हणून पाहायची उत्सुकता मला वाटली. मीं ती घडी उलगडली, वाचूं लागलें. अक्षर अनोळखी होतं. म्हणून खालींवर पाहिलं. पण ओळखीचा पत्ता लागेना. नांवगांव लक्षांत येईना. शेवटीं मजकूर वाचला. पाहातें तर बातमीदारांच्याकडून एक विनंति केली गेली होती—

" आमच्यापैकीं आत्तां येथें हजर आहेत त्यांची तुम्हांला विनंति आहे. आग्रहाची सूचना आहे. तुम्ही आतां येणाऱ्या ठरावावर एक सुंदर भाषण करावं. "

म्हणून मीं वरच्या बातमीदारांच्या सज्जाकडे पाहिलं. तशी एकदोघांनीं मंदस्मित करून माना डोलावल्या. निरोप खरा असल्याचा इषारा दिला. मीं खालीं मान घातली. एवढं ह्या ठरावांत आहे तरी काय बघावं म्हणून शेजारच्या सभासदांचा कागद मागून घेतला; आणि आतां बोलायचं आहे या निश्चयानं तो वाचणार, तितक्यांत पुढच्या कोचावर बसलेल्या एक स्त्री सभासद उठून आल्या. माझ्या शेजारच्या रिकाम्या कोचावर बसल्या. म्हणाल्या, " अहो, आज मला चहाचं निमंत्रण आहे. तुम्हाला बोलावलंच आहे तर लेडीज रूममध्यें चहा धाडायची व्यवस्था मी कँटीनमध्यें जाऊन आतां करतें. " आणिक आल्या तशा निघून गेल्या. मला भारी राग आला. म्हणजे स्वतः हजर नसतांना मला चहा देण्याची व्यवस्था करायची याचा अर्थ काय ? ह्या समजतात तरी काय मला ? त्या बाईंची मला विलक्षण चीड आली. म्हणून मी ताडकन् उठलें आणि बाहेर निघालें.

परंतु त्याच क्षणाला चालू ठरावावर मतनोंदणी मागितली गेल्यानं मला मुकाट्यानं माघारीं परतावं लागलं...आणि माझ्यासाठीं बाहेर वाट पाहात उभ्या असलेल्या त्या बाईची मला अचानक आठवण आली. "बिचारी मला काय म्हणत असेल तरी?" माझा जीव चुटपुटला. चटकन् जावं म्हटलं तरी जातेंय कुठली? तिथल्या तिथंच घुटमळलें. काय करणार? चिठ्ठी धाडायची पण सोय नव्हती! कोण त्या बाईंना ओळखणार?

तशांत घंटा वाजत होती. मतदानासाठीं बाहेरचे–लॉबींतले–सभासद आंत येत होते आणि आतां सभागृहाचे दरवाजे बंद होणार होते. म्हणजे तब्बल अर्धा तास तरी मला बाहेर जातां येणं अशक्य होतं! आतां ती बाई मला चिक्कार बोलून घेणार. माझी माणुसकी चव्हाट्यावर आणणार. अगदीं हें ठरलेलं भाकित होतं. पण काय होईल तें होईल म्हटलं, आणि गप्प बसलें...

धटकभेरानं मतदान सुरू झालं. मी आमच्या पक्षाच्या बाजूनं मत द्यायला निघालं. तेवढ्यांत विरोधी पक्षाचे एक प्रमुख माझ्याकडे येत म्हणाले, "बोलणार ना! आतां खरी कसोटी आहे. बहुजनसमाजाच्या–कामगारांच्या–जीवनाचा प्रश्न आहे. अहो, एवढ्या कामगारांना साक्षरतेचं शिफारसपत्र हवंय! त्याखेरीज नोकरी नाहीं म्हणजे? छे! ही काय पॉलिसी झाली सुधारणेची? म्हणजे नोकरी सोडून भीक का मागायची ह्या माणसांनीं? तें कांहीं नाहीं. तुम्हाला बोललं पाहिजे. नाहींपेक्षां बहुजन-समाजाबाबतच्या नुसत्या सुधारणेच्या आणि सुखासमाधानासाठीं उद्धाराच्या भाषा आजपासून बंद करा. खोटीं नाटकं बास झालीं. आजची वेळ नाहीं बोललांत तरी निघून जाईल. पण सर्वसामान्य माणसं मात्र तुमच्यावर विश्वास ठेवतील असं वाटत नाहीं. हें पक्षीय राजकारण नव्हे. हें समाज-कारण आहे. अशानं हजारों स्त्रियांच्या चुली बंद पडतील! विचार करा."

मीं यावर त्यांना उत्तर दिलं नाहीं. ते रागांत होते. चिडून होते. आणि मीं नेमकं काय बोलावं हें मला कळत नव्हतं. म्हणून मी तशीच पायाजवळच्या रिकाम्या कोचावर बसलें. येणारा ठराव काळजीपूर्वक असा आणखी एकदांदोनदां वाचला. मग चटकन् मत देऊन आलें, आणि प्रतोदांना विचारलं, "काय हो, आमच्याच पक्षाच्या माणसानं मांडलेल्या

ठरावाला विरोध केला तर ? "

प्रतोदसाहेब म्हणाले, " नाहीं चालणार ! " त्यांनीं रागानं माझ्याकडे पाहिलं. मग मीं पुन्हां कांहीं त्यांना विचारलं नाहीं. सरळ त्या खात्याच्या मंत्रीमहाशयांना भेटले. त्यांनाहि तोच प्रश्न विचारला. आणिक त्यांनींहि तसंच उत्तर देत म्हटलं, " विरोधच करायचा तर बोलतां कशाला ? पक्षाची शिस्त पाळली पाहिजे. " त्यामुळं हातपाय खुंटले. आतां काय करावं ? स्वस्थ बसायलाहि मन राजी होईना. मनाची अस्वस्थता सारखी वाढत गेली.

त्याच वेळीं मनांत एक विचार विजेच्या वेगानं चमकून गेला...' सुख हें अत्तर असं आहे कीं त्याचा वर्षाव वा सुगंध तुम्हांला इतरांच्यासाठीं करणं एव्हांच शक्य होईल कीं, जेव्हां त्याचा एखाददुसरा थेंब तरी तुम्ही स्वतःच्या अंगावर लावाल ! ' ... मला ही कल्पना एकदम आठवली. बहुजनसमाजाच्या कल्याणाची भाषा बोलायची, तर त्यांचं जीवन सुखदायी होण्यासाठीं कांहीं दिव्य करावं लागलं तर तें करायची तयारी पाहिजे. मी माझ्या मनाची तयारी करूं लागले. बोलायचं ठरवून टाकलं. सभापतींच्याकडे नांव कळवलं...

सर्वसामान्य माणसं म्हणजे कष्टाळू जीव. त्यांची भावना भोळी-भाबडी. नादरूप होऊन तिनं त्यांच्या ओठावर खेळावं. तिथंच रंगाळावं. आपल्याच नादांत गुंगून जगाला जिंकावं...

माझ्या भाषणाची जुळणी या रीतीनं माझ्या मनांत होऊं लागली. तशी आठवलं कीं, मागं एकदां आमचे मुख्यमंत्री पोलीस खात्यावर बोलतांना म्हणाले होते तसं या प्रश्नावर आपण बोलावं. त्यांनीं बोलून दाखवलं होतं, " पोलिसांच्या चांगल्या कामगिरीवर खूष होऊन तुम्हीं त्यांच्याकडे आदरानं पहायला शिकलं पाहिजे ! " हो. आमच्या कामगारांच्या बाबतींतहि याच आदरानं पाहायची वेळ आतां आली होती. केवळ त्यांच्याजवळ साक्षरतेचं शिफारसपत्र नाहीं म्हणून त्यांना नोकरीवर राहण्याचा हक्क न पोंचणं ही गोष्ट त्यांच्या दृष्टीनं बरोबर होणारी नव्हती. दिवसभर घाम गाळून त्यांना रोजची भाकरी मिळवणं मुष्किलीचं होई, तिथं शिकायचं केव्हां त्यांनीं ? आणि आतां शिकून साक्षरतेचं शिफारसपत्र त्यांनीं

मिळवीपर्यंत खायचं काय ? हां, त्यांना जर हें शिफारसपत्र नोकरीला बंधनकारक न ठेवतां त्यांना मिळणाऱ्या कोणत्याहि प्रकारच्या सवलतीला ठेवलं तर हरकत नव्हती !

मला एक निराळा विचार सुचला. मतदान त्या वेळीं संपलं होतं. आणि हा ठराव मांडायला एक आमच्या पक्षाचे सन्माननीय सभासद उभे राहिले होते. त्यांचं भाषण मी लक्ष देऊन ऐकूं लागलें ...साक्षरतेची आवश्यकता मलाहि पटत होती, जरुरीची वाटत होती, पण त्यासाठीं हा मार्ग चुकीचा होता. अन्य प्रकारें ही गोष्ट साधतां येणं शक्य होतं. त्यासाठीं सरकारकडून कायदा करण्याची, अगर असला बिनसरकारी कां होईना, ठराव पास होण्याची गरज नव्हती ! हा कायद्यानं सुटणारा प्रश्न नव्हता. लोकांना वाचनाची गोडी लागली पाहिजे, ज्ञानार्जनाची भूक लागली पाहिजे, यासाठीं कांहीं होणं अगत्याचं होतं...माझी अस्वस्थता वाढत गेली. नाना प्रकारचे विचार मनांत घोळत राहिले...विरोधी पक्षाच्या मंडळींनीं आपल्या परीनं या ठरावाला विरोध केला...आणि मग मी संध्याकाळीं सहाच्या सुमारास बोलायला उभी राहिलें....

त्या वेळीं वरच्या गॅलरींतील प्रेक्षक बरेच कमी झाले होते. बातमीदारांची संख्या रोडावली होती आणि सभागृहांतील बऱ्याच जागा मोकळ्या दिसत असल्यानं सभागृहाची भव्यता नजरेंत भरत होती. तशांत मी बोलायला उभी राहिलें आणि 'अध्यक्षमहाराज', म्हणून आरंभ केला तसं मनांत आलं कीं, हा विरोध चांगला सांधला तर ठीक, नाहींतर भलतं साहस केल्यासारखं होणार ! पक्षाची शिस्त मोडल्यानं शिस्तभंगाचा आरोप येणार !...पण मीं मग धीर केला. होईल तें होऊं दे म्हटलं. कुणाच्या रागालोभाची पर्वा केली नाहीं. आधणाच्या पाण्यांत भात शिजवावा त्याप्रमाणं आपल्याच लोकांचे रुसवे फुगवे त्यांच्याविषयींच्या कर्तव्यांत विलीन करून मोकळं व्हावं म्हटलं, आणि दाबून बोललें !

कामगारांच्या जीवनाची बाजू माझ्या परीनं मांडून मीं साक्षरतेचं महत्त्व भरपूर सांगितलं आणि शेवटीं हा ठराव मागं घेण्याची सूचना केली. साक्षरतेचं प्रमाण वाढायला माझ्या दृष्टीनं कांहीं मार्ग मीं सुचविले आणि मग खालीं बसलें.

या वेळीं सभागृह आणखी जास्तच 'रोडावलं होतं. पण आमचे शिक्षण-मंत्री समाधानांत असलेले दिसले. मला आमच्यापैकीं कोणीं कांहीं बोललं नाहीं. उलट भाषण चांगलं झाल्याचंच अनेकांनीं ऐकवलं...आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे तो ठराव मीं सुचविल्याप्रमाणं खरोखरच सर्वानुमतें मागं घेण्यांत आला!...मला एकदम बरं वाटलं. मी सभागृहांबाहेर निघून आलें...

आणि आतां त्या बाईंना पाहाणार तों शिपाईबोवांनीं त्यांचा निरोप माझ्या हातावर ठेवला. त्या बाईंनीं मला खडसावून लिहिलं होतं, "तुमच्याजवळ साधी माणुसकी देखील असूं नये याचं आश्चर्य वाटतं! जातील हेहि दिवस. आमदारकीचा एवढा डौल नको. वेळ निघून जाते, पण माणुसकी पणाला लागते. तुमच्याबद्दल चांगलं ऐकलं होतं, पण अनुभव मात्र उलटा आला..."

ती चिठ्ठी घेऊन मी तशीच लेडीज रूममध्यें गेलें. पुन्हां एकदां ती वाचली आणि नीट जपून ठेवावी म्हणून हातांतील पिशवींतल्या पुस्तकांत घातली.

चिठ्ठी नजरेआड झाली पण मनाला रुखरुख मात्र लागली. म्हटलं, "आंत काय चाललं होतं याची चौकशी तरी करायची ह्या बाईनं!" आणि मनाची समजूत घातली कीं, सभागृहांतील वेळ महत्त्वाची खास होती. हा ठराव पास होता तर भलतंच होतं! त्यापेक्षां या बाईचा राग परवडला.

तितक्यांत दुसऱ्या एक स्त्री सभासद माझ्याशेजारीं येऊन बसत म्हणाल्या, "बरं बाई धाडस केलंत!" पण मी त्यावर बोललें नाहीं. माझ्या डोक्यांत एक तर ती बाई होती आणि दुसरं म्हणजे मला लवकर खोलीवर परतायचं होतं. म्हणून गडबडीनं माझं सामान आवरूं लागलें, तशा त्या बाई पुन्हां म्हणाल्या, "आज तुम्ही फार मोठी कामगिरी केलीत बघा. उगाच आपला पक्ष म्हणून टेकू दिला नाहींत तें बरं केलंत."

आतां मात्र मी हंसलें. "आलं मनांत तें बोललें." एवढंच त्यांना बोलून दाखवलं. आणि 'उद्यां याची प्रतिक्रिया बरी-वाईट काय होईल तें होऊं दे' असें स्वतःशीं पुटपुटत घरीं निघून आलें...त्या वेळीं मात्र आपणाला ज्यांनीं मतं दिलीं त्यांना आपलं प्रतिनिधित्व मी करूं शकलें एवढं तरी वाटावं असा स्वार्थी विचार मनांत आला; आणि मग जो भेटेल

त्यानं माझ्या भाषणावर उलट-सुलट बोलायला सुरवात केली, तशी ह्यासंबंधींचा विचार डोक्यांतून अजिबात काढून टाकायची मीं शिकस्त केली...कारण त्यासंबंधीं विचार करायची वेळ देखील केव्हांच निघून गेली होती !...

● ● ●

## १३ : काकूमा

" देवी, तूं काय वाटेल तें म्हण ! मला असलं बिलकूल खपत नाहीं. नवरा झाला म्हणून काय वाटेल तें ऐकायचं कीं काय त्याचं ? मेला अपशकुनी कुठला ?...आणि ही कार्टी तरी काय म्हणून एवढी नेभळी निघाली ? आजकाल मेलीं सारीं दळभद्रींच कशीं निघालींत तरी म्हणावं ग ? "

घराच्या पायऱ्या चढत चढतच काकूमानं जेव्हां माझ्यावर तोंड सोडलं आणि रागानं पाहिलं तेव्हां मी हाबलकेंच. तिनं कशावरून आणि कुणा-वरून हें बोलणं केलं हें कांहीं केल्या माझ्या लक्षांत येईना. त्यामुळं ती मलाच बोलली असली पाहिजे, अशी माझी समजूत झाली; आणि काल संध्याकाळीं मी श्रीबरोबर फिरायला गेलेली बातमी हिला कुणींतरी सांगितली असली पाहिजे, असा माझ्या मनानं एकदम निर्णय देऊन टाकला! तशी मी इतकी घाबरलें कीं, काकूमाच्या हातांतील तांदुळाचं फुलपात्र आणि कोयरी घ्यायचं भान मला राहिलं नाहीं. माझ्या अंगाला दरदरून घाम फुटला आणि रस्त्यानं श्रीच्या सायकलला धरून मी मोठ्या खेळी-मेळीनं त्याच्याशीं बोलत गेलें होतें, तें नजरेंत खेळूं लागलं...काकूमा आतां माझा पार निकाल लावणार, या धास्तीनं माझे ओठ पांढरे फट्ट पडले आणि छाती दडपून गेली...

" देवी, तुला एकवेळच सांगून ठेवतें, मला विचारल्याशिवाय कुणावर प्रेमबिम करूं नकोस ! ' सोप्यांतील कडीपाटावर येऊन बसतां बसतां काकूमानं अशी भाषा काढली, तशी मी पुरतीच बावचळून गेलं. श्रीचा आणि माझा आतां ही निश्चित निकाल लावणार याची मला खात्री पटली. म्हणून मी एकदम बोलून गेलें, " काकूमा,....माझ्यावर विश्वास असूं दे... " पण मग माझी जीभ अडखळली...पुढचं श्रीबद्दलचं बोलायची

हिंमत मला झाली नाहीं...माझे हातपाय गार गार होत गेले...

"नाहीं ग! माझा तसा तुझ्यावर विश्वासच आहे, पण सांगतें आपली...ज्या दिवसापासून तुला चागलं पाखडणं यायला लागलं त्या दिवसापासून माझी खात्री झालीय् कीं, तुला शेतकरीच नवरा मिळणार म्हणून !..."

दोन्ही पायांनीं जमिनवर धक्का देऊन काकूमानं झोका घेतला आणि कमरेची डबी उघडून तपकिरीची एक चिमूट नाकांत कोंबीत असलं बोलणं काढलं, तसा माझा जीव पार उडून गेला. श्रीची आशा सोडावी लागणार कीं काय, या भीतीनं माझं काळीज दडपून गेलं ...आणि श्री भेटला कीं, माझ्या मनांत उसळणाऱ्या नाजुक प्रेमळ भावनांची राखरांगोळी होणार अशा धास्तींत माझा धीर खचला ... तरीपण मीं माझ्या मनाला सावरलं. काकूमा एकटी कांहीं माझं नशीब ठरवणार नाहीं अशी माझी मींच समजूत घातली; आणि वाटेल तें झालं तरी श्रीला सोडायचं नाहीं, असं मनाशीं पक्कं करून काकूमाला मी कांहीं बोलणार तोंच ती रागारागानं म्हणाली, "माझ्या घरांत असला धिंगाणा मीं घटकाभर देखील चालूं दिला नसता !" आणिक तिनं जोराचा झोका घेतला.

काकूमाच्या या बोलण्यानं तर माझी कंबरच बसली. मी उभी होतें ती अक्षरशः भिंतीला टेकून खालीं बसलें...एकाएकीं मला हुंदका आला ...मीं खालीं मान घातली...

पण तेवढ्यांत काकूमा पुटपुटली, "त्या आपल्या आळींतल्या शकणीचं ग ! ... घरांत एवढी संपत्ति. पण चार माणसांत आली कीं, लंकेची पार्वती होऊन येते... पांढरं पोलकं घालायचं. आणि अंगावर फुटका मणी म्हणशील तर शपथ ! कां तर म्हणे नवऱ्याची लहर ... वारे नवरा !..."

त्यामुळं मला धीर आला. माझ्याविषयीं काकूमाच्या मनांत कांहींच नव्हतं या कल्पनेनं मीं तिला न कळत माझे डोळे गुडघ्यावरच्या पातळाला पुसले; आणि वर मान करीत हंसून म्हणालें, "जाऊं दे ग ! आपल्याला करायचं काय ?"

" वा ? जाऊं दे म्हणजे?... मला नाहीं हें खपत. "
" पण तिच्या नवऱ्याचं म्हणणं तिनं नको ऐकायला ? "
" नाहीं. असलं नाहीं ऐकायचं ! "
" अग पण तिला त्याच्याशीं संसार करायचाय् ! "
" मग असला दळभद्रीपणा कशाला तो ? "
" काकूमा, उगाच तूं आपल्या डोक्याला नको त्रास करून घेऊंस. तिचं ती पाहील. "
" वा पाहील ती ? आमच्या समाजाला काळीमा येतो अशानं. लग्ना-मुंजींत देखील तिचा हाच अवतार ? लोक नावं ठेवतात. ... चार माणसांत जायचं तर त्यांच्यासारखं वागावं. नाहींपेक्षां जाऊं नये !... आज देवळांत हाच विषय जिच्या तिच्या तोंडीं तो ! "
काकूमा शकणीवर जास्त चिडली तसा मीं मुद्दाम विषय बदलला. म्हणालें, " अग काकूमा, या वेळीं तूं मत देऊन आलीस का परवाच्या मतदानाच्या वेळीं ? "
" म्हणजे ? ही बघ शाईची खूण ! " काकूमानं डावा हात माझ्यापुढं धरला आणिक ठसक्यानं म्हटलं, " शकणीचा विषय तूं डावलशील, पण माझ्या डोक्यांतून निघायचा नाहीं ! " म्हणून मग मीं जीभ आवरली. तिच्याशीं आणखी वाद घातला तर ती टाळकं सडकून काढील, म्हणून तिच्यापासून उठून आंतल्या खोलींत निघालें. तशी तिनं मला मोठ्यानं हटकलं, " चाललीस कुठं?... " त्या कारणानं माझे पाय आपो-आप थांबले. मागं मान वळवीत मी माघारीं फिरलें. आणि तिला सांगितलं, " चहा करतें. "
" चहाचं मग ! इकडे ये अशी. "
" काय ग ? "
" तूं त्या शकणीकडं कधीं जायचं नाहींस ! "
" अगबाई ! कां ग ? "
" तुला तिचं वळण लागेल .... आणि आजपासून तूं ह्या हातभर बांगड्या घालायचं सोडून दे !....तुझ्या नवऱ्याला तें चालायचं नाहीं ! "
" नवऱ्याला ?... " काकूमानं माझ्या नवऱ्याची गोष्ट काढली तशी मी

मोठ्यांदां दचकलें आणि हातभर मागं सरकून तिच्याकडे आश्चर्यानं पाहिलं... तिनं असली भाषा कुणाबाबत केली होती याचा अंदाज मला पाहिजे होता.... म्हणून मीं कपाळावर आठ्या चढवीत तिला विचारलं, " काय म्हणालीस ? "

" एकदां सांगितलं तेंच. पुन्हां पुन्हां काय ? " काकूमानं सरळ बोलायचं तें चिडून माझ्यावर एकेक डोळा एवढा केल्याकारणानं मी अंग चोरून एका कोपऱ्यांत उभी राहिलें. " त्या घटकेला आईबाप घरीं सोडून हिच्याकडे येऊन राहिल्याचा मला मनस्वी पस्तावा झाला...आणि म्हणून कशी कोण जाणे, कधीं नव्हे ती तिच्यावर खेंकसलें,

" अशानं मी माझ्या घरीं निघून जाईन...!"

आतां मात्र काकूमा चपापली. माझ्या घरीं मी निघून जाणं तिला खपत नव्हतं. मला सोडून ती जगूं शकत नव्हती. म्हणून मुद्दामच तसं बोललें...आणि त्याचा परिणाम बरा झाला. माझ्याजवळ येऊन तिनं मला गोडी गुलाबीनं विचारलं, " पुन्हां अशी म्हणायची नाहींस ना ? "

" लोकावरून रागावलीस तर नक्कीच म्हणेन आणि जाईनसुद्धां ! "

" देवी ! " काकूमाचे डोळे ओलसर झाले. ती कावरी बावरी झाली. तिनं माझ्या नजरेंत रोखून पाहिलं...त्यावेळीं तिच्या सौंदर्यानं मी मोहित झालें. तिच्याकडे टक लावून बघत राहिलें...

साध्या निळसर पातळांतील काकूमाच्या गोऱ्या गोऱ्या रंगांतील डोळ्यामधलं पाणी मला कमळाच्या पानावरील थेंबासारखं नाजूक आणि आकर्षक वाटलं. तिच्या तोंडावरील सुरकुतलेलं कातडं दुधावरच्या ताज्या साईसारखं दिसलं. आणि चाफेकळी नाकाखालचं बिनदातांचं तोंड एखाद्या सीताफळाला तें फार पिकलं म्हणजे चीर पडावी तसं भासलं. म्हणून मी तिच्या गळ्याशीं पडत पुटपुटलें, " काकूमा, किती सुंदर दिसतेस ग तूं ? मी अशी असते तर ? " तशी काकूमा हंसली. तिला एकदम बरं वाटलं. पदरानं डोळे पुशीत ती म्हणाली, " तरुणपणीं पहायला हवी होतीस. माझं रूप माझ्या नवऱ्याच्या डोळ्यांत मावत नव्हतं....दृष्ट लागेल म्हणायचे ते मी कुठं गेलें कीं ! "

त्यामुळं माझ्या मनांत एक निराळाच विचार डोकावला. तशी मी

 झाऊं गेलं सांगतें !

दिसायला गोरी नव्हतें, तरी माझ्या श्रीनं मला तसं म्हणावं असा मोह अनावर झाला...आणि म्हणून मी त्याला पत्र लिहून एक वेळ मनांतील कसं बोलून दाखवावं याचा विचार करीत राहिलें...

पण काकूमा चिडली. तिच्या शब्दाला मीं मान दिला नाहीं म्हणून तिला राग आला. म्हणाली, " घरांत पीकपाणी पिकतं नीटपणीं तर हीं उसणीं कशाला आणतेंय् मी ? " आतां मात्र मीहि तिच्यावर तुटून पडलें, " मग आणलीस कशाला मला ? मागं लागलं होतं कुणी ? " मग काय करूं ? तिचं बोलणं तसं झोंबलंच !

" देवी, असंच असेल तर निघून जा ! प्रेम कधीं एकेरी जमत नाहीं ...माझ्या मनाची समजूत घालीन मी !...वाटलं होतं कीं, तुझं माझ्यावर प्रेम आहे !...पण नाहीं. "

काकूमा ताड्दिशीं कडीपाटावरून उठली आणि देवघरांत निघून गेली. तशी तिच्या मागोमाग मी धांवलें. माझं चुकलं असं मला वाटलं आणि म्हणून ' तुझ्यापेक्षां लाखपटीनं तुझ्यावर माझं प्रेम नसतं तर मी इथं राहिलेंच कशी ? ' असं तिला विचारायला उत्सुक झालें...

परंतु काकूमानं धाड्दिशीं देवघर लावून घेतलं आणि आंतून कडी घातल्याचा आवाज झाला.

आतां बरीक माझं मन चरकलं. नाहीं नाहीं त्या शंका मनांत यायला लागल्या....म्हणून देवघराचं दार जोरानं ढकलीत मी ओरडलें, " काकूमा, माझी शपथ आहे, दार उघड. " वाटलं, माझ्या या शपथेनं ती ऐकेल. पण नाहीं. चकार शब्दानं आंतून उत्तर आलं नाहीं. त्यामुळं एवढी भीति वाटली कीं, विचारूं नका.

मागं एकदां काकूमानं रागाच्या भरांत स्वतःला असंच कोंडून घेतलं होतं. आणि जाम चांगले तीन दिवस तरी तिनं कुणाच्या धाकाला थारा दिला नव्हता ! त्यावेळीं ती बाहेर आली होती ती वेडी होऊन !...आणि तिला बरं करावी म्हणून माझ्या आईनं मला तिच्याजवळ आणून सोडलीं !... दोघी जिवाभावाच्या मैत्रिणी पडल्याकारणानं काकूमा माझी मावशी झाली होती. पोटच्या पोराप्रमाणं तिनं मला सांभाळीत स्वतःचं दुखणं बरं केलं होतं....आणि आतां ती खडखडीत बरी झाल्यावर माझ्या कारणानं ती

पुन्हां वेडी होईल या भीतीनं धाबं दणाणलं. म्हणून मी मोठ्यानं देव-घराच्या दारावर लाथ मारीत किंचाळलें, " अशी कोंडून घेणार असशील तर मला तुझ्या देवापुढं मारून तरी मोकळी हो काकूमा !... "

" देवी !..." खाड्दिशीं दार उघडून काकूमा माझ्याकडे धांवली आणि मला पोटाशीं धरून पुटपुटली, " नको बोलूस अशी ! मी जिवंत आहे तोंवर, सुखी ऐस पोरी !..." आणि मग आम्ही दोघीजणीहि बराच वेळ एकमेकींच्या कुशींत शिरून पोटभर रडलों !...

तेवढ्यांत कुणाचा तरी आवाज आला म्हणून डोळे पुशीत काकूमा उठली आणि मी दाराकडे कान देऊन पुटपुटलें, " आत्तां कुणाला फावलं यायला ? " आणि बघतेंय् तर समोर श्री उभा ! आतां काय करूं ?... काल ठरलं होतं त्याप्रमाणं तो मला घेऊन जायला आलेला ! आणि मी ही अशी ?...भीतीनं माझ्या काळजाच्या ठिकऱ्या उडून गेल्या...

" कोण पाहिजे ? " काकूमाचा आवाज आला तशी भीतभीतच पुढं होऊन मी म्हणालें, " माझ्याकडे श्री..." पण मला पुढचं बोलायचा धीर झाला नाहीं. त्या कारणानं काकूमा कडाडली, " हा कोण ? आणि तूं अशी घाबरलेली का ?....काय रे बाबा ? काय भानगड आहे ? " त्यावेळीं मी अक्षरशः थंडावलें व मटकन् खालीं बसलें.

पण श्री बोलला. म्हणाला, " मी देवीला भेटायला आलोंय. आम्हांला आत्तां बाहेर जायचंय्. "

" सगळं खरं. पण तूं कोण ? कुठला ? "

" इथलाच आहें मी !...देवीचा मित्र..."

" मित्र ? " श्रीदेखील बोलतांना थोडा गडबडला, तशी काकूमाला आणखीनच फावलं. त्याच्यावर तोंडसुख घेत तिनं मनांतला राग ओकून टाकला. म्हणाली, " तूं आलास तसा इथून जा !...माझी पोरगी कांहीं वाटेवर पडली नाहीं, तेव्हां कुणीहि यावं तिच्याकडे ते !..." आतां मात्र श्रीचा चेहरा पडला. त्याच्या भावनेचा अपमान झाला. एकदेखील शब्द न बोलतां तो आल्या पावलीं निघून गेला. मला भडभडून आलं...माझ्या दुबळेपणाची कींव आली. संतापहि आला...आणि म्हणून काकूमाच्या पायावर माझं डोकं आपटीत मी संतापानं बोलून गेलें, " आपल्या जांवयाला

कुणीं असं वागवलेलं चालेल तुला ?...इतकी कठोर कशी झालीस ग ?"

त्यानंतर काय घडलं आणि काय झालं मला आठवत नाहीं...पण ज्यावेळीं बराच वेळची बेशुद्धी जाऊन मीं डोळे उघडले त्यावेळीं एका बाजूला काकूमा आणि एका बाजूला श्री माझ्याभोंवतीं काळजींत बसलेले मीं पाहिले...म्हणून मग मी उघडलेले डोळे पुन्हां मिटून घेतले आणि त्या दोघांच्याहि चिंतेनांत ती अख्खी रात्र घालवली...

● ● ●

# १४ : दुसरा दिवाळी

' देसाई मास्तर आले !...देसाई मास्तर आले ! ' सगळ्या गांवांत हां हां म्हणतां बातमी पसरली. वीजपुरवठ्याच्या मुख्य केंद्रावरून बटण दाबलं असतां लख्खकन् साऱ्या गांवांतील चौकाचौकांत दिवे लागावेत आणि सगळीकडे उजेडच उजेड व्हावा तसं ह्या बातमीनं झालं. घरोघरीं ' मास्तर आले, मास्तर आले ' हाच आवाज घुमूं लागला. चौकाचौकांत हीच चर्चा सुरू झाली. रस्त्यारस्त्यानं हीच बडबड करीत लहानमोठीं माणसं धावूं लागलीं...

अंधार मी म्हणत होता. डोळ्यांत बोट खुपसलं तरी दिसत नव्हतं. तशांत पावसाची झिम्‌झिम् चालू होती. चिखलानं पाय जड होत होते... तरीपण लहानमोठीं कांहीं माणसं देसाई मास्तरांना सामोरं जावं म्हणून निघालीं होतीं. कुणाच्यातरी हातांत एकादा कंदील मधूनच डोकावत होता. तेवढ्यावरूनच त्या माणसांच्या हालचालींची जाणीव नदीपलीकडे फर्लांगावर उभ्या असलेल्या देसाई मास्तरांना होत होती. आणि आपल्या आगमनाची त्या लोकांना बातमी द्यावी म्हणून देसाई मास्तरहि मधूनमधून आपल्या हातांतील बॅटरीचा उजेड पाडीत होते...एकमेकांना होणारी ही एकच खूण परस्परांना सुखावीत होती. त्याच खुणेमुळं त्यांच्यामध्यें असलेल्या दोन अडीच फर्लांगांचं अंतर कमी होत होतं....

देसाई मास्तर मोटारींतून उतरून उभे राहिले होते त्या जागेपासून गांवांत जायचं म्हणजे नदी ओलांडून जाणं जरूरीचं होतं. आणि नदीला तर पुरुषभर पाणी चढलेलं ! अशा स्थितींत नदीला दोन्ही तीरांवर एक-मेकांना भेटायला उत्सुक असलेल्या लोकांना नदी ओलांडून पलीकडे कसं जायचं हा मोठा प्रश्न होता. कधीं नव्हे ते फार दिवसांनीं मास्तर गांवीं येत असलेले आणि तशांतच नदीला पाणी आलेलं ! त्यामुळं मास्तरांच्या

विद्यार्थ्यांची आणि प्रतिष्ठित गांवकरी मंडळींची मोठी धांदल उडून गेली. मास्तरांना नदीच्या अलीकडे आणायचं कसं हा मोठा प्रश्न ते सोडवूं लागले. नदीचं पाणी उतरल्याशिवाय बैलगाडी जाऊं शकत नव्हती ! अर्थात् आणखी दीड दोन तास तरी मास्तरांना तसंच ताटकळत उभं ठेवणं भाग होतं. पण त्याच स्थितींत फार वेळ मास्तर राहिले तर त्यांना काय वाटेल या धास्तीमुळं त्यांचा एक विद्यार्थी शिवराम कसलाहि विचार न करतां नदींत शिरला...त्याच्या मागोमाग शिवबानंहि कंबर कसली. छातीच्या वर असलेल्या पाण्यांतून ते दोघे पाणी कापीत निघाले...

रात्रींचे त्यावेळीं दहा वाजले असतील. गार वारा सुटला होता. नदीच्या पाण्याचा आवाज कानांत घुमत होता. अंधाऱ्या रात्रींत कांहीं दिसत नव्हतं. पाण्यांत पाय ठरत नव्हते. अंगाला थडकणाऱ्या लाटा नाकातोंडांत पाणी घालवीत होत्या. तरी पण शिवराम आणि शिवबा आनंदानं निघाले होते... मास्तरांना भेटायचं, त्यांचे पाय धरायचे, त्यांची शाबासकी मिळवायची, त्यांचा प्रेमळ शब्द ऐकावयाचा, त्यांचा मायेचा हात पाठीवर फिरवून घ्यायचा, ह्या कल्पनेंतच ते गुंग होते...आणि त्याच नादांत ते भराभर पाणी कापीत निघाले होते...

आणि मास्तर ! ते देखील आपल्याच नादांत होते. आपली ती शाळा, त्या वेळचे ते छोटे विद्यार्थी, त्यांची ती एकेक तऱ्हा, हाताखालचे त्या वेळचे मास्तर, बरोबर कुस्ती खेळणारी गांवकरी मंडळी, त्यांची ती आपुलकी, त्यांची ती नम्रता, त्यांचं तें अमर्याद प्रेम वगैरे सगळं मनाशीं आठवीत डोक्यावरचा फेटा खाकोटीला मारून बरोबर आणलेल्या ट्रंकेवर ते बसले होते. उजव्या हातांत छत्री धरून ते गांवाकडे पहात होते. त्यांनाहि केव्हां एकदां गांवांत जाईन असं झालं होतं .

“ अप्पा, कधीं हो जायचं गांवांत ? किती थंडी वाजतेय पाहिलीत ? आणि भूक तरी किती लागली आहे हो ?...असलं कसलं हो हें गांव ? कशाला आलों आपण इथं ? तुम्ही एवढे म्हणत होतां, एक तरी माणूस आला का आपल्याला न्यायला ?...”

मास्तरांच्या धाकट्या राजाक्कानं त्यांच्या पाठीवर पडून गळ्याशीं लोंबकळीत काकुळतीला येऊन विचारलं. तेवढ्यांत शिवराम धांवत आला.

लांबूनच त्यांच्या पावलांचा आवाज ऐकूं येत होता. मास्तरांनीं बॅटरीचा प्रकाश पाडून पाहिलं. धापा टाकीत शिवराम त्यांच्याकडे येत होता... त्याच्या मागोमाग शिवबाहि येऊन ठेपला. मास्तर उठून उभे राहिले. हातांतील छत्री बाजूला फेंकून सामोरे जात त्यांनीं शिवरामला आपल्या बाहुपाशांत कवटाळून घेतलं...आणि शिवबाकडे नजर जातांच शिवरामला एका हातानं धरून शिवबाला जवळ घेत ते म्हणाले, " तूंहि आलास ? "

" मग ? " अभिमानानं मास्तरांकडे पहात शिवबानं विचारलं, " आणि माई नाहीं आल्या ? राजाक्का कुठं आहे ? आणि तो आनंद ?"

" कोण शिवबा ? " मास्तरणीबाईंनीं शिवबाला ओळखतांक्षणींच त्याच्यावर झेप घेतली आणि म्हटलं,

" किती मोठा झालास रे बाळ ? " तेवढ्यांत शिवरामनं आणि शिवबानं मास्तरांना व मास्तरीणबाईंना खालीं वाकून नमस्कार केलेला बघून राजाक्का म्हणाली,

" नदींतून आला तुम्ही ?...थंडी नाहीं वाजत ? "

शिवबा चटकन् उठला आणि राजाक्काला जवळ घेत म्हणाला, " वाजते तर ? आणि केवढी मोठी झालीस ग तूं ? लहानपणीं कशी 'चिवा !' म्हणून हांक मारायचीस ठाऊक आहे ? अग, तुला रोजच्या रोज मी फुलं आणून द्यायचा आणि तूं म्हणायचीस, " फुव्वं ! आहे का माहीत ? "

" इश्श ! कांहींतरींच बोलतां हं तुम्ही ! " राजाक्कानं आपल्या केसाच्या अवखळ बटा तोंडावरून मागं सारल्या आणि ती हंसली. तेवढ्यांत आईला बिलगून उभ्या असलेल्या आनंदला जवळ घेत शिवराम म्हणाला, " भूक लागली आहे ना रे ? "

" नाहींतर राहील वाटतं ? आतां पुन्हां नाहीं रे बाबा तुमच्या गांवाला येणार ! "

आनंदाची ही तक्रार ऐकून सगळीजणं एवढ्या मोठ्यांदां हंसलीं कीं, त्या हंसण्याचा आवाज ऐकून आनंद गांगरला आणि आईच्या लुगड्यांत तोंड खुपसून बसला. त्यामुळं त्याला जवळ घेत मास्तरीणबाईंनीं त्याला सांगितलं, " अरे बाळ, हा शिवबा, हा शिवराम तुझ्याएवढ असतांना आपल्या घरींच असायचे रोज. मी त्यांना स्वतः दळून जेवूं घातलं आहे !

तूं तर त्यांच्याशिवाय राहायचा नाहींस आणि आतां त्यांना बघून तोंड लपवतोस ? वेडा कुठला ! "

" असूं दे जा ! " आनंदानं पुन्हां आईच्या कुशींत तोंड लपवल्यामुळं शिवबानं त्याला जवळ ओढला आणि म्हटलं, " आत्तां गाडी येईल काकांची. मग आपण घरीं जाऊं आणि मग गरम पाण्यानं हातपाय धुतले कीं, लगेच पाटावर बसूं. तुला आवडेल असा झक्क बेत आहे !..."

" बरं पण शिवराम, पाणी कितपत आहे नदीला ? उतार नाहीं झाला लवकर तर पंचाईत आहे. "

मास्तरांनीं शंका येऊन शिवरामला असं विचारलं तेव्हां तो म्हणाला, " हं ! त्याची काळजी नको. गांवांत नाहीं जायला जमलं तर शेजारच्या मळयांत जाऊंया आमच्या. " आणि त्यानं शक्य तितक्या मोठ्या आवाजांत हांक दिली. " अरे रामू, रामू ह ऽ ऽ ऽ ऽ "

" कुणाला बोलावतोस एवढ्या रात्रीचं ? "

" आमच्या गड्याला. तो आला म्हणजे हें सामान घेऊन जाऊंया. मी गांवांत जाऊन जेवण घेऊन येतों. "

" कांहीं नको माझ्या बाबा !...अहो, ह्यांच्या अंगांत घालायला तरी द्या कीं कांहींतरी. पोरं गारठून गेलीं असतील. " मास्तरीणबाईंनीं शिवरामच्या पाठीवरून मायेनं हात फिरवला आणि मास्तरांकडे पाहिलं. तेवढ्यांत मास्तरांचे आणखी दोन तीन विद्यार्थी नदी ओलांडून धांवत आले. त्यांनीं मास्तरांना व मास्तरीणबाईंना त्यांच्या पायावर डोकं ठेवून नमस्कार केला. तेव्हां मग त्यांच्यापैकीं एकजण–विश्वनाथ–म्हणाला.

" आतां गाडी येईल. पाणी कमरेइतकं उतरलं आहे ! "...

त्यानंतर मग अर्ध्या तासांत गाडी आली. गाडी ओलीचिंब झाली होती. अंग भिजल्यामुळं बैलांच्या अंगावर कांटा येत होता असं कंदिलाच्या उजेडांत स्पष्ट दिसत होतं. मास्तर आले म्हणून त्यांच्या विद्यार्थ्यांना झालेला आनंद बैलांच्या डोळयांतहि तरळल्याची खूण कंदिलाच्या उजेडांत दिसत होती. तें बघून मास्तरीणबाई म्हणाल्या,

" बैलांना कशाला रे बाबांनो त्रास. आतां उतरेल पाणी आणि मग जाऊंया चालत. "

" छे छे ! असं कुठं झालंय ? खरं म्हणजे असं व्हायलाच नको होतं आमच्या दारांत मोटर येते म्हणून आम्ही निर्धास्त होतो—पण पावसानं गोंधळ केला ऐन वेळीं !...मोटरचा आवाज आल्याबरोबर आम्ही धांवत आलों तें काय तुम्हाला चालत न्यायला होय माई ? "

शिवबा एकीकडे बोलत होता आणि दुसरीकडे मास्तरांचं सामान गार्डीत भरत होता. गार वारा त्यावेळीं त्याच्या उघड्या अंगाला झोंबत नव्हता कीं, पूर ओलांडून आल्यामुळं त्याला थंडीहि वाजत नव्हती ! मास्तर आले या आनंदांत तो एवढा बेहोष झाला होता कीं, काय करूं नि काय नको हें त्याला सुचत नव्हतं. त्यामुळं त्याच उत्सुकतेनं गार्डीत सामान भरून झाल्यावर समाधानानं मास्तरांकडे पहात तो म्हणाला, " चला आतां "...आणि त्यानं चटकन् राजाक्काला आणि आनंदला उचलून गाडीत बसवीत पुन्हां म्हटलं, " आतां गेल्याबरोबर जेवायला देतों. मग झालं ना ? "

सर्व मंडळी गार्डीत बसल्यावर विश्वनाथ चटकन् उडी मारून गार्डीत चढला आणि बैलांचा कासरा आवरून धरीत त्यानं म्हटलं, " राजूबाई, आनंद, नीट आवळून धरा हं बावकाडाला ! "

गाडीच्या पुढच्या बाजूला गाडीवान व शिवराम आणि मागच्या बाजूला शिवबा अशा थाटांत नदींतला प्रवास सुरू झाला. 'नदीचं पाणी थोडं अवखळ होतं. त्यामुळं चालणाराच्या आणि बैलांच्या पायांना ओढ बसत होती.....तरी पण अगदीं थोड्या वेळांत नदी ओलांडून गांवाकडे गाडी आली. त्यावेळीं मास्तरांच्या स्वागताला पंचवीस तीस गांवकरी मंडळी नदीकाठांवर आली होती. त्यांपैकीं प्रत्येकानं मास्तरांना कडकडून मिठी मारीत म्हटलं, " आला तुम्ही ! लई बेस झालं. तुमचं पाय आमच्या गांवाला लागले....दिवाळी दसऱ्यासारखा आनंद झाला मनाला....किती दिवसांनीं भेटतोंय आपण मास्तर ! "

त्या माणसांच्या तोंडावर उसळणारं समाधान, अंतःकरणांतून उफाळून वर आलेल्या प्रेमळ भावनेचा होणारा शाब्दिक आविष्कार, अमर्याद प्रेमानं त्यांनीं मारलेली मिठी आणि केलेलं जिव्हाळ्याचं स्वागत बघून मास्तर गुदमरून गेले. ह्या लोकांनीं आपल्यावर एवढी माया कां करावी

हेंच त्यांना कळेना ! आणि त्यामुळंच कृतज्ञतेच्या आनंदाश्रूंनीं डोळ्याच्या खोबणींतून उडी मारून त्यांच्या गालांवर घसरगुंडीचा खेळ सुरू केला....

त्या गांवांत मास्तर तीन चार दिवस राहिले खरे; पण अजून त्यांना आणि इतर लोकांना आणखी त्यांनीं तिथं राहायला हवंच असं वाटूं लागलं होतं. अजून खूप लोकांना त्यांना भेटायचं होतं. पुष्कळांकडे चहाला जायचं होतं. पुष्कळांची विचारपूस करायची होती. पण म्हणावा तसा त्यांना वेळच मिळत नव्हता....

मास्तर आले त्या क्षणापासून त्यांच्या झोपेच्या वेळेखेरीज एकहि क्षण असा गेला नव्हता कीं, त्यांच्याभोंवतीं कुणी विद्यार्थी अगर गांवकरी बसले नाहींत. सकाळीं उठल्याबरोबर कुणाकडे तरी चहा, थोड्या वेळानं कुणाकडे तरी फराळ, दुपारचं जेवण एकाकडे आणि चार वाजतांचा चहा दुसऱ्याकडे, तर संध्याकाळचं जेवण आणखी कुणाकडे तरी असा अव्याहत कार्यक्रम चालू होता...आणि मुख्य म्हणजे ह्या सर्व कार्यक्रमांना पंचवीस तीस मंडळी मास्तरांबरोबर प्रत्येक ठिकाणीं असायचीच ! मास्तरां-बरोबर बोलणं, त्यांच्याबरोबर भटकणं, ते बसतील-उठतील तिथंच आपणहि थांबणं, ते जातील तिथं त्यांच्याबरोबर जाऊन जेवणं, असाच जणूं त्यांच्या विद्यार्थ्यांचा मुख्य उद्योग होऊन गेला होता...

प्रत्येक विद्यार्थ्याच्या घरीं लाडू, करंज्या तयार होत होत्या. प्रत्येकाच्या घरीं पुरणपोळीसारखं पक्वान्न शिजत होतं....जातगोत, दुजाभाव, मनांतील अढी, उच्चनीच भाव, एकमेकांतील खाजगी वैमनस्य ह्या गोष्टींना सगळीकडे फाटा मिळाला होता...वर्षानुवर्षं एकमेकांना पाण्यांत बघणारे लोक त्यांच्या घरीं जाऊन मास्तरांबरोबर सुग्रास भोजनाची चव चाखीत असलेले बघून कित्येक लोक म्हणूं लागले होते, "खरंच, हें घडलं तरी कसं ?...मास्तरापाशीं काय जादुबिदू तरी नसेल ?"

होय, मास्तरांजवळ जादू होती खरी ! सात आठ वर्षांमागं मास्तर त्या गांवीं हेड्मास्तर म्हणून बदलून गेले होते. आणि त्यापूर्वीं चार वर्षां-पाठीमागं आणखी एकदां ते असेच मुख्याध्यापक म्हणून तिथं चारपांच महिने काम करून गेले होते. दुसऱ्या खेपेंत देखील ते वर्ष दीड वर्षां-पलिकडे तिथं नव्हते. पण तेवढ्या वेळांत त्यांनीं आपल्या प्रेमळ वागणुकीनं

आपल्या विद्यार्थ्यांना आपलंसं केलं होतं...

आणि मुख्य म्हणजे कुणीतरी अधिकारी माणूस म्हणून मास्तर त्या गांवांत कधींच वागले नव्हते.

शाळेंतील मुलं म्हणजे मास्तरांचीं स्वतःचीं मुलं झालीं होतीं! म्हणजे इतक्या अयर्याद प्रेमाचा वर्षाव त्या मुलांवर त्यांनीं व मास्तरीणबाईंनीं केला होता. स्वतःच्या मुलांप्रमाणं मास्तरीणबाईंनीं अनेकदां कित्येक मुलांना दळून भरडून जेवूं घातलं होतं. पुष्कळांचीं दुखणीं काढलीं होतीं...आणि स्वतःच्या मुलासारखं मास्तरांनींहि आपल्या विद्यार्थ्यांना जवळ घेऊन मायेनं घरीं वाढवलं होतं. आपल्याबरोबर परगांवीं नेऊनहि शिकवलं होतं! एवढंच नव्हे तर त्यांच्या शिक्षणासाठीं आर्थिक मदतहि केली होती... मुलांबरोबर मास्तर मल्लखांब, खोखो, आट्यापाट्या वगैरे खेळ खेळत होते. त्यामुळं मास्तर म्हणजे कुणी परका माणूस आहे असं कुणाला वाटायचं नाहीं! गांवकरी मंडळींबरोबरदेखील मास्तर कुस्ती खेळत असत! त्यामुळं त्यांचीहि दोस्ती झालेली...

आणि आज त्याच पूर्वीच्या जिव्हाळ्यामुळं सारे विद्यार्थी पुन्हां एक झाले होते. त्याच अवर्णनीय सुखाचा उपभोग घ्यायचा अनावर मोह आजहि त्यांना होत होता...

मास्तर आपल्या प्रत्येक विद्यार्थ्याची विचारपूस मोठ्या आपुलकीनं करीत होते. आणि मास्तरीणबाई प्रत्येकाच्या मुलांबाळांना कांहीं ना कांहीं खाऊ देण्यात गुंतल्या होत्या...त्यामुळं त्या विद्यार्थ्यांना व त्यांच्या मुलाबाळांनाहि या कुटुंबाबद्दल विलक्षण आपुलकी वाटूं लागली होती. रोजचं काम सोडून त्यांनाहि याच मंडळींच्या सहवासाचा आनंद लुटावासा वाटत होता...

मास्तरांचा असा आदर सत्कार चालू असतांनाच एक दिवस संध्याकाळीं पांचच्या सुमारास एकदम शिवबाच्या घरासमोरच्या चौकांत ढोलावरची थाप निनादूं लागली. त्या आवाजाची लकेर गांवाच्या कानाकोपऱ्यांत जाऊन भिडली. हां हां म्हणतां माणसांनीं सारा चौक फुलून गेला...गांवांतील प्रतिष्ठित माणसांत शिवबाचं घराणं जमा होत होतं. त्यामुळं त्यांच्यापैकीं कुणी गांवकऱ्यांना बोलवायचा अवकाश

कीं लगेच सारे जमा होत. तशांत आज मास्तर आलेले! त्यामुळं तर माणसांची नुसती रीघ लागून राहिली होती. थोड्या वेळांत दहावीस निवडक माणसांनीं मास्तरांच्या करमणुकीसाठीं म्हणून आपलं चित्तवेधक लोकनृत्य करून दाखविलं.

या लोकनृत्यांत पंधरा वर्षांच्या मुलापासून तों सत्तर वर्षांच्या म्हाताऱ्या-पर्यंत सर्वांनीं भाग घेतलेला! ढोलावरचे बोल हवेंत घुसूं लागले कीं, विजेच्या चपळाईनं हे सर्व हलूं लागत. लहान मुलांचा दिमाख म्हाताऱ्यांतहि उठून दिसे, इतक्या त्या नृत्याच्या हालचाली एकजात सर्वांकडून सारख्या केल्या जात!...

मास्तरांचं अंतःकरण भरून आलं. किती प्रेम करतात हे लोक!... गांवकऱ्यांनींदेखील मास्तरावर प्रेमामृताचा अभिषेक केला...स्वतःची कला, शेतवाडी वगैरे सारं सारं त्यांनीं त्यांच्यासमोर उघडं करून दाखविलं... त्यांचा हेतू एकच होता कीं, मास्तरांचा आशीर्वाद मिळावा! आणि त्याच भावनेनं मास्तर उठून उभे राहिले. लोकनृत्यांत भाग घेणाऱ्या लोकांना शाबासकी देऊन त्यांनीं मैत्रीचं हितगुज त्यांच्याशीं केलं, "लोकहो, आज तुम्ही आमच्यासाठीं ही जी तसदी घेतलीत त्याबद्दल मी आपला फार आभारी आहें. आपल्या या अलौकिक प्रेमाबद्दल मी आपला सदैव ऋणी राहीन...तुमच्या सहवासांत चार दिवस इतके आनंदांत गेले कीं, मला कशाचीहि आठवण झाली नाहीं...तुमचं प्रेम मला असंच लाभूं द्या...आपण एक दिलानं आपल्या शाळेसाठीं एक नवी इमारत बांधण्याचं काम हातीं घेऊंया. त्यासाठीं मी सुरवात म्हणून आज दोनशें एक रुपये आपल्या हवालीं करीत आहें..."

टाळ्यांचा कडकडाट झाला. पुन्हां ढोलाचा नाद घुमूं लागला. लोक-नृत्याची आणखी एक चुणुक पुन्हां सुरू झाली. बेभानपणें लोक नाचूं लागले...तें बघून तिथं जमलेल्या अनेक लोकांनीं शाळेसाठीं देण्यांत येणाऱ्या आपल्या देणग्या मोठ्या अभिमानानं जाहीर केल्या!...कृतज्ञतेनं मास्तरांचा ऊर भरून आला. आपल्या शब्दाला लोकांनीं किती मान द्यावा ही खूणगांठ त्यांनीं एकदां मनाशीं बांधली होती. पण त्याहि पलिकडे या लोकांच्या अवखळ मायेनं या प्रकारें जोराची उडी घेतलेली बघून

आनंदातिरेकानं त्यांना गुदमरून गेल्यासारखं झालं.

चारपांच दिवस दिवाळी दसऱ्याच्या सणाचं मंगलसौख्य गांवांत नांद-विणारे मास्तर जेव्हां परत जायला निघाले तेव्हां विद्यार्थ्यांनीं त्यांच्या पायावर डोकं ठेवलं आणि म्हटलं, " गुरुजी, तुमच्या पायानं पवित्र झालेलं आमचं घर पुन्हां त्याच पावित्र्यानं कधीं बरं भरून जाईल ? लोक म्हणतात, दिवाळी दसरा वर्षाला येतो नि जातो. पण...आमचा दिवाळी दसरा आतां झाला तो पुन्हां तुम्ही याल तेव्हां होईल...राजापूरच्या गंगेप्रमाणंच आम्ही हा दिवाळी दसरा साजरा करूं....लक्ष असूं द्या..."

मास्तर बसलेली गाडी हालली तशी राजाक्का शिवबाला हाताला धरून ओढीत म्हणाली, " तूं कधीं येशील आमच्याकडे ? भातुकलीचा स्वयंपाक करून देईन. "...आणि वियोगामुळं अनावर होणारं दुःख आवरीत मास्तरीणबाईनीं विद्यार्थ्यांच्या तोंडावर मायेनं हात फिरवीत म्हटलं, " वरचेवर येत जा. तेवढाच आम्हांला आनंद. आमचे विद्यार्थी हीच आमची संपत्ति...आणि ती सारखी नांदती ठेवणं तुमच्याच हातांत आहे. ...येऊं मग ? "

गाडी निघाली. चारपांच दिवस उफाळून वर आलेला सर्वांच्या तोंडा-वरचा आनंद एकाएकीं मावळला. विजेच्या वेगानं हालणारे विद्यार्थी निश्चल झाले. शून्य दृष्टीनं दूर कुठंतरी बघत त्यांनीं जड अंतःकरणानं मास्तरांचा निरोप घेतला...

बैलांच्या चाळांची खुळखुळ कानांवर येईपर्यंत शिवबा आणि काशीनाथ गांवच्या वेशींत उभे होते. दूरवर दिसणाऱ्या गाडीकडे पहात त्यांनीं एकमेकांकडे पाहिलं आणि म्हटलं, " देसाई मास्तर म्हणजे आपले गुरुजी नव्हेत. ते आपले आईबापहि आहेत !...असा देवमाणूस साऱ्या दुनियेंत नाहीं मिळायचा...ते भेटले म्हणून आपण रांकेला लागलों. त्यांचा आशीर्वाद आहे म्हणूनच आपण नांवारूपाला आलों..."

● ● ●

[library stamp]

## १५ : अध्यक्ष महाराज !

बदलत्या काळाला आणि सन्माननीय सभासदांच्या सोयीगैरसोयींना अनुलक्षून कांहीं नवीन नियम आपल्या वतीनं सभागृहापुढं आलेले आहेत. मला वाटतं, आपण असाहि एखादा नियम केलात तर बरं होईल कीं, प्रेक्षकांच्या गॅलरींत बसणाऱ्या सन्माननीय लोकांना केव्हां तरी बोलायची संधि द्यावी ! कारण, आम्हांला देखील असं वाटतं कीं, केव्हां तरी आपण आपलेहि विचार या सभागृहापुढं मांडावेत.

मुंबई विधानसभेच्या नियमामध्यें सुरवातीला कांहीं शब्दाच्या व्याख्या दिल्या आहेत. तिकडे मी आपलं लक्ष वेधूं इच्छितें. " सदस्य " या शब्दाचा अर्थ असा समजावा असं म्हणतांनाच असंहि म्हटलं आहे कीं, " मात्र असं ठरविण्यांत येतं कीं सदस्य नसलेला मंत्री व ॲडव्होकेट जनरल हे विधानसभेचें काम चालू असतां भाषण करणें, प्रस्ताव मांडणें व इतर रीतीनें भाग घेणें या कारणांसाठीं सदस्य म्हणून समजले पाहिजेत. परंतु या नियमाच्या आधारें त्यांना कोणत्याही प्रश्नावर मत देण्याचा हक्क रहाणार नाहीं, अथवा गणपूर्तीच्या कारणासाठीं ते सदस्य म्हणून समजण्यात येणार नाहींत. " अध्यक्ष महाराज, या नियमांतला हा उत्तरार्ध आम्हांला एकदम कबूल आहे परंतु आमचं म्हणणं असं कीं, सुरवातीच्या या सन्माननीय मंडळींत आपण आमचीहि गणना करावी. आम्ही देखील जनतेचेच प्रतिनिधी आहोंत. इलेक्शनच्या धमालींत आम्ही उमेदवार म्हणून उभे राहिलों नव्हतों. तरी आम्ही या ठराविक मंडळींना इथें येण्याचा मान मिळूं दिलेला आहे ! म्हणून आमचं म्हणणं असं कीं, कधीं तरी आपण आम्हांलाहि बोलायचा 'चान्स' देऊं करावा. जनतेच्या रक्तामांसाचे आम्हीहि खरे पाईक आहोंत, असा आमचा सरकारकडे दावा आहे.

अध्यक्ष महाराज, केव्हां केव्हां असें होतें कीं, सभागृहाचें कामकाज चालू

होण्यापूर्वी कोणातरी मोठ्या माणसाचं सन्माननीय सभासदासाठीं मौलिक व्याख्यान असतें. अशा वेळीं आपण थोडावेळ बसतां नि सभागृहाचं कामकाज वेळेवर सुरू व्हावं म्हणून मधूनच निघून जातां ! त्यामुळं बिचाऱ्या चिटणिसाची धावपळ होते. माणसाची इच्छा असो वा नसो 'कोरम' भरावा म्हणून कांहीं सन्माननीय सभासदांना त्या व्याख्यानाचा आस्वाद न घेतां आपल्या मागोमाग धांवावं लागतं ! तेव्हां अध्यक्षमहाराज, आमचं म्हणणं असं कीं, निदान अशा वेळीं तरी आम्हांला बोलायची संधि आपण द्यावी. आम्हांला आपण सन्माननीय सभागृहांत पाऊल ठेवूं दिलं नाहीं तरी आम्ही आमचे विचार प्रेक्षकांच्या गॅलरींतून सभागृहापुढें मांडूं ! फक्त आमची यावेळीं सरकारकडे एवढीच मागणी राहील कीं, आम्हांला वरच्या गॅलरींत एक दूरध्वनिक्षेपक यंत्र बसवून द्या ! हो, म्हणजे मग आमचा आवाज आपणा सर्वांपर्यंत पोंचायची खाशी सोय होईल.

आणि या सन्माननीय सभागृहाच्या कामकाजासाठीं मुक्रर केलेल्या बाकांवर बसून नव्हे, तर प्रेक्षकांच्या गॅलरींतूनच आम्ही आपले विचार आपल्यापुढें मांडूं हें मात्र निश्चित. अध्यक्ष महाराज, जनतेची भाषा आमच्या अगदीं अंगवळणीं पडली आहे; आणि आपल्या या सन्माननीय सभागृहाचे नियमहि आतां वरचेवर इथें या प्रेक्षकांच्या गॅलरींत बसून बसून तोंडपाठ व्हायची वेळ आली आहे. या गोष्टीला पुरावा म्हणून परवांच घडलेल्या एका गोष्टीकडे आपणां सर्वांचें लक्ष मुद्दाम वेधूं इच्छितें.

एक दिवस असा उजाडला कीं, नेहमींपेक्षां मला इथें यायला फारच उशीर झाला. त्यावेळीं आपल्या या सन्माननीय सभागृहांत घंटा वाजत होती. माझी समजूत झाली कीं, मतदानाची वेळ आली आहे, तेव्हां आपण लगबगीनं आंत गेलं पाहिजे. आणि म्हणून मी तांतडीनं जिना चढून वर गेलें तों पास न्यायचा विसरल्याचं तिथल्या अधिकाऱ्यानं माझ्या निदर्शनास आणलं. मग आमची विलक्षण धांवपळ झाली. ओळखीचं कोणीच दिसेना बाहेर ! पास आणायचा कोठून ?...आणि बाहेरच्या तंबूंत जाऊन तो तिथल्या नियमानुसार मिळवावा म्हटलं तर वेळ जात होता !... शेवटीं एकदोनदां खालींवर करून मी कोठून तरी आणि कसा तरी एक निळा पास मिळवला आणि मग सरळ वर जाऊन बसलें.

झालं गेलं सांगतें !

त्यावेळीं अध्यक्ष महाराज, अशी गंमत झाली कीं, साध्या व्हिजिटर्स गॅलरीचा तो पास आहे हें लक्षांत न आल्यानं अलिकडच्या प्रेक्षकांच्या गॅलरींत तोबा गर्दी होती म्हणून मधला पडद्याचा बांध ओलांडून मी पलीकडच्या स्पीकर्स गॅलरींतल्या एका रिकाम्या खुर्चीवर जाऊन बसलें. आणि त्याच क्षणाला आपण आपल्या जागेवरून उठून उभे राहिलांत व कोणाला तरी सभागृहाचा नियम मोडून आंत प्रवेश केल्याबद्दल आपण त्याची चांगलीच कानउघाडणी केलीत! अध्यक्ष महाराज, त्यावेळीं माझी जी धांदल उडाली ती विचारूं नका. आपल्याला नमस्कार करून मी ती जागा सोडली आणि प्रेक्षकांच्या घोळक्यांत जाऊन त्या निळ्या पासाचा मान राखला! पण नंतर मला समजलं त्याप्रमाणं आपल्याला नमस्कारहि न करतां अचानक पुढें जाऊन मंत्र्यांच्या कोचावरील जागेचा ताबा घ्यायला आम्ही धजलों नाहीं! आपले नियय आम्ही अक्षरशः पाळतों. म्हणून आम्हांला असं म्हणावयाचं आहे कीं, आमचें हें बिनसरकारी सभासदत्व आपण बेशक मान्य करावं.

अध्यक्ष महाराज, विधान सभेच्या नियमांची जी पुस्तिका मराठींतून मागं प्रसिद्ध झाली आहे, त्या पुस्तिकेच्या दहाव्या पानावरील बत्तिसाव्या कलमामधील भाषणांची कालमर्यादा आणि वादविवादासंबंधींची मर्यादा आम्हीं पण काळजीपूर्वक वाचलेली आहे. आमच्या हातून या नियमांचं उल्लंघन कधींच व्हावयाचं नाहीं. अगर परवांच मी वर्तमानपत्रांत वाचलं त्याप्रमाणं उत्तर हिंदुस्थानांतील एका सन्माननीय सभासदानं दहा तास सतत भाषण करून सभागृहाच्या कामांत अडथळा आणण्याचं धाडस केलं व सात हजार रुपये त्याची किंमत असल्याचा समंजसपणाचा दावा केला. तसलं धाडस आमच्या हातून होणें नाहीं! आम्हांला जनतेचं म्हणणं थोडक्यांत कसं मांडावयाचं आणि त्यासाठीं आपली वरचेवर संमति कशी मिळवावयाची हें आतां माहीत झालं आहे.

परंतु अध्यक्ष महाराज, जोंपर्यंत आपण आम्हांला बोलायची संधि देत नाहीं तोंपर्यंत मात्र हे सर्व नियम डोक्यांत घट्ट असं ठाण मांडून बसल्यानं आमच्या मनाची फार ओढाताण होते. कधीं कधीं सभागृहांत बसलेल्या सन्माननीय सभासदापुढं जो 'माईक' असतो त्या माईकमध्यें पाहिलं असतां

आपल्या लांबट चेहऱ्याचे मागोमाग सुदर्शन चक्र फिरावं त्याप्रमाणं वरच्या पंख्याची पडछाया पडलेली दिसते आणि आपल्या डोक्यांत असेच कांहीं विचार गरगर फिरताहेत असं वाटतं, तशीच आमची अवस्था झालेली आहे. म्हणून आमची सरकारकडे अशी नम्र सूचना आहे कीं, बिनसरकारी कामकाजाचे वेळीं का होईना आमच्यासाठीं आपण एखादा तास तरी स्वतंत्र राखून ठेवून आम्हांस बोलण्याची संधि द्यावी.

अध्यक्ष महाराज, आमच्या हातून एकदां "आय" नि एकदां "नो" असं होईल, पण परवां घडली तशी चूक नाहीं व्हायची. सरकारी पक्षांत आम्हांला सामील केलेत तर आम्ही सन्माननीय मंत्री निर्णय घेतील तसाच पाठिंबा देऊं शकूं. आणि विरोधी पक्षांत घेतलेत तर विरोधहि करूं; पण खरं म्हणजे अध्यक्ष महाराज, आमची सरकारकडे अशी सूचना आहे कीं, आम्हाला कोणीकडेहि न बसवतां स्वतंत्र म्हणून ठेवावं. आम्हाला आपल्यापर्यंत जनतेचा आवाज पोंचवावयाचा आहे एवढंच आमचं म्हणणं.

अध्यक्ष महाराज, या सन्माननीय सभागृहामध्यें प्रवेश करतेवेळीं पहिल्यांदां आपण प्रत्येक सन्माननीय सभासदाकडून राजनिष्ठेची शपथ घेतां. आमचीहि तशी तयारी आहे. आपण आमचेकडून आपल्या नियमांशीं एकनिष्ठ रहाण्याची शपथ घ्यावी. खालीं येऊन आपल्यापुढं शपथ वाचतां आली नाहीं अगर नंतर आपणाशीं हस्तांदोलन करतां आलं नाहीं तरी आम्ही वरूनच हा सोहळा बिनबोभाट पार पाडूं. विधानसभेच्या इतिहासांत टाईम्सच्या संपादकांना या सभागृहांत घटकाभर येऊं देऊन एक विलोभनीय प्रयोग झाला, त्यामध्यें मग आमचीहि गणना झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

विधानसभेच्या नियमावलींत पान तेरावर ४५ व्या कलमांत अध्यक्ष महाराज, असं म्हटलं आहे कीं, "कोणत्याहि सदस्यास, कोणत्याहि वेळीं, औचित्यविषयक प्रश्न निर्णयाकरतां अध्यक्षांना सादर करण्याचा अधिकार आहे. परंतु असें करतांना त्यानें प्रश्न मांडण्यापलीकडे अधिक कांहीं करतां कामा नये." आम्हांला हें एकदम कबूल आहे. आपण "सदस्य" म्हणून, मग तें सदस्यत्व बिनसरकारी कां असेना, आमचा एकदां स्वीकार केलात, तर आम्हीहि आपणांपुढं फक्त प्रश्न सादर करूं अशी आम्हाला उमेद

आहे ! आमच्या हातून याबाबत नियमबाह्य असं वर्तन कदापीहि होणें नाहीं.

अध्यक्ष महाराज, आम्हांला सरकारकडे व आपणापुढं एवढंच प्रामुख्यानं सांगावयाचं आहे कीं, आम्हांला केव्हांतरी, आपण या सन्माननीय सभागृहामध्यें आमचे विचार मांडण्याची संधि द्यावी. कारण एखाद्या बिलासंबंधीं अगर ठरावासंबंधीं जी चर्चा होईल तींत आम्ही भाग घेऊं शकत नसल्यामुळं ती पूर्णांशानं होऊं शकत नाहीं, असं आमचं ठाम मत आहे. विरोधी पक्ष आपल्या भूमिकेंतून आपले विचार मांडतो आणि सरकारी पक्ष त्यांचीं मतें खोडून काढून आपलं म्हणणंच बरोबर असल्याचा दावा करतो. परन्तु जनतेच्या सुपाएवढ्या काळजांत त्या विशिष्ट प्रश्नासंबंधीं भोळ्याभाबड्या का होईनात पण कोणत्या कल्पना वसत असतात, त्या प्रकट करण्याची आम्हांला संधि दिल्यास ती चर्चा खऱ्या अर्थानं पूर्ण होऊं शकेल, असं आमचं प्रामाणिक मत आहे.

अध्यक्ष महाराज, या सन्माननीय सभागृहाचा मौल्यवान वेळ फार काळ न घेतां शेवटीं एवढंच मी सांगूं इच्छितें कीं, " विशेष हक्कांचे प्रश्न " या सदराची सविस्तर माहिती देतांना विधानसभेच्या नियमांच्या पुस्तिकेंत पंचेचाळीसाव्या पानावर एकशें पंचाहत्तराव्या कलमांत म्हटल्याप्रमाणें आपण जर आमचा हा बोलण्याचा हक्क मान्य केलांत तर " विशेष हक्कांच्या समितीस लिहून कळविणें. जर परवानगी देण्यांत आली असेल तर अध्यक्षास, त्यांच्या मर्जीप्रमाणें सदरहू प्रश्न विशेष हक्कांच्या समितीस लिहून कळविण्याचा अधिकार आहे. " आपण एवढं करून आम्हांस उपकृत करावं एवढीच विनंति करून मी आपलें भाषण संपवितें.

वन्सं, खरंच सांग, आज मी तुला एवढी चांगली दिसलें का ग? देवाशपथ? खरंच? आणिक सासूबाईंना पण बरं वाटलं म्हणतेस? जाऊंदे बाई. मला त्यांच्या बऱ्यावाईटाशीं कांहीं कर्तव्य नाहीं. आल्या गेल्या बायकांनीं सून चांगली आहे म्हटलं, दिसायला छान आहे म्हणून शेरा मारला, आणि हिरव्या बुट्टीच्या चंदेरी साडींत नाकांत नथ घालून मी सासूबाईच्या सांगण्यावरून येईल जाईल तिला नमस्कार केला, म्हणूनच का मी चांगली? ही शिफारस वरकरणी आहे वन्सं. तुला माहीत नाहीं. सासूनं मला कधीं प्रेमानं जवळ केली नाहीं! खरंच, लोकांसमोर नुसता देखावा असतो भलेपणाचा. पण मी तेवढ्यावर ठीक मानून चालतें. माझ्या राजसाठीं सारं गिळून वागतें. तोंडावरदेखील शंका येऊं देत नाहीं. कुठं बोलत नाहीं. कुणाला सांगत नाहीं. आज वेळ आली म्हणून, आणिक तूं माझा विषय काढलास म्हणून, तुला तेवढी कधीं नाहीं ती सांगतेंय बघ! एरव्हीं सर्वांशीं चिडीचूप! आणिक तुझ्याशीं तरी कां एवढी पाघळलें म्हणशील तर कारण आहे. सौंदर्याची वाहवा केलीस म्हणून नव्हे हं! परवां तूं मुंबईहून पुण्याला आलीस. त्यावेळीं माझ्या पोरांना अर्धा तास आतेच्या मायेनं कवटाळलंस म्हणून. जिवाभावानं त्यांच्याशीं बोललीस, त्यांना खाऊं दिलास म्हणूनहि! हो, खरं सांगतें. आजवर माझ्या सासरच्यांनीं माझी, राजची अगर माझ्या मुलांची कधीं पर्वा केली नाहीं. फिकीर केली नाहीं. तूं तेवढी निघालीस. म्हणून बोलावंसं वाटतं तुझ्याशीं. राजची तूं मानलेली बहीण पण माझी एकटी वन्सं. हो, एकटी, अगदीं एकटीच. तुझ्याजवळ माणुसकी आहे, माणसाची पारख आहे. जिव्हाळा आहे. खोटं नाहीं सांगत, खरं अग! हवं तर राजला विचार. मी त्याच्याशीं हेंच बोलतें तुझ्याबद्दल. मला खोटं बोलायला नाहीं आवडत. आणि माणसाच्या तोंडावर एक नि पाठीमागं

दुसरंच हें तर मुळींच खपत नाहीं मला. म्हणून म्हणतें, तुझ्याएकीं माझा जीव घुटमळतो. विश्वास ठेव अगर न ठेव बाई, माझं मला तरी खरं बोलूं दे म्हणजे बास.

हो बाई वन्सं. आज मी खरंच फार खुषीनं वागलें. म्हटलं एव्हीं तेव्हीं सुनेच्या थाटांत, गृहलक्ष्मीच्या रुबाबांत घरांतून वावरायचं चारचौघींत, तर मग आनंदांत का असूं नाहीं ? खरं का खोटं ? म्हणून सकाळीं मुंबईहून आलें, राज आला नाहीं, रजा नव्हती. मुलंहि आलीं नाहींत. शाळा आहे म्हणालीं. मी तेवढी आलें. कर्तव्य म्हणून. घरांत नणंदेच्या मुलाचं बारसं. सासूबाईंनीं ये म्हटलं. आलें मी. येतांना राजनं परवां पाडव्याला घेतलेलं हिरवं जरीचं पातळ नेसून आलें. त्यानंच दिवाळीला आणलेल्या मोत्यांच्या बांगड्या लेवून आलें. घड्याळ घालून आलें. आईनं दिलेली नथ लेवून आलें. गळ्यांत गांठवलेलं मंगळसूत्र होतं, त्याच्या जोडीला मोत्यांचा एक सर ल्यालें. बस्स ! हाच माझा साज शिणगार ! तरीपण चारचौघींत मी उठून दिसलें म्हणतेस ना वन्सं ? धन्य आहे बाई तुझी. हें बघ, तुझ्या नजरेला दृष्ट न होवो बाई. मीठमिरची उतरून टाक हं स्वतःवरनंच !

माझ्या राजनं मला पाहिली न् मी त्याला पाहिलं, त्याचवेळीं आमचं मीलन झालं. मला तो आवडला. मी त्याला आवडलें. कारणं विचारूं नकोस. मी सांगणार नाहीं. पण एक सांगतें ऐक. राजनं घरीं लग्नाबद्दल लिहिलं. एकदम सगळीं मुंबईला आलीं एकाएकींच, नि आम्हांला आशीर्वाद दिला. भाषा नाहीं. बोलणं नाहीं. आले तसे निघून गेले सगळे. ही काय रीत झाली ? पण राज म्हणाला, असूं दे. माझी बाई कंबरच बसली हीं माणसं बघून ! नको म्हणायचं होतं ! नुसतं गप्प गप्प काय हें ? एवढी का मी वाईट दिसलें त्यांना ? पण वन्सं, नंतर मला कळलं कीं, मी फार गरिबाची म्हणून सर्वांचा राग, हुंडा चुकला म्हणून धुसपूस. स्वतः सून बघून करून आणायची हौस चुकली म्हणून संताप ! असूं दे. मी एकट्या राजकडे बघून त्यांच्या घरीं आलें.

मला कुणी नव्हतं. मोठ्या बहिणीकडे मी असायची. तिथं आईनं शेवटीं दिलेली नथ काय ती सोबतीण हक्काची. पण बहिणीनं मला शिकवलं. मी नोकरी करूं लागलें. दोन तीनशें मिळूं लागले. तशांत राज भेटला. माझं

नशीब उजाडलं. मी त्याला एक दिवस मुंबईच्या ' गेट वे ऑफ इंडिया'च्या तिथं पायरीवर बसून पाण्यांत पाय सोडलेला पहिला. आणि सूर्यास्ताच्या वेळीं समुद्राला नमस्कार करतांना त्याचवेळीं त्यानं मला पाहिली. दोघांच्या मनांत त्याक्षणीं एकमेकांचे विचार आले. त्यानंतर कुठं कुठं आमचीं ओझरतीं दर्शनं घडत गेलीं आणि अखेर शेवटीं चौपटीवर वाळूंत पाय खुपसून मी एकटीच तिन्ही सांजची बसलें होतें, तर राज अवचित तिथं आला. मोगरीचा सुंदर गजरा घेऊन आला. वातावरण एकदम प्रसन्न झालं. मग आम्हीं एकमेकांशीं बोललों. कोण, कुठले याची विचारपूस झाली....आणिक मग हळुहळू आम्हीं एक झालों, एकत्र नांदू लागलों...

पण वन्सं, सगळा एकाकी कारभार, दोघांचंच सारं जग. बहिणीनं कधीं विचारपूस करावी तेवढीच. सासरचं नांव नाहीं. वाईट वाटायचं, माणसांना हापापलेली मी, हिरमुसली व्हायची. मग राज म्हणायचा, ' कष्टी नको होऊंस, मी आहें. माझ्यांत सर्व पहा. आपलं प्रेम सर्वांना जिंकूं दे. ' मग बरं वाटायचं. गडे वन्सं, तरी पण रुखरुख यायचीच ग कधींमधीं. सणासुदीला, वाढदिवसाला, वाटायचं कुणीतरी घरचं यावं. कां म्हणून वनवाशी आपण ? पण बोलायची नाहीं. कुणीतरी, केव्हांतरी सासूबाई माझं फार कौतुक करतात असं सांगितलं कीं, जीव वाराहुरा व्हायचा ! खोटं कां बोलावं, मी म्हणतें ?

आणिक वन्सं, मी दवाखान्यांत बाळंत झालें. मुलगा झाला. घरीं जावं वाटलं. राजला बोललें. पण सासूबाई नको म्हणाल्या. वेळ नाहीं बघायला हिच्याकडे, अस्सं म्हणाल्या. काय वाटलं असेल मला सांग तूं ? काळीज फाटून गेलं. लहानगा बाळ घेऊन तशीच राजबरोबर घरीं निघून आलें. त्यानं एकट्यानं सगळं केलं... ! वन्सं, करायची काय हीं माणसं आणि त्यांचं तोंडदेखलं कौतुक तरी ? माझ्या मनांत त्यांच्याएकीं वैर नाहीं, दुजाभाव नाहीं. स्वप्नांतदेखील मी त्यांना वाईट चिंतीत नाहीं. तरीपण त्यांचा ठेका एक कीं, मी वाईट ! माझ्यामुळं राज बिघडला. मुलांच्या जीवावर कुणी जगूं नये म्हणे ! ऐक ऐक. म्हणजे राजनं सतरांदां आपल्या आईला लुगडं चोळी करावी, भावंडांना कपडेलत्ते करावेत, वडिलांची तऱ्हेतऱ्हेच्या कपड्यांची हौस भागवावी, बहिणींना माहेर करावं, भाऊबीज करावी

आणिक वर ही भाषा त्यांची ! आहे कीं नाहीं, तूंच सांग. आतां-आजचंच बघ. अर्ध्या तोळ्याची नेकलेस मी घेऊन आलें बारशाला. तर म्हणतात कशा, 'टवळी आली हात हालवीत ! सरलं असतं कांहीं फार, एखादा जिन्नस आणला असता तर ?' सांग बाई, तूंच दे यांचं उत्तर. मी थकलें. दोघांनीं चारी हातांनीं मिळवून दुचाकीवरच घर चालवायचं ह्यांची भर करीत; तरी हा प्रकार हं !

असूं दे. माझं मेलीचं सोड. निदान लेकाची तरी पर्वा ग ! राजनं काय केलंय ह्यांचं वाईट ? त्याला देखील बघूं नये का नीट सासूबाईंनीं ? मधें तो खूप आजारी झाला होता. मी घाबरलें. तडकाफडकीं त्याला घेऊन तिथं सासूबाईंच्याकडे आलें. पण वन्स, त्यांनीं घरांत नाहीं घेतलं राजला ! दवाखान्यांत घेऊन जा म्हणाल्या ! देवाशपथ ! खोटं नाहीं सांगत. हवं तर तूं विचार त्यांना. पाहिजे तर राजला विचार...

वन्सं, त्यावेळीं काय वाटलं असेल मला सांग ? गप्प ग कां अशी तूं वन्सं? बोलत नाहींस? कशी बोलशील ? तोंड हवं ना ? ऐक, ऐकच तूं. मला बोलूं दे.

वन्सं, गडे एका गोष्टीचा मला उलगडा करतेस का ? माझी सासू म्हणे महिला मंडळांत जाते. लोकांचीं कामं ऐकतें. त्यांना मदत करते. तर मी म्हणतें, आमच्याकडे लोकं म्हणून तरी तिनं बघूं नये का ?

मधें माझ्या घरांत जाऊ आली तेव्हांची गोष्ट. तर ती ह्यांच्या पसंतीची म्हणून कोण तोरा हं ! भारी भारी कपडे काय, उंची उंची दागिने काय, मोठी मोठी हौस काय, कांहीं विचारूं नकोस. तूं होतीसच कीं बघायला ! तर त्यावेळीं मी दिसलें का कोणाला ? हां, माझी किंमत एकदां बरीक झाली हं. उगाच खोटं कशाला बोलूं ? लग्नाच्या वेळीं दारांत उभी करून सवाष्णींच्या ओट्या भरीत नमस्काराला तेवढी पत राहिली, माझी ! हो. तेवढीच. वन्सं, म्हणजे ती तेवढी मानाची सून आणि मी काय कोंडा देऊन आणलेली का ?

छे, छे ! उगाच असं बोललें मी. थांबूं दे मला इथं. एखादवेळीं सारंच मुसळ केरांत जायचं. आमच्या त्या शांतीसारखं व्हायचं ग नाहीं तर ! हा उगाच नसता ताप डोक्याला. उद्यां तिच्या सासूप्रमाणं ह्यांनीं देखील माझं नि राजचं लग्नच केव्हां झालंय म्हटल्यावर ग मग ? जळो मेलं असं बोलणारांचं तोंड, नाहीं का ? उगाच शंका घुसली हं ही मनांत ! इश्श !

हं, तर काय बरं म्हणत होतें मी ? आलं ध्यानांत. नव्या नवरीच्या अंगाखांद्यावर दागिन्यांचा लखलखाट ! म्हणून सासूनं का मला दळभद्री म्हणावी वन्सं ? नव्हे मला जर त्यांनीं कांहीं घातलंच नाहीं तर मी घालूं कोठून दागिने ? माझ्या राजनं केले तेवढे घातले होते. म्हणून ह्यांनीं हिणवावं का ? नव्हे तूंच सांग. सासूनं सुनेशीं बोलायची रीत का झाली ही ? सदान् कदा मला कुजकीं बोलणीं, धुसपूस नि फुसफूस ! आतां तूं म्हणशील सोडून दे, मनावर घेऊं नकोस म्हणून. पण कशी ग गप्प बसूं ? मनाला बोंचत नाहीं का हें ? वन्सं, तूं चालवून घेतलं असतंस का ? सांग ? आतां ग कां गप्प गप्प तूं ? उगाच नाहीं बोलत मी. जिवाची कशी लाही लाही झालीय्. मस्तक भडकून गेलंय. अग, आम्हींच निर्लज्जपणा राखून किती वेळां कर्तव्यं पार पाडायचीं अशीं ? त्याला कांहीं मर्यादा ? एकदां झालं, दोनदां झालं, तीनदां झालं तरी तोच पाढा पुन्हां पुन्हां ? हं ! मला नाहीं खपत हा मानभावीपणा.

खरं सांगायचं तर आज यायचं कांहीं नव्हतं माझ्या मनांत. पण बाळंतिणीची तार आली दोन ओळींचं का होईना, सासूबाईंचंहि पत्र आलं ! म्हणून झक मारीत येणं भाग पडलं. एवढंच, नाहीं तर माझ्या पोराचं लॉकेट मोडून मला नेकलेस आणावी लागली नसती ऐनवेळीं ! कां तर भावाची पत राखायला हवी ! म्हणजे माझं पोर कुणीच नव्हे का ग ? वन्सं, ह्यांनीं कुणी सुतळीचा तोडा तरी आणायचा होता माझ्या पोरांना ? विचार माझ्या समक्ष हवं तर !

एवढं असून वर हंसरा चेहरा ठेवायचा. रुबाब राखायचा. नाटक करायचं. सासूला, नणंदेला, दिराला, सासऱ्याला, पै पाहुण्यांना खूष ठेवायला धडपडायचं ! कां ग बाई ? कशासाठीं ? नव्हे, कशासाठीं ही सारी उठाठेव ? एके दिवशीं सरळ राजला असं विचारलं. तो काय म्हणाला सांगूं ? म्हणाला, 'विचारतेस म्हणूनच सांगतों. हें सगळं माझ्यासाठीं करायचं.' मग काय ? एकदम दांतखिळी बसली न् काय ? मुकाट्यानं गप बसलें, एवढंच नाहीं गालांत हंसलें बघ. तुझ्या शपथ ! खरंच अग ? विचार राजला.

वन्सं, आज हें सारं तूं बोललीस म्हणून निघालं, पण एरव्हीं कुणाला

पत्ता नाहीं. उलट आमच्यासारखे सुखी आम्हीच असंच सगळे बोलतात. आम्हांला राजे लोक म्हणतात. कारण मी काय, अगर राज काय, सदा हंसतमुखानं सर्वत्र वावरतों. चांगले कपडे घालतों. सुखानं जगतों. खाण्यांत हयगय नाहीं. आदरातिथ्यांत कसूर नाहीं. म्हणून जगाला आमचा हेवा. पण गडे वन्सं, सारं आमचं आम्हांला माहित ! घरचं सारं बघायला तिसरं कुणी आहे म्हणतेस काय ? अंहं ! सगळं जय स्वावलंबन् !

आणि म्हणूनच वाटतं कीं, घरच्यांनीं आमच्याशीं प्रेमानं बोलावं. सुखानं रहावं. ठिसफिस करूं नये. आम्हांला त्यांच्याकडून कसलीहि अपेक्षा नाहीं. खरंच ! एक पैचीहि अपेक्षा नाहीं. फक्त सुखाचा शब्द हवा. त्यांच्या प्रेमाची सोबत हवी. म्हणून म्हणतें, हें जें माझ्या देखणेपणाचं कौतुक करीत आलीस, त्यापेक्षां त्याचं प्रेम आण. गडे. मी अगदीं हपापलें आहें. राजच्या प्रेमानं न्हाऊन निघालेंय तरीहि मला कांहीं उणं उणं वाटतंच ! म्हणून म्हणतें, सांग त्यांना. वळव त्यांचं मन. म्हणावं, मी देखील तुमच्यासारखीच मालकीण आहे ह्या घरची ! हक्कानं वावरूं द्या मला इथं ! नाहीं का ? खरं का खोटं ? बोल कीं !

अग बाई ! हांक आली वाटतं सासूबाईंची ? थांब हं, बघून येतें. कुणी बायका आलेल्या दिसतात. नमस्कार करून येतें. तूं इथं बैस हं ! आलेंच मी ! जाऊं ? ती बघ, पुन्हां हांक आलीच !... 'आलें आलेंऽऽऽ...' पण तूं थांब गऽऽ वन्सं !... ही आलेंच बघ मी !...

● ● ●

ठाणे ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम 3.7..
विभाग
क्रमांक
नों. दि.

IRBK-0107700
IRBK-0107700

म. ग्रं. सं. ठाणे. सार्वजनिक वाचनालय
क्र. 67700 नों. दि.
वि.

# समाज शिक्षण प्रकाशन

## डॉ. सरोजिनी बाबर यानी लिहिलेलीं पुस्तकें

( १ ) **मराठींतील स्त्रीधन** — किं. ७.५०. पृष्ठें ४०० डेमी
( लोकगीतांचा अभिनव संग्रह )

( २ ) **नव्याची पुनव** ( दुसरी आवृत्ति ) — किं. २ रु.
( जानपद जीवनावरील आकर्षक लघुकथांचा संग्रह )

( ३ ) **सुंबरान मांडीलं—** — किं. २ रु.
( मराठींतील लोककथांचा वैशिष्ट्यपूर्ण संग्रह )

( ४ ) **आठवतंय तेवढं सांगतें** — किं. २ रु.
( बाल-मानस-शास्त्रावरील चित्ताकर्षक कादंबरी )

( ५ ) **चिंचेची पत्रावळी** — किं. २ रु. ५० नये पैसे
( जानपद जीवनावरील आकर्षक व निवडक लघुकथांचा संग्रह )

( ६ ) **रुखवत** — किं. २ रु. ५० न. पै.
( लोकगीतावर आधारित कथा )

( ७ ) **डोंगरची मैना** — किं. २ रु. ५० न. पै.
( आकर्षक ग्रामीण कथांचा संग्रह )

( ८ ) **झालं गेलं सांगते** — किं. २ रु. ५० न. पै.
( आकर्षक विविध कथांचा संग्रह )

( ९ ) **जादूचा आरसा** — किं. ५० न. पै.
( बालमित्रांसाठीं मजेदार कथा )
( ले. कु. शारदिनी बाबर, एम्. ए. )

( १० ) **चांगभलं** — किं. ३७ न. पै.
( रत्नागिरी जोतिबाची माहिती देणारें सुंदर पुस्तक )
ले. श्री. कृ. भा. बाबर

**पत्ता:—१४८६ सदाशिव पेठ, पुणें २**